पुणे, सोमवार, ३१ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 123 • वर्ष ४ थे, अंक १२३ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा

P३



दिल्लीने विजयाची गुढी उभारली!

१२

## गुढी उभारू आनंदाची, समृद्धीची

राजकीय आणि मनोरंजन क्षेत्रातील मान्यवरांच्या घरात गुढी पाडव्याचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला.



केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि कुटुंबीय



जयंत पाटील, नेते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शप



निर्माते दिलीप पाटील आणि कुटुंबीय



उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि कुटुंबीय



आनंदाश्रम येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि कुटुंबीय



प्रसिद्ध अभिनेते प्रविण तरडे आणि कुटुंबीय

# पीएम मोदींची नागपूरला भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या दौऱ्यावर होते. विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून अनेक विकास प्रकल्पांचा शुभारंभ त्यांनी केला. पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्याची सुरुवात नागपुरात स्मृती मंदिर आणि त्यानंतर दीक्षाभूमी येथून झाली. त्यानंतर त्यांनी नागपूर येथे माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरचे भूमिपूजन केले आणि जाहीर सभेला संबोधित केले. त्यानंतर मोदींच्या हस्ते नागपुरात निशस्त्र विमानांसाठी च्या हवाई पट्टीचे उद्‌घाटन करण्यात आले.

छत्तीसगडमध्ये पंतप्रधान मोदी यांनी बिलासपूरमध्ये वीज, तेल आणि वायू, रेल्वे, रस्ते, शिक्षण आणि गृहनिर्माण क्षेत्राशी संबंधित ३३,७०० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचे भूमिपूजन, कामाचा शुभारंभ केला.



"विकसित भारतासाठी देश ज्यामध्ये अडकला होता, त्या बेड्या तोडण्याची गरज होती. आज आपण पाहत आहात की, देश गुलामीची मानसिकता मागे टाकून प्रगती करत आहे. गुलामीच्या विचारांनी निर्माण करण्यात आलेल्या कायद्यांची आता भारतीय न्याय संहिता लागू करण्यात आली आहे. आपल्या लोकशाहीच्या अंगणाता आता राजपथ नाही कर्तव्यपथ आहे."

— **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी गुढीपाडव्या निमित्ताने रविवारी महाराष्ट्रात दाखल झाले. त्यांचा हा दौरा अनेकार्थाने महत्त्वपूर्ण मानला जात आहे. सर्वात आधी त्यांनी संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या स्मारकावर जाऊन श्रद्धांजली अर्पण केली. दि. १ एप्रिलला संघाचे संस्थापक आद्यसरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची जयंती आहे. पहिल्यांदाच विद्यमान पंतप्रधानांनी नागपुरातील रेशीमबागेतील संघ मुख्यालयाचा दौरा केला आहे.

पंतप्रधान मोदींनी नागपुरात संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार आणि सरसंघचालक गोळवलकरांना पुष्पांजली अर्पण केली.

» पान ७ वर



## पाडव्याच्या निमित्ताने 'राज' यांचे पुन्हा लाव रे तो व्हिडिओ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गुढीपाडव्याच्या निमित्ताने मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची रविवारी सभा झाली. राज्यातील विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमचा गैरवापर झाला, याचा त्यांनी भाषणाच्या प्रारंभीच उच्चार केला. राज ठाकरे यांनी महाकुंभ विषयी जे वादग्रस्त व्यक्तव्य केले होते, त्यावरून त्यांच्यावर जोरदार टीका झाली होती. त्याचा समाचार म्हणून त्यांनी खुलासा केला. तसेच पुन्हा लाव रे तो व्हिडिओ म्हणत, गंगेचा व्हिडिओ दाखवला आणि संबंधितांवर टीका केली. ३३ हजार कोटी रुपये स्वच्छ करण्यासाठी खर्च झाले, अशी आकडेवारीही त्यांनी दिली. तसेच गंगेच्या किनारी होणाऱ्या अंत्यविधींवर भाष्य केले. महाकुंभच्या आकडेवारीवरून त्यांनी भाष्य केले. हिंदुत्वाबद्दल मला कोणीही शिकवू नये, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना



ठणकावले.

नद्यांच्या प्रदुषणावरही त्यांनी कठोर शब्दांत भाष्य केले. यात महाराष्ट्रातील नद्यांचा त्यांनी उल्लेख केला. नदी पात्रांमधील पाणी अत्यंत वाईट असल्याचे अहवालात नमूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईतील पाच नद्या होत्या, त्यातील चार मृत झाल्याचे धक्कादायक माहिती त्यांनी दिली. मिठी नदीची दुरवस्थाही त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून मांडली.

औरंग्याच्या कबरीवरून राज्यातील वादावर त्यांनी भाष्य केले. चित्रपटाने जागे झालेले हिंदू काही कामाचे नाहीत,

» पान ७ वर

## आर्थिक संकटाचे ढग दाटले...

### ७० कोटी भारतीयांकडे साडे तीन लाख रुपयेही नाहीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जग मंदीच्या छायेत असल्याचे भाकीत अनेक अर्थतज्ज्ञ करत आहेत. अशातच अमेरिकेच्या क्षितीजावर नवा राजा उदयास आला आहे, जो जगावर टेरिफ वॉर लादून महागाईत आणखी तेल ओतण्याचे काम करत आहे. चेन्नईतील आर्थिक नियोजन तज्ज्ञ डी मुथुकृष्णन यांनी भारतासमोर काय संकट येणार आहे याबाबत सावध केले आहे. निम्म्या भारतीयांकडे साडे तीन लाखांपेक्षाही कमी संपत्ती आहे, तर जगातील ९० टक्के लोकांचे एका पगाराचे जरी नुकसान झाले तरी ते त्या संकटाला तोंड देऊ शकत नाहीत असा दावा केला आहे.

एआय, ऑटोमेशन आणि नोक-यांच्या संकटात आर्थिक असमानता वाढत जाणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. हे संकट एवढे भीषण आहे की अगदी अतिश्रीमंत देशांमध्येही अब्जावधी लोक असुरक्षित बनणार आहेत. संपत्तीचे केंद्रीकरण आणि तांत्रिक समस्या याला कारणीभूत असणार असे त्यांचे म्हणणे आहे.

सर्वात श्रीमंत देश असलेल्या स्वित्झर्लंडमध्येही हा फेरा चुकलेला नाही. तिथेही १ टक्के लोकांकडे देशाच्या ४३ टक्के संपत्ती आहे. असे असले तरी स्वित्झर्लंडच्या प्रत्येक व्यक्तीकडे सरासरी ६ कोटी रुपयांची संपत्ती आहे. भारतात हा आकडा साडेतीन लाखही नाही. जगाची सरासरी संपत्ती ८,६५४ डॉलर आहे. जगातील अर्ध्या लोकांकडे ७.५ लाखांपेक्षा कमी संपत्ती आहे. भारताची सरासरी संपत्ती अंदाजे ४,००० डॉलर इतकी आहे. अर्ध्या लोकांकडे ३.५ लाख रुपयांपेक्षा कमी संपत्ती आहे असे मुथुकृष्णन यांनी म्हटले आहे.

» पान ७ वर



#### मोजक्या लोकांकडे अमाप संपत्ती

- जगातील १ टक्के लोकांकडे ८.६ कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती आहे. उर्वरित ९९ टक्के लोकांकडे यापेक्षा कमी संपत्ती आहे. जर श्रीमंत देशांचे हे नशीब असेल, तर भारताबद्दल जितके चांगले बोलले जाईल तितके कमीच आहे. जगातील पहिल्या १०% लोकसंख्येचा अपवाद वगळता, ९०% लोक एक पगार गमावूनही जगू शकत नाहीत, अशी परिस्थिती मुथुकृष्णन यांनी मांडली आहे.

## 'श्रीमंत'गुढी

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** दगडूशेठ गणपती मंदिराच्या प्रवेशद्वारात उभारण्यात आलेल्या भव्य गुढीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, राजाभाऊ घोडके, विलास रासकर, पोलीस अधिकारी विजयमाला पवार आदी उपस्थित होते.

## बीडमध्ये मशिदीत स्फोट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :**नागपूर हिंसाचाराच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असताना आता बीडमधून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. बीडच्या अर्धमसला गावातील मशिदीमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास जिलेटीनच्या साहाय्याने स्फोट करण्यात आल्याचं समोर आलं आहे. यात मशिदीतील फरशी फुटल्या तर भिंतीना देखील भेगा पडल्या आहेत.

गावातील दोन तरुणांनी हा स्फोट घडवून आणल्याचे समोर आले आहे. या दोन्ही तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. घटनास्थळी पोलिसांनी धाव घेतली असून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्फोटात सुदैवाने कसलीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार बीडमध्ये संदलदरम्यान काही जणांमध्ये वाद झाला होता. या वादातून हा स्फोट घडविण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. विजय राम गव्हाणे, श्रीराम अशोक सागडे अशी आरोपींची नावं आहेत. त्यांना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २९ मार्च रोजी बीडमधील अर्धमसला गावात सय्यद बादशहा यांचा संदल कार्यक्रम होता. या संदलमध्ये सर्व समाजाचे लोक सहभागी होत असतात. या संदरलमध्ये अर्धमसला आणि आजूबाजूच्या गावातील लोक संदल पाहण्यासाठी येत असतात. या संदलीत आरोपी विजय राम गव्हाणे, श्रीराम अशोक सागडे यांनी तक्रारदाराला जातीवाचक शिवीगाळ केली होती. यावेळी त्यांनी मशिदीबद्दलही काही वक्तव्यं केली होती. दोघांची समजूत काढल्यानंतर सर्वजण निघून गेले. यानंतर पहाटे २.३० वाजण्याच्या

» पान ७ वर

## अवकाळी पावसाचा वेधशाळेचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

» हवामान

**मुंबई :** राज्यात सोमवारी ठिकठिकाणी अवकाळी पावसाचे इशारे देण्यात आले आहेत. दुसरीकडे चैत्र महिन्याला सुरुवात झाली असून बहुतांश ठिकाणी चांगलीच रखरख वाढली आहे. तापमानाचा उच्चांक नोंदवला जात असून रविवारी, गुढीपाडव्यादिवशी विदर्भसाह मध्य महाराष्ट्र, कोकण व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तापमान चांगलंच वाढलंय. विदर्भात गेल्या तीन दिवसांपासून प्रचंड तापमानाची नोंद होतेय. तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे आहे. चंद्रपुर जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली असून ४२.२ अंश सेल्सियस तापमान नोंदवण्यात आले.

हवामान विभागाने दक्षिण मध्य महाराष्ट्रासह तळकोकणातील काही जिल्ह्यांना हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. कुठेही यलो अलर्ट नसला तरी सोमवार पासून अवकाळी पावसाची शक्यता पूर्वेकडील जिल्ह्यांना आहे. त्यानंतर पावसाचा अंदाज बहुतांश महाराष्ट्रात देण्यात आलाय. बीड, धाराशिव, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता आहे.

ठाणे, पालघर, नाशिक, नगर, धुळे, नंदुरबार, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे, तर रायगड, रत्नागिरी, पुणे, सोलापूर, बीड, छत्रपती संभाजीनगर आणि जळगाव येथे पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बुधवारी संपूर्ण महाराष्ट्रात पावसाची शक्यता असून, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.





## 'स्वर गंधार' अंतर्गत रंगली 'गंधार क्रिएशन्स' ची मैफल

**पुणे :** 'कलाकाराने कलाकारांसाठी तयार केलेले एक हक्काचे व्यासपीठ म्हणजे गंधार क्रिएटिव्हज्', अशा शब्दांत आपल्या नव्या सर्जनशील उपक्रमाचा परिचय करून देत, स्वर गंधार ही शुभारंभाची मैफल शनिवारी सकाळी रंगली. पद्मश्री पं. उल्हास कशाळकर आणि युवा संतूरवादक डॉ. शंतनु गोखले यांच्या सादरीकरणाला रसिकांनी भरभरून दाद दिली. पुण्यातील प्रसिद्ध संवादिनीवादक अमेय बिच्चु यांच्या 'गंधार क्रिएटिव्हज्' या संस्थेच्या वतीने स्वर गंधार या शुभारंभाच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. कोथरूड मयूर कॉलनी येथील एमईएस बालशिक्षण सभागृहात ही मैफल संपन्न झाली. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला होता. यावेळी बोलताना अमेय बिच्चु म्हणाले, "या संस्थेच्या माध्यमातून अनेकविध कार्यक्रम, कार्यशाळा यांचे आयोजन करणे, याबरोबरच भारतीय शास्त्रीय संगीतात काहीतरी करण्याची इच्छा असलेल्या नव्या पिढीतील अनेकांना प्रसिद्ध कलाकारांसोबत संवाद साधता यावा, त्यांची कला अनुभविता यावी हा उद्देश आहे.




## ड्रायव्हरच निघाला खंडणीखोर

**पुणे :** पुण्यातील बिबवेवाडी परिसरात एका खंडणी मागणाऱ्या तरूणाला पोलिसांनी अटक केली आहे. एका व्यावसायिकाला १० लाख रूपयांची खंडणी मागणाऱ्या तरूणाला पोलिसांनी अटक केली आहे. कुटुंबाला जिवे ठार मारण्याची धमकी देऊन ही खंडणी उकळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी हा कट उधळून लावला. तक्रार मिळताच बिबवेवाडी पोलिसांनी सापळा रचला. आरोपीने पुन्हा एकदा गौरव प्रमोद दुगड यांना फोन केला. तसेच खंडणीची मागणी केली आणि ठरवलेल्या ठिकाणी पैसे पाठवण्यास सांगितले. पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी डमी व्यक्ती आणि चलनी नोटांची व्यवस्था करून आरोपीला पैसे जमा झाल्याचा खोटा मेसेज पाठवला. त्यानंतर आरोपी पैसे घेण्यासाठी ठरलेल्या ठिकाणी पोहोचला. तेव्हा पोलिसांच्या सापळ्यात तो अडकला आणि पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडले.

## चित्ताकर्षक प्लॅटिनम दागिन्यांसह समृद्धीची गुढी

**पुणे :** चैतन्य आणि समृद्धी घेऊन येणारा गुढी पाडवा सण साजरा झाला विविध प्रकारच्या आकर्षक रांगोळ्या,



दाराला मंगल तोरण लावून समृद्धीचे प्रतीक असलेल्या उंच गुढ्या उभारल्या. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला गुढी पाडवा सण एकमेकांना हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा देऊन आनंदाने साजरा झाला. याच उत्सवाला दुर्मिळ आणि सुंदर अशा प्लॅटिनम दागिन्यांची जोड मिळाली आणि हा आनंद आणखी द्विगुणित झाला. जुन्या काळापासून पांढऱ्या शुभ्र प्लॅटिनम धातूला शक्तीचे प्रतीक मानले जाते. जे आपल्या शुद्धतेमुळे, दुर्मिळपणा आणि अद्वितीय चकाकीमुळे गुढी पाडव्याचा आनंद आणखी गोड झाला. गोड अशासाठी की आपल्या स्वत: साठी किंवा एखाद्या प्रिय व्यक्तीसाठी प्लॅटिनमच्या दागिन्यांपेक्षा दुसरी चांगली भेट काय असू शकते. कारण प्लॅटिनमच्या दागिन्यांची त्याच्या उत्कृष्टतेमुळे स्वतःची अशी एक वेगळी ओळख आहे. पाहिजे तर तुम्ही मॅन ऑफ प्लॅटिनमच्या रूपात सुंदर डिझाइनचे दागिने किंवा इवाराचे महिलांसाठी आकर्षक डिझाइन असलेले दागदागिने घेऊ शकता किंवा प्रेमी युगुल प्लॅटिनम लव्ह बँडच्या ज्वेलरी भेटवस्तू म्हणून देऊ शकतात. पुरुषांसाठी मेन ऑफ प्लॅटिनम, महिलांसाठी प्लॅटिनम इव्हारा आणि प्रेमी युगुलांसाठी प्लॅटिनम लव्ह बँडची अनोखी आणि आकर्षक प्लॅटिनम दागिन्यांच्या श्रेणीचा अनुभव घेता येईल. ही श्रेणी देशभरातील अग्रगण्य दागिन्यांच्या रिटेल स्टोअरमध्ये उपलब्ध आहेत.

# वृक्षांना घर, पक्ष्यांना आधार

## 'सिंहगड' ची उष्णतेत निसर्गसंवर्धनाची नवी दिशा...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडगाव बुद्रुक : :** पक्षी म्हणजे आपले मित्र, आणी त्यांच्या अन्न व पाण्याची व्यवस्था करणे हे आपले कर्तव्यच. या कर्तव्याची जाणीव म्हणूनच श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत पर्यावरण संवर्धन आणि प्राणीमात्रांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी "पक्षी अन्न-पाणी व्यवस्थापन" उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमामध्ये एकूण २० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. स्वयंसेवकांनी टाकाऊ वस्तूंचा वापर करून इको-फ्रेंडली खाद्यपात्रे तयार केली. यामध्ये २५ पेक्षा जास्त खाद्यपात्र तयार करण्यात आले. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वयंसेवकांनी पर्यावरणपूरक पद्धतीचा अवलंब करत प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्यांचे पुनर्वापर करून पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची व्यवस्था केली. सध्या वाढत्या उष्णतेमुळे पक्ष्यांना अन्न आणि पाण्याची टंचाई जाणवत असल्याने, या उपक्रमातून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ संजयकुमार पिंगाट त्याचबरोबर प्रा. भूमी पाटील व प्रा. घनश्याम फिरमे यांनी पाहिले. त्याचबरोबर विद्यार्थी प्रतिनिधी अर्ष धर व दत्ता राहेगावकर यांच्या नेतृत्वाखाली उपक्रम अतिशय उत्तम रित्या पार पडली.



» २० स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग
» टाकाऊ वस्तूंचा वापर करून इको-फ्रेंडली खाद्यपात्रांची निर्मिती
» प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्यांचे पुनर्वापर







### पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन...

- या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य एम.एन. नवले, संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले. संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. रचना नवले अष्टेकर, उपाध्यक्ष रोहित नवले, प्राचार्य डॉ. अरविंद देशपांडे व उपप्राचार्य डॉ. के.आर. बोरोले व प्रा.आर.एच.बोऱ्हाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.
- विभाग प्रमुख प्रा. डॉ. पुनम रासकर (इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार) ,प्रा. रवींद्र बोऱ्हाडे(संगणक), प्रा. डॉ. महेश नगरकर(यांत्रिक), प्रा. डॉ. मनोज बांगरे(माहिती व तंत्रज्ञान) व प्रा. महेश आळंदकर(प्रथम वर्ष विभाग प्रमुख) यांचे सदर कार्यक्रमास खुप छान सहकार्य मिळाले.
- १) स्वयंसेवकांना लहान-लहान गटांमध्ये विभागले गेले होते. प्रत्येक गटात ४-५ स्वयंसेवकांचा समावेश करण्यात आला
- २) त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी अन्न व पाणी ठेवण्यासाठी निर्देश दिले.
- ३) मुख्यतः श्रीमती काशीबाई अभियांत्रिकी महाविद्यालय व सिंहगड विद्यालयाच्या आवारातील झाडे, सार्वजनिक उद्याने, झाडांची दाटी असलेले भाग, रस्त्याच्या कडेला असलेल्या मोकळ्या जागा, आणि काही रहिवासी भागातील ठिकाणांचा समावेश होता.
- ४ ) या उपक्रमाद्वारे केवळ पक्ष्यांसाठी अन्न-पाण्याची सोय झाली नाही, तर पर्यावरण रक्षणाचा आणि प्लास्टिक पुनर्वापराचा महत्त्वाचा संदेश देखील दिला गेला.

# नाट्यसंस्कार कला अकादमी नाट्य कार्यशाळेचा समारोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नाटक हे जीवंतपणाचे लक्षण असून व्यक्तिमत्व विकासाचे मोलाचे साधन आहे. मुलांना विविध विषयांवरील बालनाट्ये दाखविल्यास, बालनाट्याविषयी त्यांच्याशी चर्चा केल्यास ती सर्वार्थाने प्रगल्भ होतील, असा प्रतिपादन वंदेमातरम्चे अभ्यासक, बालनाट्य चळवळीतील मार्गदर्शक मिलिंद सबनीस यांनी केले.

नाट्यसंस्कार कला अकादमीतर्फे ५ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी नाट्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या समारोपानिमित्त आयोजित कार्यक्रमात सबनीस आणि रंगकर्मी रवींद्र सातपुते यांच्या हस्ते मुलांना



प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. त्यावेळी सबनीस यांनी कार्यशाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद साधला. टिळक रोड वरील ज्योत्स्ना भोळे सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुरुवातीस कार्यशाळेतील मुलांनी विविध नाटिका, नाट्यछटांचे सादरीकरण केले. नाट्यसंस्कार कला अकादमीचे प्रमुख विश्वस्त प्रकाश पारखी, विश्वस्त संध्या कुलकर्णी, अनुराधा कुलकर्णी, अश्विनी आरे, पूजा पारखी, राधिका देशपांडे, हर्षदा टिल्लू यांची उपस्थिती होती.

नाट्यकार्यशाळेचे संयोजन प्रतीक पारखी यांनी केले होते. कार्यशाळेतील लहान गटातून अबीर वाळिंबे आणि आद्या पटवर्धन तर मोठ्या गटातून श्रावणी गोरे यांची सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा या वेळी विशेष गौरव करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत असलेल्या ललित कला केंद्र आणि नाट्यसंस्कार कला अकादमीतर्फे घेण्यात आलेल्या बारावी नंतरच्या मोठ्यांसाठीच्या अभिनय प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना या प्रसंगी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

> नाट्य प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रत्येक मुलगा किंवा मुलगी अभिनेता-अभिनेत्री होईलच असे नाही. मात्र नाट्य कलेचे प्रशिक्षण घेतलेला विद्यार्थी भविष्यात चांगला माणूस मात्र नक्की घडू शकतो. चांगला चांगला नट किंवा प्रेक्षक घडण्याची प्रक्रिया नाटकाच्या माध्यमातून घडू शकते.
> **- रवींद्र सातपुते**

## परंपरेबरोबर विकासाची गुढी उभारा : डॉ. नीलम गोऱ्हे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा प्रारंभ असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. गुढी उभारून आनंद, समृद्धी आणि परंपरेला अभिवादन करण्याची ही परंपरा आहे. यानिमित्ताने प्रभू श्रीराम आणि माता सीता अयोध्येत परतल्यावर त्यांच्या स्वागतार्थ उभारलेल्या गुढ्यांचे महत्त्व सांगत, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा संदेश दिला.

"आज आमच्या घरी, सिल्वर रॉक्स येथे मी आणि माझी भगिनी जेहलम जोशी यांनी गुढी उभारली आहे. मात्र खरी गरज आहे ती प्रत्येकाच्या मनामध्ये आनंद, उत्साह, आशा आणि विकासाची गुढी उभारण्याची," असे त्यांनी सांगितले.

तसेच, समाजातील वाढत्या आत्महत्या आणि हिंसाचाराविरोधातही त्यांनी आवाज उठवला. "तरुणांनी व शेतकऱ्यांनी आत्महत्यांना तिलांजली द्यावी. महिलांवर व गोरगरिबांवर होणारे हिंसाचार थांबवण्याची जबाबदारी शासनावर आहे. सरकारने आपल्याला दिलेल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत आहे ," अशी ग्वाही त्यांनी दिली



**पुणे** गुढी उभारून आनंद, समृद्धी आणि परंपरेला अभिवादन केले. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर समाजात सकारात्मक विचार रुजवून नवी सुरुवात करण्याचा संदेश देत, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राज्यभरातील जनतेला हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# 'रंग रूपक' ठरले नाट्य रसिकांसाठी पर्वणी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, एमआयटी-एडीटी विद्यापीठ, पुणे येथील नाट्य विभाग आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर , संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने राज कपूर नाट्यगृह, पुणे येथे झालेल्या 'रंग रूपक' या तीन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादात भारतीय नाट्य शास्त्रावर अतिशय मौलिक मंथन पार पडले. 'रंग रूपक' हा परिसंवाद नाट्य रसिकांसाठी पर्वणीच ठरला.

भारतीय ज्ञान परंपरेतील नाट्य संस्कृतीचा प्रसार व्हावा या हेतूने "भारतीय ज्ञान परंपरेतील नाट्यशास्त्राची भूमिका" ही विषयवस्तू घेवून आयोजित या परिसवांदात राष्ट्रीय स्तरावरील नामांकित नाट्यदिग्दर्शक/नाट्यकर्मी यांनी तीन दिवस विद्यार्थी व सहभागींना मार्गदर्शन केले. या परिसंवादाचे उद्घाटन, राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्लीचे माजी संचालक पद्मश्री प्रा. वामन केंद्रे, राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्लीचे कार्यकारी अध्यक्ष पद्मश्री प्रा. भरत गुप्त, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., कुलसचिव डॉ.महेश चोपडे, संस्कार भारतीचे अभिजित गोखले, सिनेनाट्य विभागाचे अधिष्ठाता डॉ. मुकेश शर्मा, आयोजक डॉ. अमोल देशमुख यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.



> भारतीय संस्कृती, परंपरा, तत्वज्ञान, मानसशास्त्र याचा विचारही यात झालेला दिसून येतो. या शास्त्राला वगळून अभिनय प्रशिक्षणाचा विचार करता येत नसल्याने राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्ली येथील नाट्य प्रशिक्षणात नाट्यशास्त्र एक महत्वाचा भाग आहे.
> **- प्रा. वामन केंद्रे**

उद्घाटनानंतर, पद्मश्री वामन केंद्रे दिग्दर्शित 'मध्यम व्यायोग' चे हिंदी रूपांतर "मोहे पिया"या अंगावर शहारे आणणाऱ्या रोमांचक नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. ज्याला, ज्याला उपस्थितांची मोठी दाद मिळाली.

एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, विभीषण चवरे, आदींचे मार्गदर्शन मिळाले.

### अभ्यासकांसाठी पर्वणी

- 'नाट्यशास्त्र अभिनय पक्ष' या विषयावर प्रख्यात शास्त्रीय नर्तक पद्मश्री शशधर आचार्य, प्रो.सुज्ञान कुमार मोहंती, डॉ. गौतम चॅटर्जी यांनी मार्गदर्शन केले. ज्यात त्यांनी नाट्यशास्त्रातील अभिनयाचे विविध पैलू उपस्थितांसमोर उलगडले. गुरु शमा भाटे, डॉ.प्रसाद भिडे व प्रा.संध्या रायते यांनी 'नाट्य शास्त्र- प्रयोग पक्ष' या विषयावर उपस्थितांना बहुमोल मार्गदर्शन केले. त्यानंतर, गुरु शमा भाटे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'राम-लल्ला' या भरतनाट्यमच्या नृत्य-नाटिकेचा प्रयोग करण्यात आला. ज्याने उपस्थितांना संमोहित केले.





## सांगीतिक कार्यक्रमात वातावरण राममय

**पुणे :** प्रतिथयश तबलावादक प्रशांत पांडव आणि त्यांचे शिष्य गीत इनामदार व किशोर पांडव यांच्या स्वर- नाद म्युझिक फाऊंडेशनच्या वतीने मराठी नवीन वर्षाचे औचित्य साधत गुढी पाडव्याच्या दिवशी 'चाहे कृष्ण कहो या राम' या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम मयूर कॉलनी मधील एम.ई.एस. बालशिक्षण मंदिराच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन महानगरपालिकेतील माजी विरोधीपक्ष नेते व आपला परिसरचे उज्ज्वल केसकर, प्रसिद्ध गायक व संवादिनीवादक प्रभाकर पांडव, प्रशांत इनामदार, मारुतीराव शिंदे यांचे हस्ते झाले. यावेळी भूषण सहस्त्रबुद्धे, निरंजन आगाशे, साकेतचंद्र नातू आदी मान्यवर उपस्थित होते. स्वर-नाद संस्थेचा हा पहिलाच कार्यक्रम असून यावेळी स्वर-नाद च्या फलकाचे अनावरण करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये पं विजय कोपरकर व विदुषी प्रतिमा टिळक यांच्या शिष्या गायिका श्रुती बुजारबरुआ- गोडबोले आणि पं. अजॉय चक्रबर्ती यांचे शिष्य व गायक अमोल निसळ यांचे गायन झाले. कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही गायकांनी श्लोकाने केली. त्यानंतर ललत रागामधील जाने ना दुंगी कान्हा... ही बंदिश अमोल यांनी गायली. या पाठोपाठ श्रुती यांनी राम पंचायतानाचे वर्णन करणाऱ्या दोन बंदिशी सादर केल्या ज्यामध्ये चलो री माई राम सिया दरसोन को.. आणि करत बरं जोगी न मानी शाम रे..यांचा समावेश होता. यानंतर श्रुती यांनी श्रीराम रामचंद्र कृपाळू भजमन... ही रचना गायली आणि सगळे वातावरण राममय झाले. रामाच्या शक्तींनी भरलेल्या अनेक रचना आहेत. त्यामध्ये आरंभी वंदीन अयोध्येचा राजा...हा समर्थ रामदास स्वामींचा हा अभंग अमोल यांनी आपल्या शैलीमध्ये गायला आणि प्रेक्षकांची वाहवा मिळवली. यापाठोपाठ श्रुती यांनी ठुमक चलत रामचंद्र, बाजत पैंजनियां ही रचना सुंदररित्या सादर केली.

### नवीन वर्षाची सुरेल सुरुवात

- या सांगीतिक कार्यक्रमाद्वारे प्रभू श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यावर आधारित संगीताच्या विविध रंगांनी नटलेली एक भक्तिरसपूर्ण सांगीतिक पहाट या कार्यक्रमाद्वारे रसिक प्रेक्षकांना अनुभवायला मिळाली आणि नवीन वर्षाची सुरेल सुरुवात झाली.

## गुढी पाडव्यामुळे फळभाज्यांना बेताची मागणी



**पुणे :** गुढी पाडव्यामुळे फळभाज्यांना बेताची मागणी राहिली. घाऊक बाजारात मटार वगळता बहुतांश फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गुढीपाडव्यामुळे फळभाज्यांना बेताची मागणी होती., अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

# हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे शोभायात्रा

## मातृशक्तीला नमन, पारंपरिक वेशात पुणेकरांचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अहिल्यादेवी होळकर रथ...वंदे मातरम या काव्याला १५० वर्ष पूर्ण झाली त्याबद्दल माहितीपूर्ण रथ... पर्यावरणचे भान राखून प्रबोधनपर पाणी या विषयावर जनजागृती रथ यांसह छत्रपती शिवाजी महाराज रथ अशा एकापाठोपाठ एक आलेल्या चित्ररथांचा सहभाग आणि पारंपरिक वेशात सहभागी पुणेकरांनी शहराच्या मध्यभागात भव्य शोभायात्रेत सहभागी होत मातृशक्तीला नमन केले.

गुढीपाडव्यानिमित्त हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे शहराच्या मध्यभागात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासने, रा.स्व.संघ मोतीबाग नगर संघचालक ॲड. शरद चंद्रचूड, समितीचे संयोजक राघवेंद्र मानकर व सहसंयोजक अश्विन देवळणकर यांसह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

तांबडी जोगेश्वरी मंदिर येथे डॉ. मेधा कुलकर्णी यांसह निवेदिता एकबोटे, गायत्री खडके, पुणे शहर भाजपा महिला उपाध्यक्ष हर्षदा फरांदे, प्राची वाईकर, दीप्ती शिदोरे, सीमा गोवंडे यांच्या हस्ते ग्राम गुढी उभारण्यात आली. यात्रा प्रमुख म्हणून अथर्व दातार व चैतन्य कुसूरकर यांनी नियोजन केले.







### लक्षवेधक विशेष रथांचा सहभाग

- ढोल-ताशा पथक, शंख पथक, बँड, मर्दानी खेळ, वेत्रचर्म पथक देखील सहभागी झाले होते. याशिवाय सो. क्ष. कासार श्री कालिकादेवी संस्थान, पुणे यांचा रथ, मराठी अभिजात भाषा रथ यांसह अनेक विशेष रथ देखील शोभायात्रेत सहभागी झाले. तुळशीबाग मंडळ, नवनीत मित्र मंडळ, कडबे आळी तालीम मंडळ, अखिल शनिवार पेठ नवरात्र उत्सव समिती, कालिका माता देवस्थान समिती, चिमण्या गणपती मंडळ यांनी देखील सहभाग घेतला.
- १) सनातन धर्माभिमानी मंडळी,
- २) प्रभू राम-लक्ष्मण-सीता हनुमान यांच्या मूर्ती,
- ३) पारंपरिक वेषभूषा आणि ऐतिहासिक,
- ४) स्वातंत्र्यलढ्यातील थोर व्यक्ती इत्यादींचा आदर्श ठेवून केलेल्या वेशभूषेतील नागरिक मोठ्या संख्येत शोभायात्रेत होते.

# श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात गुढीपूजन व फुलांची भव्य आरास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रांगोळीच्या पायघड्या आणि फुलांची आकर्षक आरास, बँडचे मंगलध्वनी अशा मंगलमय वातावरणात दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात गुढीपाडवा साजरा करण्यात आला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे गणपती मंदिराच्या ४१ व्या वर्धापनदिनी गुढीपाडव्याला मंदिराच्या प्रवेशद्वारात उभारण्यात आलेल्या भव्य गुढीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पहाटेपासूनच चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी गणरायाचे दर्शन घेण्याकरीता पुणेकरांनी मोठया संख्येने गर्दी केली.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सपत्नीक गणरायाला अभिषेक केला. तसेच आरती करून गुढीपूजन करीत त्यांच्या हस्ते गुढी उभारण्यात आली. यावेळी परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, राजाभाऊ घोडके, विलास रासकर, पोलीस अधिकारी विजयमाला पवार यांसह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरबार बँड मधील कलाकारांनी गणरायाचरणी सेवा अर्पण केली. यावेळी गणेशयाग, अभिषेकांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पुणेकरांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा. पुणे शहर शांत रहावे, शहरात कायदा सुव्यवस्था चांगल्या स्थितीत आहे. पुढील काळात देखील ती चांगल्या स्थितीत राहिल, असा विश्वास आहे. शांतता आणि चांगल्या वातावरणात प्रत्येकाचे आयुष्य असावे, हीच प्रार्थना त्यांनी केली.
**- अमितेश कुमार**

महाराष्ट्र सुखी समाधानी होवो, सर्वत्र शांतता प्रस्थापित होवो, जे भारताचे स्वप्न आहे की २०४७ मध्ये विकसित भारत व विश्वगुरू होण्याच्या दृष्टीने गणरायाचे आशीर्वाद मिळो. तसेच भारत हा जगातील शक्तिशाली देश व्हावा,
**- सरचिटणीस व आमदार हेमंत रासने**









कोथरूड अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेतर्फे मराठी नववर्षारंभ (गुढी पाडवा) आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून सांस्कृतिक कलावंत गुढी साजरी झाली.

# नाट्य परिषदेची सांस्कृतिक कलावंत गुढी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेतर्फे मराठी नववर्षारंभ (गुढी पाडवा) आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून सांस्कृतिक कलावंत गुढी उभारण्यात आली. साहित्यिक, कलावंत आणि रसिकांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'कुटंब कीर्तन' या नाटकातील कलाकार सुप्रसिद्ध अभिनेत्री वंदना गुप्ते आणि सुप्रसिद्ध अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांच्या हस्ते गुढी पूजन करण्यात आले.

माजी नगरसेवक पृथ्वीराज सुतार, सुगंधा शिरवळकर, बालसाहित्यिक राजीव तांबे, नाट्यसंस्कार कला अकादमीचे प्रमुख विश्वस्त प्रकाश पारखी, महापालिकेच्या नाट्यगृहांचे प्रमुख व्यवस्थापक राजेश कामठे, नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेचे अध्यक्ष सुनील महाजन, उपाध्यक्ष समीर हंपी, प्रमुख कार्यवाह सत्यजित धांडेकर, कोषाध्यक्ष दीपक गुप्ते, सांस्कृतिक विभाग प्रमुख अनुराधा हटकर, अश्विनी थोरात, अभिजित आपटे, धनंजय पूरकर, प्रसिद्ध गायिका मनिषा निश्चल, मकरंद टिल्लू आदी उपस्थित होते.

"यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची वास्तू खूप छान आणि प्रसन्न असून रसिकांच्या अलोट गर्दीने कायम फुललेली असते. अभिनयाच्या माध्यमातून ५० वर्षांपूर्वी रसिकांसाठी गुढी उभारली असून यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ११२५ वा प्रयोग करीत असल्याचा आनंद आहे. नाट्यगृहाचा नावलौकिक कायम वाढत रहावा.
**- वंदना गुप्ते**

"नाट्यगृहाचे पाठबळ आणि रसिक प्रेक्षकांच्या साथीने भविष्यकाळात सांस्कृतिक क्षेत्रात उंचच उंच गुढी उभारू.
**- संकर्षण कऱ्हाडे**

# तुळशीबाग श्रीरामनवमी उत्सवाला सुरेल बासरीवादनाने प्रारंभ




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्रीराम जय राम जयजय राम... च्या निनादात ऐतिहासिक तुळशीबाग श्रीराममंदिरात गुढीपाडव्यानिमित्त श्रीराम-लक्ष्मण-सीता मूर्तीस पवमान अभिषेक करण्यात आला. अभिषेकानंतर मूर्तींना पोशाख व दागिने घालण्यात आले. श्रीरामरक्षा, अथर्वशीर्ष, श्रीविष्णूसहस्त्रनाम, श्रीसूक्त व पुरूषसूक्त पठण देखील मंदिरात झाले. प्रभू श्रीरामाचे दर्शन घेण्याकरीता पुणेकरांनी मंदिरात गर्दी केली होती.

श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने श्रीराम मंदिरात दि. ३० मार्च ते १६ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले, विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले, राघवेंद्र तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता.

"उत्सवादरम्यान दि. ३० मार्च ते ५ एप्रिल दररोज सायंकाळी ५.३० वाजता ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. कल्याणी नामजोशी यांचे श्रीमत् रामायण प्रवचन होणार आहे. तर, सोमवार, दि. ३१ मार्च रोजी मंजिरी आलेगांवकर यांचे सुश्राव्य गायन, मंगळवार, दि. १ एप्रिल रोजी दीप्ती कुलकर्णी यांचा सोलो हार्मोनियम वादन कार्यक्रम, बुधवार, दि. २ एप्रिल रोजी वृषाली मावळंकर यांचे गायन आणि शुक्रवार, दि. ४ एप्रिल रोजी सानिया कुलकर्णी यांची गायनसेवा होणार आहे. हे कार्यक्रम रात्री ८.३० वाजता होणार असून सर्व कार्यक्रम विनामूल्य आहेत. तरी पुणेकरांनी मोठ्या संख्येने उत्सवात सहभागी व्हावे.
**- भरत तुळशीबागवाले**

### मंदिरात फुलांची आकर्षक आरास व विद्युतरोषणाई



### बासरी वादनाने वातावरण प्रसन्न

- हिमांशु बक्षी यांचा बासरीवादन कार्यक्रम झाला. हिमांशु बक्षी यांनी गणेश वंदना बासरीवर सादर केली. त्यानंतर त्यांनी सूरदास यांचा 'दर्शन दे दो राम ' हा अभंग सुरेल वादनातून सादर केला. 'विठ्ठल आवडी प्रेमभाव' आणि 'कौसल्येचा राम' या गीतांवर बासरी वादनाने वातावरण प्रसन्न झाले.



## कामराला अटक मागणीचे महिला कार्यकर्त्यांचे निवेदन

**हडपसर :** उच्चपदस्थ नेत्यांवर अवमानकारक टीका करणाऱ्या आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या कुणाल कामरावर देशद्रोहासह विविध गंभीर गुन्हे दाखल करून त्याला त्वरित अटक करावी, अशी मागणी हडपसर विधानसभा भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी महिला मोर्चाच्या सरचिटणीस छाया संजीव गदादे यांनी हडपसर पोलीस ठाण्यात निवेदन दिले. यावेळी नलिनी मोरे, संगीता पाटील, अश्विनी सूर्यवंशी, रेखा अबनावे, भावना कांबळे, मीरा फडणवीस, जयश्री गदादे व निकिता उबाळे उपस्थित होत्या. योगेश टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले. छाया गदादे म्हणाल्या, कुणाल कामरा या कलाकाराने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी अतिशय खालच्या पातळीवर टीका करत अपमानास्पद कविता केली आहे. या तथाकथित 'कॉमेडी शो' मध्ये त्याने पंतप्रधानांसह गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि इतर अनेक उच्चपदस्थ नेत्यांवरही अवमानकारक वक्तव्ये केली आहेत. सखोल चौकशी करून कुणाल कामरावर कठोर कारवाई करावी. या वेळी पुणे शहर ओबीसी मोर्चाच्या सरचिटणीस स्मिता गायकवाड यांनी देखील कुणाल कामरावर त्वरित कारवाई करून त्याच्या कार्यक्रमासह यूट्यूब चॅनेलवर आजीवन बंदी घालण्याची मागणी केली.



## ग्राहक संघटनांच्या लढ्याला यश


**पुणे :** घरगुती ग्राहकाला स्मार्ट मीटर, स्मार्ट नेट मीटर लावला, तरी 'टीओडी मीटर्स'प्रमाणे बिल लावू नये, सध्या चालू आहे तीच पद्धत सुरू राहावी, अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून नागरिकांकडून होत आहे. अशी मागणी अनेक ग्राहक संघटना तसेच सोलर सिस्टिम इरेक्टर्सनी वीज नियामक आयोगाकडे लावून धरली होती. याबाबत वेलणकर यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत देशातील एक कोटी घरांवर सोलर सिस्टिम बसवून त्यांचे वीजबिल शून्यावर आणण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. सोलर सिस्टिम बसविलेल्या ग्राहकांच्या घरात दिवसभर जेवढे युनिट वीज सूर्यप्रकाशामुळे तयार होईल, ती त्यांनी 'महावितरण'च्या ग्रीडमध्ये टाकायची आणि ग्राहक दिवसरात्र मिळून जेवढे युनिट वीज वापरेल, ती तयार केलेल्या युनिटमधून वजा करून फक्त उर्वरित युनिटचे पैसे भरायचे. जर तयार केलेली वीज वापरलेल्या विजेपेक्षा जास्त असेल, तर तेवढे युनिट ग्राहकाच्या खात्यात जमा राहतील व ते आर्थिक वर्ष संपेपर्यंत त्या युनिट्सचा वापर तो करू शकेल व वर्षअखेर जे युनिट्स त्यांच्या खात्यात जास्तीचे शिल्लक राहतील त्यांचे महावितरण ग्राहकाला पैसे देईल. त्या लढ्याला यश आले असून, नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या दरानुसारच लागू राहील, असा निर्णय दिला आहे. असे सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळविले आहे.

## रमजान ईदनिमित्त गोळीबार मैदान चौकात वाहतूक बदल

**पुणे :** रमजान ईदनिमित्त गोळीबार मैदान चौकातील ईदगाह मैदानावर नमाज पठण होणार आहे. नमाज पठणासाठी मुस्लीम बांधवाची गर्दी होणार असल्याने या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे. चंद्रदर्शन झाल्यानंतर रमजान ईद साजरी करण्यात येते. चंद्रदर्शन रविवारी (३० मार्च) सायंकाळी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर सोमवारी (३१ मार्च) रमजान ईद साजरी करण्यात येणार आहे. लष्कर भागातील गोळीबार मैदान चौकातील ईदगाह मैदान येथे आज सोमवारी सकाळी सामुदायिक नमाज पठण होणार आहे. आज सोमवारी सकाळी साडेसहा ते साडेअकरापर्यंत या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.

## सायबर चोरट्यांकडून ६२ लाखांची फसवणूक

**पुणे :** सायबर चोरट्यांनी दोन महिलांसह तिघांची ६२ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विश्रांतवाडी भागातील एका ३८ वर्षीय महिलेची शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने चोरट्यांनी ४२ लाख २९ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत महिलेने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




### 'शूरा आम्ही वंदितो'



# अग्निशमन केंद्रातील जवानांविषयी कृतज्ञता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गुढी पाडवा अर्थात मराठी नववर्षाच्या निमित्ताने अग्निशमन दलातील जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांना दीर्घायुष्य लाभो आणि आगामी वर्ष सुरक्षित जावो, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

> शहरात आगीची घटना घडल्यानंतर अग्निशमन केंद्रातील जवान स्वत:चा जीव धोक्यात घालून नागरिकांचा जीव वाचवितात. संपत्तीचे नुकसान होऊ नये याचीही काळजी घेतात. नागरिकांवरील संकट टाळण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालणाऱ्या जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. - पियूष शहा

सहकार नगरमधील संजीवनी मित्र मंडळ आणि बुधवार पेठेतील साईनाथ मंडळ ट्रस्टतर्फे एरंडवणे येथील अग्निशमन केंद्रात 'शूरा आम्ही वंदितो' या कार्यक्रमाचे आयोजन साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियूष शहा यांच्या संकल्पनेतून केले होते.

अग्निशमन केंद्रातील २५ जवानांसमवेत मंडळांचे कार्यकर्ते आणि चिमुकल्यांनी अनोख्या पद्धतीने मराठी नववर्ष साजरे केले. सुरुवातीस विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत जवानांचे औक्षण केले. प्रत्येक जवानास आकर्षक गुढी भेट देण्यात आली.

## अजीत पवारांच्या निकटवर्तीयांच्या घरासमोर जादूटोणाचा प्रकार उघड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** विद्येचे माहेरघर आणि राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यामध्ये जादूटोण्यासारखा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. हा प्रकार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निकटवर्ती असलेल्या आणि पुणे महापालिकेत माजी महापौर दत्ता धनकवडे यांच्या घराच्या समोर घडला आहे. या प्रकरणी महिलेच्या विरोधात भारती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेने विदयादिप गृह संस्था मर्यादित स.नं. ३२/०२/१० धनकवडी पुणे सोसायटीमध्ये मागील ०४ महिन्यापासुन फक्त अमावस्याच्या दिवशी वेगवेगळया व्यक्तीच्या घराचे समोर नारळ, दही-भात, उकडलेली अंडी, लिंबु, काळा अभिर ठेवत होती. त्या महिलेने शनिवारी अमावस्याच्या असल्याने दत्ता धनकवडे यांच्या बंगल्याच्या समोर देखील या वस्तू ठेवताना असताना दिसून आली.

याबाबत बोलताना दत्ता धनकवडे यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून धनकवडी परिसरातील अनेक घरांच्या बाहेर असे जादूटोणा होण्याचे प्रकार घडत असल्याचे समोर आले होते. आणि काल (शनिवारी) अमवस्या असल्याने असा काहीतरी प्रकार घडेल, अशी शंका असल्याने नागरिक या गोष्टीवर लक्ष ठेवून होते. अशातच संशयित महिलेने आमच्या घरात जवळील सोसायटीच्या परिसरात भावलीसह अघोरी प्रकार करण्यात सुरुवात केली. त्यानंतर नागरिकांनी तत्परता दाखवत त्या महिलेला पोलिसांच्या हवाली केला आहे.

# माऊलींच्या संजीवन समाधीवर गणेशावतार चंदन उटी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीवर गुढी पाडव्यानिमित्त प्रथा परंपरांचे पालन करीत संस्थान तर्फे चंदन उटीतून श्री गिरिजात्मक (श्रीक्षेत्र लेण्याद्री ) श्री'चे गणेशावतारातील वैभवी रूप साकारण्यात आले. श्री नरसिंव्ह सरस्वती स्वामीमहाराज मठात श्रींचे पुजारी सुधीर गांधी परिवार तर्फे परंपरेने श्रीचे वैभवी गणेश अवतार रूप परिश्रम पूर्वक साकारण्यात आले. श्रींचे गणेशावर वैभवी रूप पाहण्यासह दर्शनास भाविक नागरिकांनी आळंदीत मंदिरांत गुढी पाडव्या निमित्त गर्दी केली होती.

माऊली मंदिरातील प्रथा परंपरांचे पालन करीत चैत्र महिन्यात गुढी पाडव्या पासून श्रीचे संजीवन समाधीवर चंदन उटी लेप लावण्यास प्रारंभ होत असतो .चैत्र महिन्यातील पहिली चंदन उटी गुढी पाडव्यास श्रीचे संजीवन समाधीवर आकर्षक वस्त्रालंकार वापरून श्रीचे वैभवी गणेशावतार रूप चंदन उटी तून साकारले. यासाठी संस्थानचे वतीने सेवा रुजू करण्यात आली.

परंपरेने माउली मंदिरात पहाटे पवमान अभिषेख पूजा प्रमुख विश्वस्त निरंजन नाथसाहेब यांचे हस्ते झाली. गुढी पाडव्या निमित्त मंदिरात विश्वस्त विधीतज्ज्ञ राजेंद उमाप, पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, व्यवस्थापक माऊली वीर, तुकाराम माने आदी मान्यवर उपस्थित होते.

गोपाळपुरातील वैभव असलेले श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिरातील श्री नरसिंव्ह सरस्वती स्वामी महाराज यांचे संजीवन समाधी वर देखील श्रीक्षेत्रोपाध्ये माजी नगराध्यक्ष सुरेश गांधी, माजी नगरसेवक सुधीर गांधी आणि नितीन गांधी परिवाराने श्री नरसिंव्ह सरस्वती स्वामी महाराज मंदिरात परिश्रम पूर्वक गणेश अवतार श्रींचे संजीवन समाधीवर रूप चंदन उटीचे माध्यमातून लक्षवेधी रूप साकारण्यात आले.

- गुढी पाडव्या निमित्त माऊली मंदिरात आकर्षक पुष्प सजावट करण्यात आली होती. या लक्षवेधी सजावटीचे तसेच रंगावली हि लक्षवेधी साकारण्यात आली होती. दर्शनास भाविकांनी गर्दी केले.
- आळंदी मंदिरात गुढी पाडव्या निमित्त श्रीना पवमान अभिषेक पूजा झाली. मंदिरात पहाटे घंटानाद, काकडा, भाविकांच्या महापूजा, महिमन्पुजा ,श्रीना दुधारती, धुपारती आदी धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाले. अक्कलकोट चे मालक रथोत्सव मिरवणूक विद्युत रोषणाई रथातून हरिनाम गजरात झाली. आळंदीसह परिसरात घरोघरी गुढी उभी करीत नागरिकांनी परंपरेने गुढी पाडवा सण धार्मिक पावित्र्य जोपासत उत्साहात साजरा केला.

## समाधी अभ्यंगस्नाने पुण्यतिथी उत्सवाला प्रारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्याला 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३५ व्या पुण्यतिथी उत्सवाला' महाराजांच्या समाधीस अभ्यंगस्नान घालून पूजेने प्रारंभ झाला. समाधीस व सभामंडपासह संपूर्ण परिसरात फुलांची आकर्षक आरास करण्यात आली होती. सनईच्या मंगल सुरावटींनी देवस्थानचा परिसर भक्तीमय झाला. यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणेच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३५ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येत आहे. ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र तांबेकर, उपाध्यक्ष चंद्रकांत शिरोळे, सेक्रेटरी शिरीष लोखंडे यांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्सवाचे नियोजन केले आहे. यानिमित्ताने मंदिराला आकर्षक विद्युतरोषणाई देखील करण्यात आली आहे.

रविवारी सकाळी ६ वाजता आढाव बंधू यांचे सनईवादन झाले. त्यानंतर सकाळी ७ वाजता समाधीस अभ्यंगस्नान, पूजा, श्री सद्गुरु जंगली महाराज भजनी मंडळाचे भजन आणि आरती करण्यात आली. शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२५ पर्यंत दररोज जंगली महाराज मंदिरात होणा-या उत्सवात धार्मिक कार्यक्रम, भजने, व्याख्याने आणि संगीत सभा होणार आहेत.

भाविकांनी उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



पुणे श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणेच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३५ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येतो. उत्सवाला महाराजांच्या समाधीस अभ्यंगस्नान घालून पूजेने प्रारंभ झाला.

# अवीट सुरावटींनी उजाडली पाडव्याची 'सुरेल पहाट'



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'ओंकार स्वरूपा, सद्गुरू समर्था' भजन असो की, 'देवाचिये द्वारी, उभा क्षणभरी' हरिपाठ, 'बाजे रे मुरलीया बाजे' हे पटदीप रागातील भजन असो की, 'मोगरा फुलला' भावगीत, 'मेघा रे मेघा रे', 'चिंब पावसानं रान झालं' अशा अजरामर गीतांच्या अवीट सुरावटींनी गुढी पाडव्याची सुरेल पहाट उजाडली.या विशेष संगीत मैफलीने पुणेकरांना भक्तिरसात न्हाल्याचा आनंद दिला.

मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी गीत-संगीताने नटलेल्या गायिका मनीषा निश्चल्स महक प्रस्तुत 'सुरेल पहाट' या सांगीतिक मैफलीचे गेट सेट गो हॉलिडेज व पूना गेस्ट हाऊस यांच्या वतीने आयोजन केले होते. कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारच्या भल्या पहाटे पुणेकरांनी 'सुरेल पहाट'ची ही पर्वणी अनुभवली. पद्मश्री सुरेश वाडकर, पंडित रघुनंदन पणशीकर व गायिका मनीषा निश्चल यांच्या सुमधुर गायनाने उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

- शास्त्रीय, उपशास्त्रीय, अभंग व भक्तिसंगीताच्या सुरावटींनी पहाटेचे वातावरण भारावून गेले.
- पं रघुनंदन पणशीकर यांनी शास्त्रीय रचनांमधून पहाटेच्या रागांचा सुरेल आविष्कार घडवला.
- सुरेश वाडकर यांनी 'ओंकार स्वरुपाने' ने स्वतःच्या गायनाची सुरुवात केली.
- मनीषा निश्चल यांनी गायलेल्या अजरामर गीतांना 'वन्स मोअर'ची दाद मिळाली.
- प्रसिद्ध गीतांनी पद्मश्री सुरेश वाडकर यांनी मैफल टिपेला नेली.
- सुरेश वाडकर व मनिषा निश्चल यानी गायलेल्या युगुलगीतांना श्रोत्यांनी वन्समोअरसह टाळ्यांची उत्स्फूर्त दाद दिली.



## आ. महेश लांडगेंचा शाश्वत विकासाचा संकल्प

**भोसरी :** 'चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या अर्थात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी निवासस्थानी तसेच जनसंपर्क कार्यालयासमोर गुढी उभारत पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासाचा संकल्प सोडला. आगामी काळात हिंदू धर्माचा जाज्वल्य अभिमान बाळगत शहर विकासासाठी भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून चांगल्या संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

धर्म रक्षणाची साद घालणारा, मराठी अस्मिता सांगणारा, नवचैतन्याची उभारी देणाऱ्या हिंदू नववर्षाच्या पहिल्या दिवशी अर्थात गुढीपाडव्याच्या निमित्ताने शहर विकासाचा संकल्प केला आहे. पिंपरी-चिंचवड शहराला मोठे "पोटेन्शिअल" आहे. या शहराचा विकासाचा वेग लक्षात घेऊन त्या दृष्टीने नियोजन आणि अंमलबजावणी योग्य रितीने व्हावी या दृष्टीने लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याचा संकल्प आहे, असे मत आमदार भोसरी विधानसभा महेश लांडगे यांनी व्यक्त केले.

## भोसरी एमआयडीसीत गांजा विक्री करणाऱ्या महिलेला अटक



**भोसरी :** भोसरी एमआयडीसीत गांजा विक्री करणाऱ्या एका महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. या महिलेकडून २ लाख ८२ हजार रुपये किंमतीचा पाच किलो ८०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. ही कारवाई एमआयडीसी भोसरी पोलिसांनी शनिवारी (दि.२९) केली आहे. या प्रकरणी एमआयडीसी भोसरी येथे राहणाऱ्या ३९ वर्षीय महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार रवी नाडे यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

एमआयडीसी भोसरी मधील सेक्टर नंबर १२ येथे एक महिला गांजा विक्रीसाठी आल्याची माहिती एमआयडीसी भोसरी पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडून २ लाख ८२ हजार रुपये किमतीचा ५ किलो ८०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला आहे. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

## 'मॉक टेस्ट' परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पिंपरी चिंचवड :** संपूर्ण राज्यात युवासेना तर्फे राबवण्यात येणाऱ्या 'मॉक टेस्ट' परीक्षा उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड शहर युवासेना तर्फे देखील हा उपक्रम राबविण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड शहर युवासेनेच्या वतीने राबवण्यात येणारी मॉक टेस्ट परीक्षा नव महाराष्ट्र विद्यालय जुनियर कॉलेज पिंपरी वाघेरे याठिकाणी घेण्यात आली. सदर परीक्षेस शहरातील ३१० विद्यार्थ्यांनी रजिस्ट्रेशन केले होते. परीक्षेस आलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या 'मॉक टेस्ट' परीक्षेचे आयोजन पिंपरी चिंचवड युवासेना शहरप्रमुख शहरप्रमुख चेतन पवार यांनी केले होते.

## भूमिपूजन



चऱ्होली **भगवा ध्वज :** चऱ्होलीतील थोरल्या पादुका मंदिराजवळ २०० फुटी उंच भगवा ध्वज उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायातील विविध मान्यवर, थोरल्या पादुका मंदिर समितीचे पदाधिकारी, भाजपचे पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

## शिवप्रेमी, ग्रामस्थांच्या उपस्थितीत भूमिपूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** भगवा ध्वज अखंड हिंदुस्थान, शौर्य, त्याग, बलिदान आणि स्वामिनाचे प्रतिक आहे. प्रभू श्रीरामांची, वैष्णव बांधवांची विद्वत्ता, महानता सांगणारे हिंदू धर्माचे निशाण आणि वारकरी सांप्रदायाची पताका आहे, असा भगवा ध्वज पिंपरी-चिंचवड शहरात दिमाखात व अभिमानाने फडकला पाहिजे, अशी समस्त वैष्णव बांधव, हिंदुत्ववादी संघटना, शिवशंभु प्रेमींची इच्छा होती. अखेर गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर या मागणीला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून, चऱ्होलीतील थोरल्या पादुका मंदिराजवळ २०० फूट उंच भगवा ध्वज प्रत्येकाला हिंदू संस्कृतीचा, हिंदुत्ववादी जाज्वल्य अभिमानाचा संदेश देत राहील, अशा भावना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.

चऱ्होलीतील थोरल्या पादुका मंदिराजवळ २०० फुटी उंच भगवा ध्वज उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायातील विविध मान्यवर, थोरल्या पादुका मंदिर समितीचे पदाधिकारी, भाजपचे पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

# थकबाकीदारांवर कारवाईचा बडगा कायम

### ३१ मार्च पूर्वी कराचा भरणा करून जप्तीची कारवाई टाळा; महापालिकेचे आवाहन



"शहरातील थकबाकीदारांना वारंवार आवाहन करूनही ज्या थकबाकीदारांनी अद्यापही थकीत कराचा भरणा केला नाही अशा मालमत्ता कोणत्याही क्षणी जप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून आत्तापर्यंत १०६९ मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून जवळपास १०२० मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्यात आले आहे. थकबाकीदारांनी आपल्या कराचा तात्काळ भरणा करून जप्तीची कटू कारवाई टाळावी. ज्यांचा कर थकीत आहे अशांनी तात्काळ कराचा भरणा करावा असे मी आवाहन करतो आहे."

**-प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त (1)

- आत्तापर्यंत तब्बल १०६९ हून अधिक मालमत्तांवर मालमत्ता जप्तीची कारवाई व जवळपास १०२० मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्यात आले आहे.
- त्याबरोबरच ४३४ मालमत्ता लिलावाच्या उंबरठ्यावर असून सदर मालमत्तांचा तात्काळ लिलाव सुद्धा करण्यात येणार आहे.
- त्यामुळे थकबाकीदारांनी ३१ पूर्वीच आपल्या थकीत कराचा भरणा करून कटू कारवाई टाळावी. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.

### कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर कारवाई करणार



#### कॅश काउंटर्स रात्री १२ पर्यंत खुली राहणार..

- नागरिकांच्या सोयीसाठी करसंकलन विभागाने शहरातील १८ विभागीय करसंकलन कार्यालये व कॅश काउंटर्स खुली ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. सकाळी ९.४५ ते रात्री १२ पर्यंत कॅश काउंटर्स खुली असून नागरिकांनी आपला कर भरण्यासाठी पुढाकार घ्यावा. असे आवाहन सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.

**पिंपरी :** आर्थिक वर्ष संपण्यास अवघे दोन दिवस बाकी असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ताधारकांना तात्काळ कर भरण्याचे आवाहन केले आहे.

त्यासोबतच थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाईस वेग आला असून ज्या मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरला नाही अशा मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्यात येत आहे. वारंवार आवाहन करूनही थकबाकीदारांनी मालमत्ताकर भरण्याकडे दुर्लक्ष केल्याने ऐन सणासुदीच्या काळामध्ये करसंकलन विभागाला कटू कारवाई करण्याची वेळ आली आहे.

## नाटक साहित्यासोबतच चित्रकला रुजते



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आकुर्डी :** महाराष्ट्रात नाटक, कला,संगीत, साहित्य रुजले. यासोबतच आता चित्रकला रुजत आहे. याचे श्रेय डी वाय पाटील कॉलेजला जाते. याचा मला आंनद आहे. असे उदगार ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांनी काढले. आकुर्डी येथील डॉ डी वाय पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्टस् अँड क्राफ्ट्सच्या वतीने श्री. फडणीस यांना डॉ डी वाय पाटील जीवनगौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. पुण्यातील बालगंधर्व आर्ट गॅलरीमध्ये भरविण्यात आलेल्या आकृती वार्षिक कला प्रदर्शनाचे उदघाटन सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर डी वाय पाटील शैक्षणिक संकुलाचे संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम, प्राचार्य जयप्रकाश कलवले, समन्वयक प्रा शंकर अढेराव,जनरल सेक्रेटरी आयेशा शेख आदी मान्यवर उपस्थित होते. श्री पालव म्हणाले, भारतीय कला विश्वात दोन स्तंभ आजही कार्यरत आहे. एक शिल्पकार राम सुतार तर दुसरे शि द फडणीस आहे. मनाचा जो स्पर्श आहे तो तंत्रज्ञानात नाही. त्यामुळे कला जोपासताना तंत्रज्ञानाचा वापर टाळला पाहिजेत.

"चित्रकारांच्या रेषा बोलतात त्यामुळे साहित्यात चित्राला स्थान मिळाले. व्यंग चित्रातून विनोद निर्मिती होते. मी केवळ छंद म्हणून चित्रकला जोपासायची असं ठरवलं होत. नंतर मात्र या कलेचे समर्थ्य ओळखले. यातील विविध छटाअसून निखळ आनंद देणारी कला आहे. यामुळे मी यात रमलो. चित्रकला जोपासताना ए आय सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर टाळून स्केच बुकच्या माध्यमातूनच चित्र साकारावे.

**— ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द. फडणीस**

# कारागृहातील १५ कैद्यांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** सांगवी येथील जिल्हा रुग्णालय औंध च्या वतीने मध्यवर्ती खुले कारागृह येरवडा व समता फौंडेशन यांच्या सहकार्याने जिल्हा मध्यवर्ती खुले कारागृह येरवडा येथे मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये १५ मोतीबिंदू रुग्ण आढळून आले असून त्या सर्व १५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया नुकतीच जिल्हा रुग्णालय औंध येथे सिव्हील सर्जन डॉ. नागनाथ यमपल्ले, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ लव्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नेत्रशल्य चिकित्सक डॉ. अंजली कुलकर्णी आणि डॉ. प्रज्ञा निकम यांनी यशस्वीरित्या केल्या. यावेळी जिल्हा नेत्र शल्यचिकित्सक डॉ कुलकर्णी म्हणाल्या, या कैद्यांची येरवडा कारागृहात जावून तपासणी केल्यावर मोतीबिंदूमुळे दृष्टी कमी झाली होती.

या मोतीबिंदूचे काचबिंदूत रूपांतर होऊन कायमचे अंधत्व आले असते. मग माणुसकीच्या नात्याने त्यांना कायद्याच्या चौकटीत बसवून कडक बंदोबस्तात रुग्णालयात आणण्यात आले.

हे कैदी ६० ते ७५ या वयोगटातील होते. त्यातील बरेच जण जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. यांच्या शास्त्रक्रियेसाठी कुणीच पुढे येत नव्हते. मात्र आम्ही रुग्णसेवा हीच ईश्वर मानून १५ कैद्यांची शास्त्रक्रिया केली.

## पवना नदीत बुडून युवकाचा मृत्यू

**सोमाटणे :** पवनानदीत पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (ता.२८) दुपारी बेबडओहोळ येथे घडली. गोविंद राजभरी (वय ३८) असे मृत्यू झालेल्याचे नाव आहे. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते बुडाले. बराच वेळ तो बाहेर न आल्याने मित्रांनी शोधाशोध केली, परंतु ते सापडला नाहीत. पोलिसांनी वन्यजीव रक्षक मावळचे संस्थापक नीलेश गराडे यांच्या पथकाच्या मदतीने शोध घेऊन मृतदेह पाण्याबाहेर काढला.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका हवेली, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे हद्दीतील गाव मौजे पिंपरी वाघेरे येथील सर्वे नं. १०२ / १अ /१अ / १० यांसी सिटी सर्वे नं. ५१५३, ५१५३/१, ५१५३/२, सर्वे नं. १०२/१/१/१अ/१६ यांसी सिटी सर्वे नं. ५१५०, सर्वे नं. १०२ /१/१//१अ/१५ यांसी सिटी सर्वे नं. ५१४९, सर्वे नं. १०१/१अ/१अ/१अ/१अ/१ब यांसी सिटी सर्वे नं. ५१५१, ५१५१/१ मधील शंकेश्वर पॅलेस को-ऑप हौसिंग सोसायटी लि. या इमारत ए बिल्डिंग मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ए-२०२, ही मिळकत सुदेश गजकुमार शाह यांच्या मालकी वहिवाटीच्या असून सुदेश गजकुमार शाह यांचे दिनांक २४.०४.२०२१ रोजी निधन झाले असे. त्यांना श्री. अक्षय सुदेश शाह (मुलगा) व श्रीमती पौर्णिमा सुदेश शाह (पत्नी) यांच्या व्यतिरिक्त कोणीही इतर वारस नाहीत. सबब सदर मिळकतींमध्ये अन्य कुणाही व्यक्तीचा गहाण दान, लीन, लीस, करार, बक्षीस, मदार ई. कोणत्याही प्रकारचे, कसलेही, हक्क - हीतसंबंध, अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात, अस्सल कागदपत्रांनिशी आमची तशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकती हया निर्वेध व निजोखमी असल्याचे मान्य करून, सदर मिळकतींमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हीतसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे, असे गृहीत धरले जातील त्यापश्चात कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/३/२०२५

**सीमा काशीराम तोडकरी**
**ॲडव्होकेट**
ऑफिस नं. १०५, पहिला मजला, साई चेंबर, साई मंदिर जवळ, शिवाजी नगर, पुणे ४११००३, दूरध्वनी क्रमांक. ८०८७९६२४७३/८३२९८०४०४२


# नद्यांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांची एकजूट

### 'मानवी साखळी'द्वारे जनजागृती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी :** 'रिव्हर कन्झर्वेशन' आणि 'दुर्गा टेकडी मिशन'च्या वतीने निगडीतील दुर्गा टेकडीवर मानवी साखळीच्या माध्यमातून नदी विकास, टेकडीवरील जलकुंभाच्या प्रकल्पाला विरोध केला. या आंदोलनात २५० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. सकाळी व्यायामासाठी आलेल्या नागरिकांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला.

दुर्गा टेकडीवरील निसर्गसंपन्न जागांचे संरक्षण आणि पर्यावरणाच्या ऱ्हासास प्रतिबंध घालण्यासाठी जागरूक नागरिकांनी एकत्र येत 'मानवी साखळी' तयार केली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नदी विकास प्रकल्पासह इतर पुनर्विकास योजनांचा निषेध करण्यासाठी हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. या आंदोलनात २५० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी व्यायामासाठी आलेल्या नागरिकांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. त्यांनी पर्यावरण रक्षणाचे संदेश असलेले फलक हातात घेतले आणि समाजमाध्यमांवर छायाचित्रे शेअर करून जनजागृती केली.



संपादकीय विशेष

# अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा गैरफायदा नेहमीचाच

गेल्या काही वर्षांमध्ये लोकांच्या, विशेषतः वेगवेगळ्या समूहच्या संवेदना फारच टोकाच्या आणि तीव्र झाल्या आहेत. राजकीय नेते आणि त्यांचे समर्थक तर अतिशय संवेदनशील झाले आहेत. इतरांवर टीका करायची आणि इतरांनी टीका केली की त्यांच्या समर्थकांनी कायदा हातात घ्यायचा, ही वृत्ती वाढली आहे. राजकीय व्यक्तींवर व्यंग्यात्मक टीका असो किंवा विशिष्ट समुहाला न आवडणारे विनोद; हे कॉमेडियन्स बऱ्याचदा चर्चेचा विषय राहिले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांबद्दल राज्यपालांसह अनेक महनीय व्यक्तींनी अनुद्गार काढले. चर्चेत राहण्यासाठी जणू त्यांनी जीभ सैल सोडली. राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर यांच्यासह अनेकांना जसा कुणाच्याही भावना दुखावण्याचा अधिकार नाही, तसाच त्यांनी चूक केली म्हणून कायदा हातात घेऊन न्याय करण्याचा अधिकारही कुणालाच नाही. भारतीय राज्यघटनेत अभिव्यक्तीस्वातंत्र्य, न्याय आदींबाबत स्पष्टता आहे.



अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्यावरची टीका ही सुधारणा मानली. शरद पवार यांच्यावर बाळासाहेब ठाकरे यांनी किती तरी व्यंगचित्रे काढली. दोघेही वेगवेगळ्या पक्षात होते, तरीही पवार यांनी ठाकरे यांच्या व्यंगचित्रांना कधीच वाईट म्हटले नाही. ठाकरे कुटुंबात तर बहुतेक लोक कलेशी संबंधित. कुणी व्यंगचित्रकार, कुणी फोटोग्राफर तर गीतकार. कलाकारांना अभिव्यक्तीस्वातंत्र्य असल्यास त्यांच्या कलाकृती अभिजात बनतात. परवा मात्र बाळासाहेबांच्या विचारांवर आणि पक्षावर दावा सांगणाऱ्यांना मात्र विडंबन रुचले नाही. कामरा याच्यासारख्या सुमार विडंबनकाराचे भांडवल करून, स्टुडिओची तोडफोड करून शिवसैनिकांनी कायदा हातात घेतला. अर्थात राज्यघटनेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उल्लेख केला असला, तरी त्यात या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होणार नाही, याची दक्षता घेण्यासही बजावले आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्य मिळाले, म्हणजे इतरांची मानहानी करण्याचा परवाना मिळाला असे नाही.

अलिकडेच कुणालने एका प्रसिद्ध गाण्याचे विडंबन करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गद्दार असा उल्लेख केला. यानंतर शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनी यावर आक्षेप घेतला आणि मुंबईतील ‘द हॅबिटॅट कॉमेडी क्लब’ची मोडतोड केली. या प्रकरणी कामराविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला. कामरा यापूर्वीदेखील वादाच्या केंद्रस्थानी राहिला आहे. पत्रकार अर्णब गोस्वामी यांच्याशी हुज्जत घातल्याप्रकरणी त्याच्यावर काही विमान कंपन्यांनी बंदी घातली होती. न्यायव्यवस्थेवर टीका करणारी पोस्ट केल्यानेही त्याच्यावर कारवाई करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अंबानी आणि अदानी यांच्यावर टीका केल्याचे परिणाम त्याला भोगावे लागत आहेत. अलिकडेच समैय रैना याच्या ‘इंडियाज गॉट लेटंट’ या कार्यक्रमाचा एका भाग व्हायरल झाला आणि त्याच्यावर कायदेशीर कारवाईची मागणी होऊ लागली. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या रणवीर अलाहबादिया याने एका स्पर्धकाला त्याच्या आई-वडिलांबद्दल आक्षेपार्ह प्रश्न विचारला. त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. यानंतर कार्यक्रमाच्या आयोजकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. इतकेच नाही, तर रणवीरला चौकशीसाठी बोलवण्यात आले आणि त्याचा पासपोर्टदेखील जप्त करण्यात आला. या प्रकरणाचे पडसाद संसदेत उमटले. सर्वोच्च न्यायालयाने त्याला कडक शब्दांमध्ये समज दिली. मुनव्वर फारुकी याला 2021 मध्ये इंदूरमध्ये अटक करण्यात आली होती. त्याच्यावर हिंदू देवता आणि अमित शाह यांच्याबद्दल आक्षेपार्ह विनोद केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता.

‘एआयबी’चा सह-संस्थापक तन्मय भट याने 2016 मध्ये एपीजे. अब्दुल कलाम, सचिन तेंडुलकर आणि लता मंगेशकरसारख्या दिग्गजांची फेस फिल्टर वापरून नक्कल करणारे स्नॅपचॅट व्हिडीओ बनवले होते. यावरून त्याच्यावर सडकून टीका करण्यात आली. 2021 मध्ये वीर दास याच्या वॉशिंग्टनच्या केनेडी सेंटरमध्ये पार पडलेल्या ‘टू इंडियाज’ या मोनोलॉगने खळबळ उडवून दिली होती. तेव्हा वीर दासने दाखवून दिलेल्या भारतामधील विरोधाभासांचे अनेकजणांनी कौतुक केले होते, तर अनेकांनी परदेशात जाऊन भारताची प्रतिमा मलिन केल्याचा आरोप केला होता. यानंतर त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाई करत त्याने माफी मागावी अशी मागणी करण्यात आली. आताही कामरा याच्या माफीची मागणी करण्यात आली. राहुल सोलापूरकर याच्यासह अनेकांनी त्यांच्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल माफी मागूनही त्यांच्याविरोधातील वक्तव्ये कमी झाली नव्हती, हे ही येथे दखलपात्र आहे.

गेल्या काही दिवसांपासून महापुरुषांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य, ‘सोशल मीडिया’ पोस्ट करण्यावरून राज्याचे राजकारण तापले आहे. आता तर संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह मजकूर असलेली जुनी पुस्तके, नाटके आणि चित्रपटांवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. यात राजसंन्यास ही राम गणेश गडकरी यांची कादंबरी तसेच रायगडाला जेव्हा जाग येते, थोरातांची कमळा, बेबंदशाही, प्रणयी युवराज, स्वप्न भंगले रायगडाचे आणि इथे ओशाळला मृत्यू यासारख्या ऐतिहासिक गाजलेल्या नाटकांचा समावेश आहे. छत्रपती संभाजी महाराजांबद्दलच्या अवमानकारक मजकुरावर कायमस्वरूपी बंदी आणण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे मंत्र्यांनी सांगितले. यामध्ये विकिपीडिया, यूट्युब आणि समाजमाध्यमांवरील महापुरुषांबाबतचा आक्षेपार्ह मजकूर काढून टाकण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यनिर्मितीसाठी चरित्र साधने समिती नेमण्याबाबत सरकार सकारात्मक भूमिका घेत असले, तरी इतिहास आणि साहित्य यात फरक असतो, हे भांडवल करणाऱ्यांना आणि सरकारला ही कळत नाही. अशा पद्धतीने साहित्यावर बंदी घातल्यास एक काळ गाजवणाऱ्या साहित्यकृती स्मृतीतून कायमच्या नष्ट होतील आणि लेखकाचे कल्पनास्वातंत्र्य हा मुद्दा लक्षात घेतलाच जाणार नाही. त्यात वसंत कानेटकर, राम गणेश गडकरी यांची ऐतिहासिक नाटकेही आहेत. अर्थात लेखकाच्या कल्पनास्वातंत्र्याचा मुद्दा रास्त मानला, तरी लेखकांनी महापुरुषांच्या चारित्र्याचे हनन करू नये किंवा आदर्शांना विकृत दाखवण्याचा प्रयत्न करू नये, हे ही खरेच.

# या कर्जबाजारीपणाचे करायचे काय?

**बँकांना दर वर्षी कृषी कर्जवाटपाचे लक्ष्य ठरवून दिले जाते. २०२४-२५ मध्ये ते २० लाख कोटी रुपये होते, परंतु ते जानेवारी महिन्यातच पूर्ण करण्यात आले. शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत अल्प मुदतीच्या कर्जासाठी सात टक्क्यांपेक्षा कमी व्याजदराने कर्ज देण्यात येते. त्यातही वेळेत परतफेड केल्यास, तीन टक्के व्याजदरात अतिरिक्त सूट दिली जाते. मात्र तरीही देशातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा का वाढत आहे?**

परामर्श (2-1)
हेमंत देसाई
ज्येष्ठ पत्रकार





गेल्या दहा वर्षांमध्ये बँकांनी वाटप केलेल्या कृषी कर्जामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. २०१३-१४ या आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना ७ लाख ३० हजार कोटी रुपयांची कर्जे देण्यात आली होती. आता हा आकडा २०२३-२४ या आर्थिक वर्षात २० लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. बँकांना दर वर्षी कृषी कर्जवाटपाचे लक्ष्य ठरवून दिले जाते. २०२४-२५ मध्ये ते २० लाख कोटी रुपये होते, परंतु ते जानेवारी महिन्यातच पूर्ण करण्यात आले. शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत अल्प मुदतीच्या कर्जासाठी सात टक्क्यांपेक्षा कमी व्याजदराने कर्ज देण्यात येते. त्यातही वेळेत परतफेड केल्यास, तीन टक्के व्याजदरात अतिरिक्त सूट दिली जाते. मात्र तरीही देशातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे. आज देशातील शेतकऱ्यांकडे ३३ लाख ५० हजार कोटी रुपयांचे कर्ज थकित असून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडे सात लाख ३८ हजार कोटी रुपयांची कर्जे थकलेली आहेत, अशी माहिती केंद्रीय वाणिज्यमंत्र्यांनी नुकतीच लोकसभेत दिली. शेड्युल्ड व्यापारी बँकांनी दिलेल्या क्रेडिट कार्डांवरील थकबाकीचे प्रमाण ४२ टक्क्यांनी वाढले आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत ९७,५४३ कोटी रुपयांची कर्जे थकित होती. हेच प्रमाण मार्च २०२१ मध्ये ६८,५४७ कोटी रुपये इतके होते, अशी माहिती सरकारने दिली आहे.

सर्वसाधारण किरकोळ कर्जांमध्ये ९० दिवसांपेक्षा जास्त दिवस मुद्दल वा व्याजाची रक्कम थकल्यास ते थकित कर्ज किंवा एनपीए असल्याचे मानले जाते. मात्र किसान क्रेडिट कार्डांतर्गत घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी हा पीक हंगामावर अवलंबून असतो. या हंगामाचा काळ राज्यस्तरीय बँकिंग समिती निश्चित करते. कमी दिवसांच्या पिकांचा हंगाम एक वर्षाचा आणि दीर्घ मुदतीच्या पिकांचा हंगाम सामान्यतः दीड वर्षाचा मानला जातो. कर्जवाटपानंतर किसान क्रेडिट कार्डाचे कर्ज तीन वर्षात फेडले न गेल्यास खाते एनपीए होते. गेल्या काही वर्षांमध्ये शेती सोडून ग्रामीण भागातून उद्योग-व्यवसायासाठी शहरात जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. कारण दिवसेंदिवस शेती आतबट्ट्याची ठरू लागली आहे. एक तर शेतीची सरासरी उत्पादकता घटत चालली आहे. संपूर्ण भारतात शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्रफळ ६ लाख ४२ हजार हेक्टरने कमी झाले आहे. यात महाराष्ट्रातील सव्वा तीन लाख हेक्टर इतक्या शेतीक्षेत्राचा अंतर्भाव आहे. म्हणजे ५० टक्क्यांहून अधिक कृषिक्षेत्र हे एकट्या महाराष्ट्रातच घटले आहे. राष्ट्रीय महामार्ग, राज्याचे रस्ते आणि रेल्वेमार्ग यासारख्या पायाभूत सोयीसुविधांच्या विकासासोबतच शहरीकरण आणि औद्योगिकीकरणासाठी होणारा शेतजमिनीचा वापर वाढला आहे.

मागील पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रातील पेरणीचे क्षेत्रदेखील ३ लाख २४ हजार हेक्टरने कमी झाले आहे. कालबाह्य ठरत असलेले बी-बियाणे आणि उत्पादनपद्धती यामुळे प्रति हेक्टर उत्पादन कमी झाले वा खुंटले आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बियाणांचा पुरेसा पुरवठा होत नाही. त्यामुळे पिकांना कीड वा रोग लागून मोठे नुकसान होते. तसेच खते, कीटकनाशके, अवजारे, यंत्रे, इंधन आणि मजुरी यांचे दर मागील तीन वर्षांमध्ये ३० ते ५० टक्क्यांपर्यंत वाढले आहेत. सरकारचे वेगवेगळे अप्रत्यक्ष करही शेतकऱ्यांना भरावे लागत आहेत. शेतकऱ्यांना केंद्र आणि महाराष्ट्र सरकारकडून वर्षाला एकूण बारा हजार रुपयांची मदत मिळते. परंतु ती अत्यंत अपुरी आहे. ग्रामीण भागात मजुरांची चणचण असून मजुरीचे दर शेतकऱ्यांना परवडेनासे झाले आहेत. उत्पादनखर्च भरून निघेल, एवढे भावच शेतीमालाला मिळत नाहीत. उदाहरणार्थ, सोयाबीन शेतकरी आज अडचणीत आहे. शेतकऱ्यांना तोट्यातच शेती करावी लागत असून शेतीच्या आणि अन्य गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज काढावे लागत आहे.

शेतकऱ्यांची मुलेबाळे शहरांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी जातात. त्यासाठीही त्यांना कर्ज काढावे लागते. देशातील शेतकऱ्यांकडे ३३ लाख ५० हजार कोटी रुपयांचे कर्ज असून यात पीककर्जासह सर्व प्रकारच्या कर्जांचा समावेश आहे. यात सर्वाधिक कर्ज आहे, ते महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या डोक्यावर. महाराष्ट्रानंतर क्रमांक लागतो तो तामिळनाडूचा. तेथील दोन लाख ८८ हजार कृषी खातेधारकांकडे सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांचे कर्ज थकित आहे. त्यानंतर आंध्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगण व केरळ यांचा क्रमांक लागतो. या सर्व राज्यांमध्ये किमान १ लाख ४० हजार कोटी ते तीन लाख कोटी रुपयांच्या कर्जाची थकबाकी आहे. शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी हेक्टरी कृषी उत्पादकता वाढवणे, शेतकऱ्यांच्या कंपन्या स्थापन करणे, कृषी प्रक्रिया उद्योगांना उत्तेजन देणे अशा अनेक आघाड्यांवर सरकारला काम करावे लागेल.

खरे तर, गेल्या दशकात १८ राज्यांमध्ये कृषी कर्जमाफीमुळे कृषी बँकांचे एनपीए ३०-८५ टक्क्यांनी वाढले आहे. युनियन बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि एसबीआयसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी कृषी एनपीए २५ टक्क्यांच्या जवळपास नोंदवले आहेत, तर खासगी बँकांसाठी ते फक्त चार टक्के आहे. यामुळे बँका खरोखरच कर्जाची गरज असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्ज देण्यास कचरतात. हे अर्थव्यवस्थेसाठी चांगले चित्र नाही. बँका ‘एनपीए’मुळे ओझ्याखाली दबल्या जातात आणि सरकार त्या न भरलेल्या शेती कर्जाची भरपाई करण्यासाठी पाऊल उचलते, तेव्हा कर महसुलातून तो खर्च भागवला जातो. पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा किंवा शिक्षण यासारख्या गोष्टींसाठी वापरलेला पैसा कर्जमाफीत जातो. यामुळे सरकारच्या बजेटवर ताण येतो आणि त्यांना तूट येते. म्हणजेच तरतुदीपेक्षा जास्त रक्कम खर्च होते. ही तूट भरून काढण्यासाठी सरकारे अधिक कर्ज घेतात. त्यामुळे दोन गोष्टी होतात. एक म्हणजे, ते वास्तविक वाढीला पाठिंबा न देता प्रणालीमध्ये अधिक पैसे जमा करते. त्यामुळे महागाई वाढते आणि दुसरे म्हणजे सरकार निधीसाठी खासगी क्षेत्राशी स्पर्धा करत असल्याने खासगी व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध होणे कठीण होते. व्याजदर वाढल्याने कर्ज घेणे महाग होते आणि आर्थिक वाढ मंदावते. अर्थतज्ज्ञ आणि अगदी रिझर्व्ह बँकदेखील शेती कर्जमाफीचे समर्थक नाहीत. ते अर्थव्यवस्थेचे योग्य व्यवस्थापन करण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या क्षमतेशी गोंधळ घालू शकतात.

तज्ज्ञ तमल बंदोपाध्याय यांच्या एका स्तंभातील हे मनोरंजक उदाहरण घ्या. एका अज्ञात भारतीय राज्यातील एका वरिष्ठ मंत्र्याने बँकांना शेतकऱ्यांना कर्ज देण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला तेव्हा रिझर्व्ह बँकेने कसा हस्तक्षेप केला, याचा उल्लेख त्यांनी केला आहे. शेतकऱ्यांचे क्रेडिट स्कोअर तपासल्याशिवाय कर्ज मंजूर व्हावे, अशी मंत्र्यांची इच्छा होती. आणि हे एका राजकीय पक्षाने कर्ज वसूल करणाऱ्या एजंटांना कर्ज बुडवलेल्या शेतकऱ्यांकडून पैसे गोळा करण्यापासून रोखल्यानंतर घडले. शेती कर्जमाफीचा खरा फायदा शेतकऱ्यांना नाही, तर अर्थव्यवस्थेला होतो. पण मते मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पक्षांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा प्रत्यक्षात येतात. याचा अर्थ असा होतो की राजकीय पक्षांकडे शेतकऱ्यांना मदत करण्याचा यापेक्षा चांगला मार्ग नाही? खरं तर, आहे. राजकारण्यांना खरोखर काळजी असेल, तर ते कृषी संशोधन आणि विकास (आर अँड डी) प्रकल्पांमध्ये अधिक गुंतवणूक करू शकतात. २०२३ मध्ये हे कर्ज भारताच्या जीडीपीच्या फक्त ०.४ टक्के होते. गेल्या काही वर्षांमध्ये ही संख्या कमी होत चालली असून खऱ्या कृषी प्रगतीला अडथळा ठरू शकते. ब्राझीलसारखे देश त्यांच्या ‘जीडीपी’च्या सुमारे १.८ टक्के रक्कम शेती संशोधन आणि विकासात गुंतवतात, तर चीन ०.६ टक्के रक्कम गुंतवणूक करतो. राजकीय पक्षांनी ही गुंतवणूक वाढवण्याचे आणि शेतकऱ्यांच्या या प्रयत्नांना यश येईपर्यंत थेट उत्पन्न आधार देण्याचे आश्वासन दिले, तर कदाचित त्याचे खरे, दीर्घकालीन फायदे होतील. ते केवळ शेतकऱ्यांसाठीच नसतील, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी असतील.

## खेचाखेची

### बघा ना...!

**बायको :** अहो चला की रावणाचा पुतळा बघायला.

**नवरा :** अगं मी काय लहान आहे का आता?

**बायको :** नाही... पण बघा ना दुसऱ्याच्या बायकोकडे बघितलं की काय हाल होतात ते...

## सुप्रभात — वेगळं काही


चीनमधल्या एका कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांना बोनस दिला, तोही रोख रकमेत. कंपनीने एवढे पैसे वाटले की कर्मचारी गोण्या आणि पोत्यांमधून घेऊन गेले. फंगदा स्पेशल स्टील टेक्नॉलॉजी असं या कंपनीचं नाव. ती अनोख्या बोनससाठी प्रसिद्ध आहे. कंपनीने बोनस म्हणून १६३ कोटी रूपये वाटले. या कंपनीत पाच हजार कर्मचारी आहेत. त्यांना प्रत्येकी साडेतीन लाख रूपये मिळाले. निवृत्त कर्मचाऱ्यांनाही कंपनीने बोनस दिला. बोनस म्हणून वाटलेल्या पैशांचं वजन दोन टन इतकं होतं. गेल्या सात वर्षांमध्ये बोनस म्हणून कंपनीने १६३० कोटी रूपये वाटले आहेत. कंपनीचं वार्षिक उत्पन्न ८२ हजार कोटी रूपये आहे. त्यामुळे त्यांना एवढा बोनस देणं शक्य होतं.

## गरज टॅल्कम पावडरची

स्मार्ट टिप्स

आता उन्हाचा कहार वाढतो आहे. पुढचे दोन महिने वाढत्या उष्म्याला सामोरं जाण्याखेरीज पर्याय नाही. त्यामुळे या काळात शरीराला येणारा घामाच्या दुर्गंधीचा बंदोबस्त करण्यासाठी उपाय योजायला हवे. याकामी टाल्कम पावडर उपयुक्त ठरु शकते. याखेरीज अन्य कामांसाठीही ती उपयुक्त ठरते. ✻ केस तेलकट असतील तर चांगला शॅम्पू यावरील उपाय ठरु शकतो. मात्र केस अति तेलकट असतील तर अतिरिक्त तेल शोषून घेण्यासाठी केसांच्या मुळांपाशी टाल्कम पावडर भुरभुरा आणि हलक्या हाताने स्क्रब करा. ✻ मस्कारा लावण्यापूर्वी पापण्यांवर टाल्कम पावडर भुरभरावी. यामुळे मस्कारा एकसारखा पसरतो. ✻ लिपस्टिक सेट करण्यासाठी आणि लाँग लास्टिंग इफेक्ट मिळवण्यासाठी टाल्कम पावडरचा उपयोग होतो. लिपस्टिक लावून झाल्यानंतर टिश्यू पेपरवर थोडी पावडर घ्या आणि हा पेपर ओठांवर दाबून धरा. आता परत लिपस्टिकचा हलका कोट द्या. यामुळे लिप कलर अधिक काळ टिकतो. ✻ वॅक्सिंग करण्यापूर्वी त्वचा मुलायम व्हावी या उद्देशाने टाल्कम पावडर लावली जाते. पावडरमुळे त्वचेचा ओलसरपणा कमी होतो आणि लव समुळ निघते.






## राशीभविष्य

- **मेष** : सारासारबुद्धी वापरा. तरुणांना जबाबदारीची समज द्या. विनाकारण अडचणीत गुंताल.
- **वृषभ** : कौटुंबिक गैरसमज दूर होतील. संततीच्या अपेक्षा पूर्ण कराल. अचानक अर्थप्राप्तीचे योग.
- **मिथुन** : नोकरीत सहकारी अडथळे निर्माण होतील. प्रिय व्यक्ती नाराज होईल. प्रवासात धोका.
- **कर्क** : घरात शुभकार्य होईल. ताणतणाव संपतील. करमणुकीत वेळ घालवाल.
- **सिंह** : मनावर ताबा ठेवणे कठीण होईल. कोणा एकाच्या हट्टीपणाचा त्रास होईल. आळस नुकसान करेल.
- **कन्या** : पैशाची आवक उत्तम राहील. कुटुंबाकडून उत्तम सहकार्य मिळेल. संततीबद्दल सुवार्ता कळतील.
- **तूळ** : शरीरावर अतिश्रमाचा परिणाम होईल. कोणास सल्ला देत बसू नका. खाण्यावर नियंत्रण ठेवा.
- **वृश्चिक** : मालमत्तेचा वाद मिटेल. जुनी येणी वसूल होतील. कार्यक्षेत्रात आवडीचा प्रोजेक्ट मिळेल.
- **धनु** : नातेवाईकांमुळे अडचणी निर्माण होतील. जुनी दुखणी त्रास देतील. खर्चात अनपेक्षित वाढ होईल.
- **मकर** : आर्थिक स्थिती बिकट राहील. प्रवास म्हणजे समस्या वाटेल. विवेकबुद्धी जागृत ठेवा.
- **कुंभ** : गोड बोलून कार्यभाग साधाल. सर्व बाबतीत आघाडी असेल. संकल्प सिद्धीस जातील.
- **मीन** : शासकीय कामास अनुकूल दिवस. आत्मविश्वास जागृत राहील. नवपरिणीतांचे प्रश्न सुटतील.

## सल्ला मोलाचा — सामान वाढतंय ?

घरात (आणि हो! पर्समध्ये) इतक्या वस्तू असतात, की गरजेच्या वेळी त्या नेमक्या सापडत नाहीत. विशेषत: लहान आकराचे दागिने तर हमखास हरवतात. कितीही व्यवस्थित ठेवले तरी दोन्ही कानातले एकत्र सापडतील याची खात्री नसते! पेअर शोधण्यात बराचसा वेळ जातो. हे टाळण्यासाठी बटनाचा उपयोग करा. बटनाच्या दोन छिद्रांमध्ये कानातले अडकवून ठेवल्यास एकत्र सापडतात. पर्समध्ये ठेवले तरी पटकन सापडतात. एक-दोन दिवस बाहेर जायचं असेल तर प्रसाधनांच्या मोठ्या बाटल्या नेणं जिकिरीचं ठरतं. विशेषत: क्रीम बेस्ड प्रसाधनं ओझं वाढवतात. अशा वेळी सोपा मार्ग अनुसरा. जाड आणि मोठ्या आकाराच्या स्ट्रॉ घ्या. तिची एक कड मेणबत्तीवर धरुन बंद करुन टाका. आता दुसरीकडून ट्यूबमधील अथवा बाटलीतील क्रीम त्यात घाला. हव्या त्या मात्रेत क्रीम घेतल्यावर स्ट्रॉचा उर्वरित भाग कापून दुसरी बाजूही मेणबत्तीवर धरुन बंद करा. या क्रीमवर तुमचे दोन-तीन दिवस सहज निघतील.

## ३१ मार्च — दिनविशेष

- **१७३२:** फ्रांझ जोसेफ हेडन या संगीतकाराचा जन्म.
- **१८०१:** पाणी शुद्धीकरणाचे तंत्रज्ञ समजले जाणारे थॉमस क्लार्क यांचा जन्म.
- **१८४३:** संगीत नाटकांचे आद्य प्रवर्तक, नाटककार बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म.
- **१९२७:** डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी मराठी महाराष्ट्र ज्ञानकोष पूर्ण केला.
- **१९७२:** प्रसिद्ध अभिनेत्री मीना कुमारी यांचं निधन.
- **२००४:** ख्यातनाम चित्रकार गणपतराव वडणगेकर यांचा मृत्यू.

## महत्त्वपूर्ण काही... — असा आहे मृत समुद्र

आपल्या पृथ्वीवर अनेक अविश्वसनीय रहस्यं आढळतात. काही ठिकाणी उष्ण पाण्याचे झरे आढळतात, तर काही ठिकाणी वस्तू गुरुत्वाकर्षणाच्या नियमाविरुद्ध वागताना आढळतात. मृत समुद्र अशाच रहस्यमयी प्रकारांपैकी एक. पोहता येत नसताना लाईफ जॅकेट न घालता तुम्ही समुद्रात पडला तर बुडणार हे नक्की. मात्र अशी कोणतीही खबरदारी न घेता या समुद्रात उडी मारली तरी कोणी बुडत नाही तर तरंगत राहतात. हा समुद्र जॉर्डन आणि इस्त्रायलच्या मध्ये असून त्यात कोणतेही जलचर अथवा जलवनस्पती जगू शकत नाहीत. म्हणूनच त्याला मृत समुद्र म्हणजेच ‘डेड सी’ म्हणून ओळखलं जातं. याचं दुसरं नाव ‘सॉल्ट सी’ असंही आहे. क्षारांचं प्रमाण सर्वाधिक असल्याने या समुद्राचं पाणी खूप खारट आहे. असं असलं तरी हे पाणी आणि यातील रेती अत्यंत औषधी आहे. या क्षारयुक्त लेपाने अनेक त्वचारोग नाहिसे होतात. मीठाची अतिरिक्त मात्रा असल्यामुळे सांधेदुखीवर इलाज होतो. या गुणधर्मांमुळेच या समुद्रात डुंबण्यासाठी जगभरातून लोक इथे येतात.

## आरोग्यमंत्र — गुणकारी तुरटी

तुरटी अनेक गुणकारी घटकांनी युक्त असते. म्हणूनच तिचे हे गुणधर्म जाणून घेणं महत्त्वाचं ठरतं. तुरटी म्हणजेच फिटकरी... दाढी केल्यानंतर थोडं कापलं असेल किंवा त्वचा सोलली गेली असेल तर ती बरी होण्यासाठी तुरटीचा वापर केला जातो. पावसाळ्यात पाणी स्वच्छ करण्यासाठी तुरटी वापरली जाते. तुरटी लाल आणि पांढरा या दोन रंगांमध्ये मिळते. बरेचदा पांढऱ्या तुरटीचा वापर केला जातो. अधिक घाम येण्याची समस्या असणाऱ्या लोकांनी अंघोळीच्या पाण्यामध्ये थोडी तुरटी मिसळावी. अंघोळीसाठी हे पाणी वापरल्यामुळे घाम येण्याचं प्रमाण कमी होतं. एखादी जखम होऊन रक्त येत असेल तर जखमेची जागा तुरटीच्या पाण्याने धुवावी आणि जखमेवर थोडीशी तुरटीची पावडर टाकावी. यामुळे रक्त वाहणं बंद होतं. तुरटी आणि काळी मिरी पावडर एकत्र करून दातांच्या मुळांवर घासल्यास दातदुखी कमी होते. चेहऱ्यावर तुरटी लावल्यामुळे चेहरा मुलायम होतो. अर्धा ग्राम तुरटी पावडर मधामध्ये मिसळून चाटल्यामुळे दमा आणि खोकल्यामध्ये आराम मिळतो. दररोज दोन्ही वेळा गरम पाण्यात तुरटी मिसळून गुळण्या केल्यानं दातांमधली कीड मरते तसंच तोंडाचा घाण वास दूर होतो. टॉनसिल्सची समस्या असेल तर गरम पाण्यात चिमुटभर तुरटी आणि मीठ टाकून गुळण्या कराव्या. एक लिटर पाण्यात १० ग्रॅम तुरटी मिसळून त्यानं केस धुतल्यास केसांमधल्या उवा मरतात. हे सर्व उपाय अवश्य करुन पहावे.



## पंचांग

**सोमवार, ३१ मार्च २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. २/३, रमजान ईद
नक्षत्र : अश्विनी, चंद्रराशी : मेष ,
योग : वैधृती
सूर्योदय : ६.३६, सूर्यास्त: ६.५०

## फॉरवर्डस

**बरेचदा इतरांचा विचार करण्यातच आयुष्य सरतं...**

कौन कैसा है ये ही फिक्र रही
तमाम उम्र,
हम कैसे हैं ये कभी भूल कर
भी नही सोचा।

## वाचा तर खरं

या राजवाड्यातला प्रत्येक स्तूप सोन्याच्या पत्र्याने मढवला आहे. तिबेटला मोठा धार्मिक वारसा मिळाला असल्याने प्रार्थनास्थळं मोठ्या संख्येत आढळतात. त्यापैकी एक म्हणजे जोखांग मंदिर. तिबेटी लोकांचं सर्वात मोठं श्रद्धास्थान म्हणून जोखांग मंदिर ओळखलं जातं. मंदिरात बौद्ध भिख्खूंचा एक मठही आहे. तिबेटमध्ये शॉपिंग करण्याची संधी चुकवू नका. तिबटी कलेचा वारसा सांगणाऱ्या वस्तू तुम्हाला बरखोर स्ट्रीटवर मिळतील. तिबेटी संस्कृती जवळून पहायची असेल तर तिबेट म्युझियमला भेट द्यायलाच हवी. इथे तिबेटचा इतिहास आणि भूगोल दोन्ही जाणून घेता येतील.

‘राष्ट्र संचार’ (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### तृणमूलची सत्ता राहिली तर हिंदूंचे अस्तित्व धोक्यात

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये २०२६ च्या विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसची सत्ता कायम राहिल्यास हिंदूंना एक दिवस अस्तित्वाच्या संकटाला सामोरे जावे लागेल, असा दावा भाजपचे ज्येष्ठ नेते शुभेंदु अधिकारी यांनी रविवारी केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री सुकांत मजुमदार यांनीही हिंदूंना संघटित व्हायला हवे, असे मत व्यक्त केले. मालदा जिल्ह्यातील मोथाबारी भागात गुरुवारी झालेल्या जातीय दंगलीच्या पार्श् वभूमीवर त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

### नितीश कुमार यांच्या निवासस्थानी शहा

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी राज्यातील एनडीएच्या घटक पक्षांसोबत विधानसभा निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा केली. जदयूचे प्रमुख असलेल्या आणि आगामी निवडणुकीत सलग पाचव्यांदा निवडणूक लढविणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या १, ॲन मार्ग येथे ही बैठक पार पडली. केंद्र आणि राज्य सरकारच्या आठ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या प्रकल्पांचा शुभारंभ करण्यात आलेल्या कार्यक्रमात नितीश कुमार यांच्यासमवेत व्यासपीठ सामायिक करणारे अमित शहा गोपालगंज मध्ये भाजपच्या सभेला संबोधित केल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या घरी पोहोचले.

# तमाशा पंढरीत बुकिंग फुल

## पाडव्याच्या मुहूर्तावर २०० हून अधिक करार, ५ कोटीहून अधिक उलाढाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** पाडव्याच्या मुहूर्तावर नारायणगावच्या तमाशा पंढरी मध्ये सगळ्याच बाऱ्या हाउसफुल बुकिंग झालेल्या पाहायला मिळाल्या. सुमारे पाच कोटी रुपयांची उलाढाल आजच्या दिवशी झाली असल्याची माहिती फड मालकांनी दिली. सुमारे 250 करार रविवारच्या दिवशी झाले असावेत, असा प्राथमिक अंदाज आहे.

दरम्यान, दरवर्षीपेक्षा यावर्षी मात्र पाडव्याच्या दिवशी काही प्रमाणात बुकिंगसाठी गर्दी कमी दिसून आली. पाडव्याच्या दिवशी तारखा खाली नसल्याने अनेकांनी काही दिवस आगोदर येऊन तमाशाच्या तारखा बुक झाल्याचे आढळून आले.

नारायणगाव ही तमाशाची पंढरी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात त्याची एक वेगळी ओळख आहे. या ठिकाणी फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून महाराष्ट्रातील विविध फड मालकांच्या राहूट्या लागत असतात. यंदाच्या वर्षी ३५ फड मालकांनी आपली कार्यालये या ठिकाणी थाटली आहेत. मागील वर्षी निवडणुकीचा माहोल असल्यामुळे तमाशाच्या फड मालकांना काही प्रमाणामध्ये आर्थिक फटका बसला होता. फारशी उलाढाल त्यावर्षी झाली नाही. यंदाच्या वर्षी मात्र तमाशाच्या बारीला चांगले दिवस असल्याचे पाहायला मिळत आहे. तमाशाचा फड लहान असो अथवा मोठा असो, पाडव्याच्या दिवशी सगळ्याच फड मालकांच्या तारखा हाउसफुल झाल्याच्या पाहायला मिळाल्या. अनेकांना आपल्या यात्रेची तारीख फड मालकाकडे खाली नसल्यामुळे हात हलवत परत जावे लागले. अथवा छोट्या फड मालकाच्या खेळावर समाधान मानावे लागले.

दरवर्षी नारायणगावच्या या तमाशा पंढरीमध्ये पाडव्याच्या दिवशी तमाशाच्या खेळ ठरवायला राज्यांमधून मोठ्या प्रमाणात तमाशा शौकीन येत असतात. एकाच दिवशी जास्त लोक या ठिकाणी बुकिंगला येत असल्यामुळे चांगल्या नामांकित फड मालकांच्या तारखा मिळण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अनेक गावकऱ्यांनी पाडव्याच्या दिवशी या ठिकाणी न येता अगोदरच येऊन नामांकित फड मालकांना सुपाऱ्या देऊन आपली यात्रांचे नियोजन केले आहे. अर्थात पाडव्याच्या अगोदर अनेकांनी सुपाऱ्या दिल्या असल्या, तरी पाडव्याच्या दिवशी देखील अनेक जिल्ह्यांमधून तमाशा प्रेमी या ठिकाणी बारी बुकिंगला आल्याचे पहायला मिळाले.

सातारा, सांगली, कराड, अहमदनगर, संगमनेर, पारनेर, अकोले, आंबेगाव, खेड, शिरूर, बीड, जालना, जळगाव, धुळे चाळीसगाव या भागातून देखील तमाशा प्रेमी या ठिकाणी गावच्या यात्रेला बारी ठरवायला आल्याचे पाहायला मिळाले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील तमाशा ही लोककला जतन करण्याचे काम प्रामुख्याने खेड्यातील यात्राप्रेमी करत असतात आणि त्यांच्यामुळेच आमची तमाशाची कला जिवंत आहे, हे सांगताना आम्हाला अजिबात कमीपणा नाही, अशी स्पष्ट कबुली संभाजी नाशिककर या फडाचे मालक संभाजीराजे जाधव सांगलीकर यांनी दिली. ते म्हणाले, तमाशाच्या माध्यमातून समाज प्रबोधन होतं. गावगाड्यातील शेतकरी वर्षभर आपल्या शेतामध्ये राबत असतो. गावच्या यात्रेमध्ये त्याला मनमुराद आनंद मिळावा, यासाठी गण गौळण बतावनी, हजेरी असे कार्यक्रम आम्ही ठेवत असतो. त्याचबरोबर तरुण प्रेक्षकांची मागणी वाढल्यामुळे उडत्या चालीची गाणी अधिक प्रमाणात ठेवावी लागतात. बहुतांशी गावांमध्ये वग झाला नाही तरी चालेल, परंतु गाण्यांचा कार्यक्रम जास्त वेळ ठेवा, असा आग्रह असतो. त्यामुळे आम्हाला नवनवीन गाणी तमाशामध्ये जास्त ठेवावी लागत असल्याचे मोहित नारायणगावकर यांनी सांगितले.

ते म्हणाले, स्वर्गीय विठाबाई नारायणगावकर यांना राष्ट्रपतींच्या हस्ते दोन वेळा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. देशाच्या सीमेवरच्या सैन्यांना देखील त्यांनी तमाशाची कला दाखवली होती. आज तमाशाचा बाज काही प्रमाणात बदलतोय. प्रेक्षकांची मागणी वेगळी असल्यामुळे आम्हालाही तमाशामध्ये बदल करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. तमाशात महिलांची संख्या जास्त असेल तर त्या तमाशाची मागणी राहते असेही त्यांनी सांगितले.



नारायणगाव

बारी: पाडव्याच्या मुहूर्तावर नारायणगावच्या तमाशा पंढरी मध्ये तमाशाची बारी ठरवायला विविध गावच्या यात्रा प्रेमींचे झालेली मोठी गर्दी (छायाचित्र - सुरेश वाणी.)

### यात्रा प्रमुखांची गर्दी

- नारायणगावच्या तमाशा पंढरीमध्ये आज सकाळपासूनच विविध गावच्या यात्रा प्रमुखांची गर्दी झालेली पाहायला मिळाली. या तमाशा पंढरीमध्ये असलेल्या ३५ राहुट्यांमध्ये प्रत्येक ठिकाणी जाऊन आपल्या गावच्या यात्रेची तारीख खाली आहे का? कमी पैशात तमाशा मिळेल का? तमाशा व हजेरी एकत्रित करता येईल का? याबाबतची धावपळ पाहायला मिळाली.
- अनेक गावच्या यात्रा कमिटीच्या लोकांना आपल्या गावच्या यात्रेची तारीख मोठ्या फड मालकांची खाली नसल्यामुळे त्यांचा हिरमोड झाल्याचे पाहायला मिळाले.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेची काळी गुढी

## सरकारचा केला निषेध



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** लाडक्या बहिणीला आणि शेतक-याला फसवून राज्य सरकार सत्तेवर आले आहे. लाडक्या बहिणींना मानधन देता येणार नाही. तर शेतकऱ्यांची कर्जमाफी नाकारण्यात आली आहे. याच्या निषेधार्थ गुढीपाडव्यानिमित्ताने सांगलीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने काळी गुढी उभारून निषेध करण्यात आला आहे. यावेळी राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली.

**आंदोलन**

राज्य सरकारने सत्तेवर येण्यासाठी लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये लाभ आणि शेतक-यांना कर्जमाफी देणार; असे म्हणून सत्ता स्थापन केली. मात्र लाडक्या बहिणी व शेतक-यांना फसवून सरकार सत्तेवर आले आहे. आता या सरकारने लाडक्या बहिणींना मानधन देता येणार नाही. तसेच शेतक-यांना कर्जमाफी देता येणार नाही, असे जाहीर केले आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी पसरली आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफी न देण्याचे जाहीर केल्यानंतर याचा निषेध सर्व राज्यभरातून स्वाभिमानी शेतकरी संघटना करत आहे. दरम्यान आज सांगलीमध्ये काळी गुढी उभा करून सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटना याच्यापुढेही तीव्र असे आंदोलन छेडणार असल्याचा इशारा सरकारला देण्यात आला.

### राज्य सरकारविरोधात घोषणाबाजी

- राज्य सरकारचा निषेध करत आंदोलना दरम्यान स्वाभिमानी शेतकरी संघटनेने यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या.
- यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे, भरत चौगुले, संजय बेले, संदीप राजोबा आदीसह अन्य शेतकरी उपस्थित होते.

# शिंदेंच्या शिवसेनेत अंतर्गत कलह

## संवाद बैठक पार पडल्यानंतर पदाधिकाऱ्यांनी त्यांची नाराजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नुकतीच पुण्यात संवाद बैठक पार पडल्यानंतर शिवसेनेतील पदाधिका-यांनी त्यांची नाराजी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमधून व्यक्त केली आहे. पुण्यात २ दिवसांपूर्वी संपर्क नेते उदय सामंत यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली बैठक पार पडली होती. या बैठकीत गुपचुप वरिष्ठांशी बोलून निधी घेतात, सगळ्यांनी आपलं दुकान मांडलंय, स्वार्थाची पोळी भाजणं बंद केलं पाहिजे अशी चर्चा पुण्यातील शिवसेना पदाधिका-यांच्या ग्रुपमध्ये होत असल्याने शिंदेंच्या शिवसेनेत अंतर्गत कलह असल्याचे दिसत आहे.




दरम्यान, पुणे येथे शिंदेंच्या शिवसेना पदाधिका-यांची बैठक झाली. या बैठकीला विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गो-हे, आमदार विजय शिवतारे, आमदार शरद सोनवणे, नुकताच पक्षात प्रवेश केलेले माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यासह शहर आणि जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारीसुद्धा उपस्थित होते.

पुण्यात 'शिवसेना कार्यालय पुणे शहर' नावाचा एक व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप आहे. ज्यामध्ये पक्षातील अनेक प्रमुख पदाधिकारी आहेत. संवाद बैठक पार पडल्यानंतर रात्री एका पदाधिका-याने 'स्वार्थासाठी पक्षात आलेल्यांनी जुन्या कार्यकर्त्यांना धमकी देऊ नये, नवीन आले म्हणजे फार काही पराक्रम केला नाही....', असा भला मोठा मेसेज त्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर केला. या मेसेजला रिप्लाय म्हणा किंवा संधी शोधणे म्हणा, आणखी एका पदाधिका-याने आमचे गा-हाणे सांगायचे कोणाला? आपला सत्तेत राहून उपयोग काय.. असा मेसेज केला.

कालचा संवाद मेळावा हा कार्यकर्त्यांशी झाला, परंतु कार्यकर्त्याला बोलायला दिले गेले नाही, अशी व्यथा एकाने ग्रुपवर व्यक्त केली. यात आणखी एका कार्यकर्त्याने उडी घेतली आणि त्याने, जो तो आपली कातडी वाचवतो. गुपचुप वरिष्ठांना गोड बोलून निधी घेतात, काम करून घेतात असा आरोप सुद्धा केला. 'बाळासाहेब असताना पुण्यात २१ नगरसेवक होते, आता वीस वर्षांत फक्त २ नगरसेवक राहिले. हे सामान्य कार्यकर्त्याला ताकद देणार नाहीत, यांना त्यांच्या मर्जीतले लोक लागतात, खऱ्या कार्यकर्त्याला शेवटपर्यंत न्याय भेटत नाही' अशी खंत एका कार्यकर्त्याने ग्रुपवरच मांडली.

# या तीन राज्यांत अफ्सा कायद्याला मुदतवाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने ईशान्येकडील राज्यांची सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन तीन राज्यांमध्ये सशस्त्र दल विशेष अधिकार कायद्याची (अफ्सा) मुदत वाढवली आहे. ही वाढ पुढील सहा महिन्यांसाठी लागू असेल. गृह मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमधील काही प्रदेशातील अफ्साची मुदत वाढवण्यात आली आहे.

केंद्र सरकारने मणिपूर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर, सशस्त्र दल (विशेष अधिकार) अधिनियम, १९५८ च्या कलम ३ अंतर्गत हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, मणिपूर मधील ५ जिल्ह्यांमधील १३ पोलीस ठाण्यांचे क्षेत्र वगळता संपूर्ण राज्यात १ एप्रिल पासून पुढील सहा महिन्यांसाठी 'अशांत क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

नागालँड या राज्याच्या काही भागांमध्ये तो पुन्हा लागू करण्यात आला आहे. नागालँडमधील दिमापूर, निउलँड, चुमौकेदिमा, मोन, किफिर, नोकलाक, फेक आणि पेरेन या जिल्ह्यांचा यात समावेश आहे. यासोबतच कोहिमा, मोकोकचुंग, लोंगलेंग, वोखा आणि जुन्हेबोटो जिल्ह्यातील काही भागांना १ एप्रिल पासून पुढील सहा महिन्यांसाठी 'अशांत क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

याशिवाय, अरुणाचल प्रदेशातील तिरप, चांगलांग आणि लोंगडिंग जिल्ह्यांमध्ये आणि राज्यातील ३ पोलीस ठाणे क्षेत्रांमध्ये ६ महिन्यांसाठी या कायद्याची मुदत वाढवण्यात आली आहे. नागालँडमधील संपूर्ण ८ जिल्हे आणि इतर ५ जिल्ह्यांमधील २० पोलीस ठाण्यांच्या क्षेत्रामध्येही या कायद्याची मुदत वाढवण्यात आली आहे.

### काय आहे हा कायदा?

- अफ्सा हा कायदा अशांत क्षेत्रांमध्ये सशस्त्र दलांच्या हालचाली सुलभ करण्यासाठी अधिसूचित केला जातो. या कायद्यामुळे अशांत क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या सशस्त्र दलांना शोध मोहीम राबवणे, अटक करणे आणि आवश्यक वाटल्यास गोळीबार करण्याचे अधिकार मिळतात.

# दुर्दशा

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



लेबनॉन

बेरूत: इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर, बेरूतच्या दक्षिणी उपनगरांची अशी दुर्दशा झाली. लेबनॉनमधील बाब्दा येथून टिपलेले हे छायाचित्र. इस्रायली सैन्याने रहिवाशांना येथून बाहेर पडण्याचा हल्ल्यापूर्वी इशारा दिला होता.

पान १ वरून

### पीएम मोदींची नागपूरला भेट

यादरम्यान सरसंघचालक डॉ. मोहन भागवतही उपस्थित होते. ते नागपुरात विमानतळावर पोहोचले, त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांचं स्वागत केलं. संघ आणि भाजप नेतृत्वात सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर यांची भेट झाली. त्यामुळे राजकीय वर्तुळातून पंतप्रधान मोदींचा नागपूर दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी गुढीपाडव्यानिमित्ताने नागपूर दौऱ्यावर होते. नागपुरातील माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरच्या विस्तार प्रकल्पाची पायाभरणीही पंतप्रधानांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी पंतप्रधानांनी जनतेशी संवाद साधला.

आयुष्मान भारत योजनेच्या फायद्यांची माहिती देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशासाठी बलिदान दिलेल्या वृद्धांना उपचाराची काळजी करण्याची गरज नाही. ही सरकारची जबाबदारी आहे. आयुष्मान भारत योजनेमुळे आज कोट्यवधी जनतेला मोफत उपचार सुविधा मिळत आहेत. हजारो जन औषधी केंद्रामुळे देशात गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबाला स्वस्त औषधं मिळत आहेत. देशात हजारो डायलेसिस सेंटर मोफत सेवा देत आहेत. यामुळे देशभरातील जनतेचे हजारो कोटी रुपयांची बचत होत आहे, असे त्यांनी सांगितले.

#### विकास प्रकल्पांचे उद्घाटन

छत्तीसगडच्या बिलासपूरमध्ये पंतप्रधान मोदींनी ३३,७०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचा शुभारंभ केला, मेमू रेल्वे सेवेला हिरवा झेंडा दाखवला. छत्तीसगडच्या पायाभूत सुविधा आणि सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने हे प्रकल्प वीज, तेल आणि वायू, रेल्वे, रस्ते, शिक्षण आणि गृहनिर्माण यासह महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आहेत.

### बीडमध्ये मशिदीत स्फोट

सुमारास मशिदीतून स्फोटाचा आवाज झाला होता. यावेळी आरोपी तेथून पळून जात असल्याचं दिसलं अशी माहिती पोलिसांच्या एफआयआरमध्ये नमूद केली आहे.
दरम्यान, एटीएस पथकाकडून घटनास्थळाची पाहणी करण्यात येणार आहे. यावेळी स्थानिक पोलीस त्यांच्यासोबत असतील, अशी माहिती आहे.
याबाबत अधिक माहिती देताना पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी सांगितलं की, मशीद स्फोट प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन आरोपींना ताब्यात घेतलं आहेत. गावामध्ये शांतता आहे. बीड जिल्ह्यातील सर्व लोकांना आव्हान आहे की शांतता राखावी. झालेली घटना अत्यंत निंदनीय आहे. पोलीस तत्पर आहे. लगेच पोलिसांनी येऊन दोन-तीन तासांमध्ये आरोपींना पकडले आहे. आम्ही आमच्या शंभर टक्के काम केले आहे. लोकांनी शांततेत राहावे. दोन्ही सण शांततेत सादरी करावेत, असं आवाहन कांवत यांनी केलं आहे.

### आर्थिक संकटाचे ....

यूबीएस ग्लोबल वेल्थ रिपोर्ट २०२४ चा संदर्भ त्यांनी दिला आहे. अमेरिका आणि स्वित्झर्लंड सारख्या देशांमध्ये सरासरी संपत्ती जास्त आहे, परंतु त्यांच्या सरासरी संख्येत मोठी तफावत दिसून येते. उदाहरणार्थ, अमेरिका संपत्तीमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे परंतु सरासरी संपत्तीमध्ये १४ व्या क्रमांकावर घसरला आहे असे ते म्हणाले आहेत.

### 'राज' यांचे पुन्हा ...

असे म्हणत त्यांनी कबरीच्या राजकारणाला अप्रत्यक्षपणे विरोध केला. धर्मवीर संभाजीराजे यांचे बलिदान आता कळले का, अशा शब्दांत त्यांनी हिंदुत्वावर आक्रमक भूमिका घेणाऱ्यांवर निशाणा साधला. इतिहासाशी यांचा काहीही संबंध नाही, त्यांना त्यांची राजकीय स्वार्थाची पोळी भाजून घ्यायची आहे. इतिहासाच्या नावावर जातीपातीची भांडणे लावून देण्याचे काम सुरू आहे, असाही घणाघात त्यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराज हा एक विचार आहे, असे सांगून त्यांनी तत्कालीन परिस्थितीवर भाष्य केले.

## डोनाल्ड ट्रम्प २०३७ पर्यंत राष्ट्राध्यक्ष पदावर?

**नवी दिल्ली:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यांच्या निर्णयामुळे सातत्याने चर्चेत आहेत. त्यांच्या प्रत्येक निर्णयाचा जगभरातील अनेक देशांवर परिणाम होत असल्याचे पाहायला मिळत आहे. ट्रम्प हे दुसऱ्यांदा सत्तेत परतले आहेत. मात्र, पुन्हा सत्तेत येऊ शकतात का? याविषयी आतापासूनच चर्चा सुरू झाली आहे. ट्रम्प हे २०३७ पर्यंत पदावर राहू शकतात, अशी शक्यताही वर्तवली जात आहे.

ट्रम्प पुढील ४ वर्षांसाठी कायदेशीररित्या राष्ट्राध्यक्षपदी कायम राहतील. मात्र, आता प्रश्न असा आहे की ते पुढील १२ वर्षांसाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष राहू शकतात का? अमेरिकेचे संविधान स्पष्टपणे सांगते की, देशाचा राष्ट्राध्यक्ष दोनपेक्षा जास्त वेळा निवडला जाऊ शकत नाही. तरीही, डोनाल्ड ट्रम्प यांच्या तिसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष बनण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण, अमेरिकेच्या संविधानात एक अशी पळवाट आहे, ज्यामुळे ट्रम्प अनेकवर्ष पदावर राहू शकतात. २२ व्या सुधारणेनुसार अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष दोनपेक्षा जास्त वेळा निवडला जाऊ शकत नाही, परंतु ते उत्तराधिकार प्रक्रियेद्वारे पुन्हा ही भूमिका बजावू शकतात. उत्तराधिकार प्रक्रिया नेमकी कशी काम करते, हे एका उदाहरणाद्वारे समजू शकते. अमेरिकेच्या संविधानातील २२व्या सुधारणेनुसार, दोन वेळा निवड झालेले राष्ट्राध्यक्ष तिसऱ्यांदा उत्तराधिकारी म्हणून हे पद सांभाळू शकतात. ट्रम्प त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या समाप्तीनंतर उपराष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढले आणि त्यांचा सहकाऱ्याने विजयी झाल्यानंतर राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला, तर ते तिसऱ्यांदा उत्तराधिकारी म्हणून राष्ट्राध्यक्षाची भूमिका बजावू शकतात.

# कोरटकरला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**कोल्हापूर :** :छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य करणारा नागपूर येथील कथित पत्रकार प्रशांत कोरटकर याला आज न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. कोरटकरची दोन दिवसांची पोलिस कोठडी आज संपली. त्याला आज कोर्टात हजर करण्यात आले, तिथे त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान आणि इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी प्रकरणी अटकेत असलेला कथित पत्रकार प्रशांत कोरटकर याला आज कोल्हापूर कोर्टात हजर करण्यात आले. त्याची दोन दिवसांची पोलिस कोठडी संपल्यामुळे त्याला कोर्टात आणण्यात आले.



यावर तातडीने सुनावणी करत त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. यावेळी सरकार पक्षाकडून पोलिस कोठडी वाढवून देण्याची मागणी करण्यात आली. मात्र कोर्टाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यामुळे त्याचा जामिनासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे **विद्यमान मालक, श्री. रणजीत तुकाराम बुध्दीवंत** रा. सर्व्हे नं. ५० / ३, धरती रिजॉट, उंड्री, पुणे - ४११०६० यांची मालकी व ताबे वहिवाटीची असून सदर मिळकत आमचे अशिल यांना कायम खुष खरेदी देण्याबाबत बोलणी चालू आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी, वादरहित व बोजारहीत असल्याचा पुर्ण भरवसा व खात्री आमचे अशिलांना त्यांनी दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीवर अथवा त्यामधील कोणत्याही भागावर कोणाचीही मालकी, ताबा, वहिवाट, लिज, लिन, बक्षीसपत्र, करारमदार, विसारपावती वगैरे कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अशा सर्व संबंधीत व्यक्तींनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१५ दिवसांच्या** मुदतीत आमचे खालील दिलेल्या ऑफिसच्या पत्त्यावर लेखी पुराव्यासह समक्ष भेटून खात्री करून द्यावी अन्यथा मिळकत मालकांना सदर मिळकतीचे पूर्णपणे स्वामीत्व असल्याचे गृहित धरून व इतरांनी असलेले त्यांचे हक्क अधिकार जाणीवपुर्वक सोडून दिल्याचे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन :** तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली, जिल्हा पुणे मा. दुय्यम निबंधक हवेली क्र. १ ते २७ यांचे हद्दीतील व पुणे महानगरपालिका यांचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे उंड्री येथील सर्व्हे नं. ५०/३/२/३ यांसी क्षेत्र ०१ हे. ०० आर यांसी आकार ०१ रू.०० पैसे पैकी विद्यमान मालक यांचे सामाईक मालकी व ताबे वहीवाटीचे क्षेत्र ०० हे. २० आर यांसी आकार ००रु.२० पैसे पैकी क्षेत्र ०० हे. ०२ आर ही मिळकत यांसी चतु:सीमा पुढील प्रमाणे- पुर्वेस : सर्व्हे नं. ५० / ३ पैकी उर्वरित मिळकत, दक्षिणेस : भारतीक यांची मिळकत, पश्चिमेस : लिहुन देणार यांची मिळकत, उत्तरेस : २० फुटी रस्ता. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

**ठिकाण :- पुणे**

**दिनांक :- २९/०३ /२०२५**

**सदर जाहिर नोटीस देण्यास माझी संमती आहे.**

**श्री. रणजीत तुकाराम बुध्दीवंत**

शिक्का

**Advocate Laxman Ghule**
Magarpatta, Hadapsar, Pune
90212 39496

## संभलमध्ये सणांमुळे बाजारपेठेत चैतन्य



**संभल/वाराणसी (उत्तर प्रदेश) :** नवरात्रीच्या पहिल्या दिवशी रविवारी संभल आणि वाराणसीतील मंदिरांमध्ये भाविकांनी गर्दी केली आणि ईदच्या तोंडावर बाजारपेठा धार्मिक उत्साहाने फुलून गेल्या. अलीकडच्या काळात जातीय दंगली झालेल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संभलमधील चामुंडा देवी मंदिर आणि चंदौसीयेथील रामबाग धाम येथील दुर्गा मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

## भाजपने योजना बंद केल्याचा 'आप'चा आरोप




**नवी दिल्ली :** रस्ते अपघातग्रस्तांना खासगी रुग्णालयात मोफत वैद्यकीय उपचार देणारी 'फरिश्ते दिल्ली के' योजना बंद केल्याचा आरोप 'आप'ने रविवारी भाजपप्रणित दिल्ली सरकारवर केला. त्यावर भाजपकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही. आम आदमी पक्षाच्या आधीच्या सरकारने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे हजारो लोकांचे प्राण वाचले होते, पण आता ते थांबवले जात असल्याचा आरोप दिल्ली 'आप'चे अध्यक्ष आणि माजी आरोग्यमंत्री सौरभ भारद्वाज यांनी पत्रकार परिषदेत केला.

## दोन बांगलादेशी नागरिकांना अटक



**नवी दिल्ली :** बेकायदा स्थलांतरितांची ओळख पटवून त्यांना हद्दपार करण्याच्या मोहिमेअंतर्गत पूर्व दिल्लीत बेकायदा वास्तव्यास असलेल्या दोन संशयित बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. फरीदपूर येथील आतिफा (२४) आणि बांगलादेशातील नरसिंगडी येथील आसमा (२४) यांनी नदीमार्गे बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश केला. त्यानंतर ओळख टाळण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय राजधानीतील ठिकाणे बदलली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

## 'फ्यूचर सिटी'ला हे रोल मॉडेल : मुख्यमंत्री रेवंत रेड्डी



**हैदराबाद :** तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी रविवारी सांगितले की, त्यांचे सरकार नागरी सुविधांची तरतूद सुनिश्चित करताना रोजगार आणि उपजीविकेच्या संधी निर्माण करून प्रस्तावित 'फ्यूचर सिटी'ला देशासाठी रोल मॉडेल म्हणून विकसित करेल. उगादी (तेलुगू नववर्ष) समारंभात बोलताना ते म्हणाले की, चंदीगड वगळता देशातील इतर कोणत्याही शहराचा स्वातंत्र्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण विकास झालेला नाही. अस्तित्वात असलेल्या शहरांचा विस्तार झाला आहे, पण अनागोंदी पद्धतीने, असे रेड्डी यांनी नमूद केले.

## त्रिपुरा काँग्रेसने मालमत्तेचे दस्तावेजीकरण सुरू केले

**आगरतळा :** त्रिपुरातील काँग्रेसने राज्यातील पक्षाच्या मालमत्तेची सर्वंकष कागदपत्रे तयार करून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीसमोर सादर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (एआयसीसी) देशभरात आपल्या मालमत्तेचे संकलन करण्याच्या प्रक्रियेत आहे. त्रिपुरा प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आशिष कुमार साहा यांनी पीटीआयला सांगितले की, एआयसीसीच्या सूचनेनंतर पक्षाने राज्यभरातील पक्ष कार्यालयांच्या स्थितीसह मालमत्तांची कागदोपत्री प्रक्रिया सुरू केली आहे.

# भारताची माफी मागा...!

## जालियनवाला बाग प्रकरणी ब्रिटिश संसदेत खासदार आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्वाची घटना असलेले जालियनवाला बाग हत्याकांड प्रकरण आता पुन्हा चर्चेत आले आहे. या हत्याकांडाला १०६ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानंतर आता ब्रिटनच्या संसदेत तेथीलच एका खासदाराने या हत्याकांडासाठी ब्रिटनने भारताची औपचारिक माफी मागावी, अशी मागणी केली आहे. या मागणीवरून ब्रिटनच्या संसदेत गदारोळ झाला.

ब्रिटिश खासदार बॉब ब्लॅकमॅन यांनी ही मागणी केली. सन १९१९ मध्ये पंजाबमधील जालियनावाला बाग येथे हे हत्याकांड घडले होते. ब्लॅकमॅन यांनी या घटनेचा उल्लेख ब्रिटिशांच्या वसाहत काळाच्या इतिहासातील 'लाजिरवाणा काळा डाग' असे संबोधित केले आहे.

दरम्यान, जालियनवाला बाग हत्याकांडाच्या १०६ व्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर, ब्रिटिश सरकारने या घटनेसाठी माफी मागावी का? यावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. नुकतेच, ब्रिटिश कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे (हुजुर पक्ष) खासदार बॉब ब्लॅकमॅन यांनी सरकारला या अमानवीय कृत्याची जबाबदारी स्वीकारून औपचारिक माफी मागण्याचे आवाहन केले.

संसदेत बोलताना, ब्लॅकमॅन यांनी १३ एप्रिल १९१९ च्या त्या भयानक घटनेची आठवण करून दिली. यात जालियनवाला बाग येथे ब्रिटिशांच्या निषेधासाठी जमलेल्या भारतीयांवर जनरल डायरच्या आदेशाने ब्रिटिश सैन्याने बेछूट गोळीबार केला होता. ते म्हणाले की, त्या दिवशी अनेक कुटुंबे जालियनवाला बागेत शांतता निषेधासाठी जमली होती. मात्र, ब्रिटिश सैन्याच्या नेतृत्वाखालील जनरल डायरने आपल्या सैनिकांना नागरीकांवर गोळीबार करण्याचा आदेश दिला आणि पूर्ण दारुगोळा संपेपर्यंत हा नरसंहार सुरूच राहिला. या घटनेत १५०० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले, तर १२०० हून अधिक लोक जखमी झाले, असे ब्लॅकमॅन म्हणाले.

यंदा १३ एप्रिल रोजी या घटनेचा स्मृतिदिन येत आहे, मात्र त्यावेळी ब्रिटिश संसदेची सुट्टी असेल. त्यामुळे, त्या अगोदर सरकारने अधिकृत विधान जारी करून काय चूक झाली हे मान्य करावे आणि भारतातील जनतेची माफी मागावी, असे आवाहन त्यांनी केले.

ब्लॅकमॅन यांनी याकडेही लक्ष वेधले की, २०१९ मध्ये तत्कालीन पंतप्रधान थेरेसा मे यांनी जालियनवाला बाग हत्याकांडाला ब्रिटिश राजवटीच्या काळातील काळा डाग म्हटले होते, मात्र त्यांनी याबाबत औपचारिक माफी मागितली नव्हती. जनरल डायरला त्याच्या कृत्यासाठी अपमानास्पदरीत्या पदच्युत करण्यात आले होते. परंतु हा ब्रिटिश वसाहती काळातील लाजिरवाणा इतिहास आहे, असे २०१९ मध्ये थेरेसा मे यांनी म्हटले होते.

दरम्यान, संसदीय नेते लुसी पॉवेल यांनीही खासदार ब्लॅकमॅन यांचे आभार मानले आणि जालियनवाला बाग हत्याकांडाला ब्रिटिश वसाहत काळातील सर्वात लाजिरवाण्या आणि कुप्रसिद्ध घटनांपैकी एक, असे संबोधले.



### जालियनवालामध्ये नेमके काय घडले होते?

१३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर (पंजाब) येथील जालियनवाला बाग येथे जमलेल्या भारतीयांच्या जमावावर ब्रिटिश सैन्याने जनरल रेजिनाल्ड डायरच्या आदेशाने अंदाधुंद गोळीबार केला. हा जमाव ब्रिटश सरकारच्या दडपशाही करणाऱ्या रौलेट कायद्याच्या विरोधात शांततामय निदर्शने करत होता. ब्रिटिश सैन्याने बागेचा एकमेव बाहेर पडण्याचा मार्ग रोखून धरला आणि दारूगोळा संपेपर्यंत गोळीबार सुरू ठेवला. या घटनेत १५०० हून अधिक लोक ठार झाले. त्यामध्ये स्त्रिया आणि लहान मुलांचाही समावेश होता तर हजारो लोक गंभीर जखमी झाले. ही घटना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचा टर्निंग पॉईंट ठरली. बिटिशांच्या या क्रौर्यामुळे भारतभर संतापाची लाट उसळली आणि स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र झाला.

# छत्तीसगडमध्ये नक्षल्यांची शरणागती

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यापूर्वी मोठी घटना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या छत्तीसगड दौऱ्याच्या काही तास आधी विजापूरमध्ये ५० नक्षल्यांनी शरणागती पत्करली. त्यापैकी १४ जणांवर एकूण ६८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. बेगडी नक्षली विचारसरणी, ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडून आदिवासींचे होणारे शोषण आणि चळवळीतील मतभेद यामुळे आपण आत्मसमर्पण करीत असल्याचे नक्षलवाद्यांनी सांगितले.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात रविवारी ५० माओवाद्यांनी शरणागती पत्करली. त्यापैकी १४ जणांवर एकूण ६८ लाखरुपयांचे बक्षीस होते. माओवाद्यांनी राज्य पोलिस आणि सीआरपीएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर शस्त्रे ठेवली. पोकळ आणि अमानुष माओवादी विचारसरणी, बंदी घालण्यात आलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (माओवादी) वरिष्ठ कार्यकर्त्यांकडून आदिवासींचे होणारे शोषण आणि चळवळीतील मतभेदांमुळे आपण आत्मसमर्पण करीत असल्याचे माओवाद्यांनी सांगितले.

### सुरक्षा दलांचे मोठे यश

● छत्तीसगडमधील बस्तर भागातील सुकमा आणि विजापूर जिल्ह्यात शनिवारी झालेल्या दुहेरी चकमकीत सुरक्षा दलांनी ११ महिलांसह १८ माओवाद्यांना कंठस्नान घातले. ३१ मार्च २०२६ पूर्वी नक्षलवाद संपवण्याच्या मोहिमेतील हे मोठे यश आहे. या ताज्या यशामुळे या वर्षी आतापर्यंत राज्यात वेगवेगळ्या चकमकीत मारल्या गेलेल्या माओवाद्यांची संख्या १३४ झाली. त्यापैकी बस्तर विभागात ११८ जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२४ मध्ये सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर भागात एकूण ७९२ माओवाद्यांनी शरणागती पत्करली.

विजापूरचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक जितेंद्रकुमार यादव यांनी सांगितले की, सुरक्षा दलांनी छावण्या उभारल्याने आणि 'निया नेल्नार' योजनेमुळे माओवाद्यांनाही फटका बसला आहे. 'निया नेल्नार' योजनेअंतर्गत सुरक्षा दल आणि नागरी प्रशासन दुर्गम भागात मूलभूत सुविधा पुरवत आहे. आत्मसमर्पण केलेल्या ५० नक्षलवाद्यांपैकी सहा नक्षलवाद्यांवर प्रत्येकी आठ लाख रुपयांचे तर तिघांवर प्रत्येकी पाच लाखरुपयांचे बक्षीस होते. याशिवाय पाच नक्षलवाद्यांवर प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस आहे. नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणात जिल्हा राखीव दल (डीआरजी), बस्तर फायटर्स, स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ), सीआरपीएफ आणि कोबरा (कमांडो बटालियन फॉर रिझोल्यूट ॲक्शन) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

आंदोलन सोडून मुख्य प्रवाहात आलेल्या नक्षलवाद्यांचे सरकारच्या धोरणानुसार पुनर्वसन केले जाईल, असे पोलिस अधीक्षकांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्य दौऱ्याच्या काही तास आधी हे आत्मसमर्पण करण्यात आले. ३३,७०० कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या अनेक विकास प्रकल्पांचे भूमिपूजन ते करणार आहेत.

# शिर्डीला येणाऱ्या भक्तांसाठी आता साईकवच!

## ५ लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण मिळणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिर्डी :** शिर्डीच्या साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेनं आज गुढी पाडव्याच्या शुभमुहुर्तावर साईभक्तांसाठी महत्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. शिर्डीत साईबाबांच्या दर्शनाला मोठ्या संख्येने भाविक येत असतात. यामुळे वर्षभर येथे भाविकांची मोठी गर्दी असते. या अनुषंगाने शिर्डीत साईदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शिर्डीच्या साईबाबांचे भक्त देश विदेशात विखुरलेले आहेत. वर्षाकाठी येथे साधारण साडे तीन कोटी भाविक साई समाधीचं दर्शन घेण्यासाठी हजेरी लावतात. मात्र बऱ्याचदा दर्शन घेण्यासाठी येत असताना काही दुर्घटना घडत असतात. याच अनुषंगाने साई संस्थानने महत्वाचा निर्णय घेतला आहे. यात भाविकांना अपघाती पाच लाख रुपयांच सुरक्षा कवच देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेची माहीती साई संस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली आहे.

साईबाबा दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विमा संरक्षण देण्याचा मोठा निर्णय साई संस्थानने घेतला आहे. मात्र साईभक्तांनी दर्शनाला येण्याआधी साई संस्थानच्या अधिकृत संकेत स्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे. यामुळे घरातून निघाल्यानंतर साई मंदिरात दर्शन करेपर्यंत काही अघटित घटना घडली, तर पाच लाखांपर्यंतचे विमा संरक्षण संबंधिताला किंवा त्याच्या कुटुंबियांना मिळणार आहे.

शिर्डीत दर्शनासाठी आलेला भाविक बाबांना आपल्या यथाशक्तीनं दान टाकतो. एक रुपया पासून ते शंभर कोटी रुपयांच महादान देणारा साईंचा भाविक आहे. त्यामुळे दिवसाला सरासरी एक कोटी रुपयांचा दान साईंना प्राप्त होत. याच दानातून आता वर्षाकाठी ४८ लाख रुपये साईसंस्थान खर्च करणार असून, भाविकांना हे विमा कवच प्रदान करणार आहे. आकडेवारीनुसार, वर्षभरात साधारण दहा लाख भाविकांनी साईसंस्थानच्या संकेत स्थळाला भेट दिलीये.

यानुसार ह्या विमा कवचचा लाभ प्राथमिक आधारे साधारण दहा भाविकांना मिळू शकेल. यात भाविकांची संख्या देखिल वाढणार असून, यांची तजवीज देखिल संस्थानने केली आहे.

# ओडिसामध्ये रेल्वे अपघात; ११ डबे रुळावरून घसरले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या काही महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रेल्वे अपघाताच्या घटना समोर आल्या आहेत. अशातच रविवारी ओडिसामध्ये एक मोठी रेल्वे दुर्घटना सुदैवाने जवळपास टळली आहे. येथे कामाख्या एक्स्प्रेसचे ११ डबे रुळावरून घसरले. ईस्ट कोस्ट रेल्वेच्या खुर्दा विभागात ही घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवीतहानी झालेली नाही, तसेच प्रवासी जखमी झाले नाहीत.

रेल्वे अधिकाऱ्यांनी अपघाताची पुष्टी केली आणि माहिती देताना सांगितले की, रविवारी सकाळी ११.५४ वाजता ईस्ट कोस्ट रेल्वेच्या खुर्दा रोड विभागातील कटक-नारागुंडी रेल्वे विभागात ही घटना घडली.

एसएमव्हीटी बेंगळुरू-कामाख्या एसी सुपरफास्ट एक्स्प्रेस बेंगळुरूहून गुवाहाटीच्या दिशेने जात असताना, हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच रेल्वेचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी मदत आणि बचावकार्य सुरू केले. अपघातग्रस्त रिलीफ ट्रेन आणि मेडिकल रिलीफ ट्रेनही तातडीने घटनास्थळी रवाना करण्यात आली. रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघाताचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. रेल्वेने प्रवासी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक हेल्पलाइन क्रमांक - ८९९११२४२३८ जारी केला आहे.



**बँकॉक** थायलंडमधील बँकॉकमध्ये भूकंपाने मोठे नुकसान केले असून, अशाच एका कोसळलेल्या इमारतीजवळील बचाव कर्मचारी.

# सिंहस्थ कुंभमेळ्यात भाजपचीच चलती




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत आतापर्यंत विविध बैठका झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या मंत्र्यांनी त्याला हजेरी लावली. आता या बैठकांतून पुढील कामकाजाला दिशा देण्याचा प्रयत्न झाला आहे.

गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नाशिकला सिंहस्थाची विशेष बैठक झाली. बैठकीनंतर प्रशासनाकडून कामकाजाला गती देण्यात आली. सबंध प्रक्रियेत महाविकास आघाडीतील मोजक्या नेत्यांची आणि पक्षांचीच हजेरी होती. त्यामुळे तो चर्चेचा विषय आहे.

मुख्यमंत्र्यांनंतर जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत त्र्यंबकेश्वर आणि नाशिक येथे साधू-महंतांची बैठक झाली. या बैठकांमध्ये साधू, महंत आणि आगामी कुंभमेळ्याबाबत आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या. प्रशासन आणि मंत्री दोघांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत एकंदरच भारतीय जनता पक्षाचे प्राबल्य दिसले.

नाशिक जिल्ह्यात महायुतीचे तीन स्थानिक मंत्री आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि औषध व प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आहेत. शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आहेत. मात्र या मंत्र्यांची सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बैठकीला अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली.

जिल्ह्यात राजाभाऊ वाजे आणि भास्कर भगरे हे दोन खासदार आहेत. ते विरोधी पक्षाचे आहेत. त्यामुळे त्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामकाजात फारसे विश्वासात घेण्यात आले नाही. त्यांनी याबाबत थेट संसदेत झालेल्या चर्चेत याकडे लक्ष वेधले. राज्य शासन खासदारांना कुंभमेळ्याच्या तयारीबाबत विश्वासात घेत नाही. खासदार वाजे यांच्या मतदारसंघातच सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. त्यामुळे त्यांच्या तक्रारीला महत्त्व आहे. मात्र, अशीच तक्रार सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांची देखील आहे. विशेषत: कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांची नावे संभाव्य पालकमंत्री म्हणून स्पर्धेत आहेत. सध्या जिल्ह्याला पालकमंत्री नाही. अशा स्थितीत या दोन्ही मंत्र्यांना शासनातील व्यवस्थेने जाणीवपूर्वक कुंभमेळ्याच्या तयारीच्या कामकाजापासून अलिप्त ठेवले आहे. मंत्र्यांना आणि आमदारांना याबाबतचे निमंत्रण देण्यात आलेले नाही अशी तक्रार आहे.

### भाजपला मोठा फायदा

● सिंहस्थ कुंभमेळा हा भारतीय जनता पक्षासाठी राजकीय मायलेज देणारा विषय आहे. शासनाचा दृष्टिकोन आणि कामकाजातील संथपणा विचारात घेता विकास कामे यापेक्षा प्रचारकी कुंभमेळा करण्यावर सरकारचा भर असू शकतो. तसेच संकेत मिळू लागले आहेत. त्यामुळे तर कृषिमंत्री कोकाटे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना लांब ठेवण्याचे राजकारण तर होत नाही ना याची चर्चा सुरू आहे.

## मलठण येथे पाणी गुणता विषयक कार्यशाळा



**शिक्रापूर :** मलठण, ता. शिरुर येथे नुकतेच जल जीवन मिशन राज्यपाणी व स्वच्छता मिशन तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद पुणे यांच्या ग्रामपंचायत स्तरावरील पाणी गुणता विषयक माहिती व प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. मलठण, ता. शिरुर येथे साई प्रेम ग्रामविकास संस्था यवतमाळ अंतर्गत आयोजित कार्यशाळेत आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांना पाणी गुणता विषयक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिवा रीता जाधव, यशदाचे प्रवीण घोलप, प्रशिक्षक जया माने, प्रतिभा डहाळे, साई प्रेम संस्थेचे समन्वयक राजेश गुंडाळे, प्रतीक्षा निरवणे, जया माने यांसह आदींनी उपस्थितांना पाणी शुद्धतेसह स्वच्छता, सर्वेक्षण व अंदाजपत्रक या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रतिभा डहाळे यांनी पाणी काटकसर तसेच पाणी गुणवत्ता व आरोग्य बाबतची माहिती दिली. उपस्थितांना पाणी हेच जीवन असून, त्याचा अपव्य टाळावा व पाण्याचे महत्व सर्वांनी जाणून घ्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## काशीबाई भंडारे यांचे मरणोत्तर देहदान



**रांजणगाव गणपती :** जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेतून रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील काशीबाई किसन भंडारे (वय ६९) यांचे त्यांच्या इच्छेनुसार मरणोत्तर देहदान करण्यात आले. शुक्रवारी (दि. २८) त्यांचे देहावसान झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी पुणे येथील श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर येथे त्यांचे पार्थिव सुपूर्त केले. जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानाच्या पुढाकारातून झालेले हे ९२ वे देहदान असून यासाठी हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले व देह सुपूर्त करण्यात आला.अशी माहिती संस्थानचे पुणे जिल्हा अध्यक्ष विजय बांदल यांनी दिली. यावेळी काशीबाई भंडारे यांची मुले – बाळू किसन भंडारे, युवराज किसन भंडारे, सुना - विद्या बाळू भंडारे, संगीता युवराज भंडारे, मुलगी - उषा नवनाथ जावळे, नाती - राजनंदिनी, निर्जला, प्रेरणा, जान्हवी, किरण हे कुटुंबातील सदस्य आणि नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानाच्या वतीने त्यांचे भक्तगण उपस्थित होते. रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट आणि रांजणगाव ग्रामपंचायतचेही यात मोलाचे योगदान लाभले.

## हिंदवी स्वराज्य शपथ दिनानिमित्त श्री क्षेत्र रायरेश्वर येथे विविध उपक्रम



**जेजुरी :** छत्रपती शिवाजी महाराजांनी 'चैत्र शुद्ध सप्तसमी' १६४५ ला त्यांच्या सहकारी मावळ्यांसह त्या काळातील परकीय आक्रमक राजवटीविरुद्ध श्री क्षेत्र रायरेश्वर मंदिरात हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. या घटनेला भारतीय इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदवी स्वराज्याच्या शपथेमध्ये भारतीय स्वातंत्र्याची बीजे पेरली गेली . २०२५ हे वर्ष 'हिंदवी स्वराज्याच्या शपथ दिनाचे' ३८० वे वर्ष आहे. या निमित्ताने सालाबादप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन भोर तालुक्यातील श्री क्षेत्र रायरेश्वर येथे करण्यात आले आहे. या दिनाचे औचित्य साधून रायरेश्वर ग्रामस्थ संस्था रायरेश्वर, बायोस्फिअर्स, ग्रामपंचायत – रायरी, स्वराज्याभूमी प्रतिष्ठान, रायरेश्वर स्मारक समिती आणि मावळातील सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हिंदवी स्वराज्य शपथ दिनानिमित्त रायरेश्वर येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले डॉ सचिन पुणेकर यांनी सांगितले. शुक्रवार दिनांक ०४ रोजी हिंदवी स्वराज्य शपथ भूमी श्री रायरेश्वर मंदिर आणि परिसरात शंभू महादेव शिवलिंग जलाभिषेक व दुग्धाभिषेक, गड आणि ध्वज पूजन, मशाल मिरवणूक, छत्रपती शिवाजी महाराज पालखी मिरवणूक व अभिषेक, ह.भ.प. राहुल महाराज पार्ठे यांचे विद्यार्थी मिरवणूक, हिंदवी स्वराज्य शपथ दिनाचे बोधचिन्ह व हिंदवी स्वराज्य स्वराज्य स्तंभ आरेखनांचे विमोचन, मूव्हमेंट अगेंस्ट बायोलॉजिकल इनव्हेजन (माबि) – अर्थात परकीय जैविक आक्रमणविरोधी चळवळी विषयक पुस्तिकेचे अनावरण, लक्ष्मण शिंदे लिखित रायरेश्वर अभंगाचे सादरीकरण, शिवकार्यात योगदान देणाऱ्या प्रातिनिधिक संस्थांचा सन्मान तसेच ग्रामस्थांकडून सरदार घराण्यांचा सन्मान, व्याख्याते संदीप खाटपे यांचे शिव-व्याख्यान, शिवशाहीर डॉ. पुरषोत्तम राऊत यांचे पोवाडा सादरीकरण, स्वराज्य कुंभमेळ्याचे आयोजन, अश्या अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंदवी स्वराज्य शपथ घेताना छत्रपती शिवरायांसोबत त्याकाळी असलेली सरदार घराणी, सहकारी मावळे यांचे वारसदार प्रतिनिधी आणि शिवविचारांनी प्रेरित असणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था, शिवप्रेमी, संत, अभ्यासक, अधिकारी, लोकप्रतिनिधी, साहित्यिक, कलाकार इ. मोठ्या संखेने उपस्थित राहणार आहेत असे डॉ सचिन पुणेकर यांनी सांगितले.

# यशवंत'च्या जागेची २९९ कोटींना विक्री

## समितीच्या ठरावाला साखर आयुक्तांची परवानगी आवश्यक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या मालकीची सुमारे ९९.२७ एकर जमीन २९९ कोटी रुपयांमध्ये विक्री आणि खरेदीचा ठराव नुकताच कारखाना आणि बाजार समिती संचालक मंडळाच्या बैठकीत करण्यात आला. आता, या व्यवहाराला अंतिम मान्यता मिळण्यासाठी साखर आयुक्तांनी परवानगी देणे आवश्यक आहे.

यशवंत कारखान्याच्या संचालक मंडळाकडून कारखान्याची देणी देणे आणि भांडवल उभारणीसाठी स्वमालकीची ९९.२७ एकर जमीन सुमारे ३३५ कोटी एवढ्या रकमेस विक्री करण्याचा प्रस्ताव पुणे बाजार समितीस ३० ऑक्टोबर २०२४ रोजी देण्यात आला होता. विशेष म्हणजे नुकत्याच झालेल्या बैठकीत कारखान्याच्या मालकीची ९९.२७ एकर जमीन २९९ कोटी रुपयांत विक्री आणि खरेदी करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला आहे. बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात पार पडलेल्या बैठकीसाठी बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, यशवंत साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप, संचालक प्रतापराव गायकवाड, बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांच्यासह इतर संचालक मंडळ उपस्थित होते.

बाजार समिती आणि कारखान्याच्या संचालक मंडळाची संयुक्त बैठक पार पडली. यामध्ये कारखान्याची जमीन २९९ कोटी रुपयांना बाजार समितीला देण्याचा निर्णय झाला. इतर शासकीय परवानग्या घेऊन ही जागा विकत घेतली जाईल,





असे बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांनी सांगितले.

सध्याच्या रेडरिकनरनुसार ९९.२७ एकर जमिनीची किंमत अंदाजे ३३५ कोटी रुपयांच्या जवळपास आहे. कारखान्याच्या जमीन खरेदीसाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनिमय) अधिनियम १९६३ च्या कलम १२ (१) नुसार प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. परंतु, सदर जमीन खरेदीच्या दराबाबत काही त्रुटी आढळून आल्या असल्याने ही प्रक्रिया काहीशी रखडली आहे. दरम्यान दोन्ही संस्थांचे संचालक मंडळ आणि महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने उपबाजार आवाराकरिता जमीन खरेदीचा विचार बाजार समितीने केला होता. त्यानुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनिमय) अधिनियम १९६३ मधील कलम ११ (१) नुसार सध्याच्या रेडरिकनर दराने या ९९.२७ एकर जमिनीची बाजार किंमत ३३५ कोटी रुपये एवढी असल्याची माहिती मिळत आहे.

### साखर आयुक्तांच्या परवानगीकडे नजर

शेतकरी व बाजार घटकांच्या सुविधांसाठी जागेची आवश्यकता ओळखून पुणे बाजार समितीने शिवाजीराव भोसले सहकारी बँकेकडून कोरेगाव मूळ (ता. हवेली, जि. पुणे) येथील १२ एकर जमीन ५३ कोटी १७ लाख ८८ हजार ७०४ रुपयांना खरेदी केली होती. त्यानंतर ५ जुलै २०२४ रोजी जिल्हा उपनिबंधकांनी या जागेला उपबाजार आवार म्हणून अधिकृत मान्यता दिली आहे. आता यशवंतच्या जमीन खरेदीसाठी निधी उभारणीकरिता कोरेगाव मूळ येथील उपबाजाराची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. तसेच राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज घेण्याचाही पर्याय विचारात घेतला जात आहे. पणन संचालकांच्या मान्यतेनंतर या सर्व गोष्टींना अंतिम स्वरूप मिळू शकते.

दरम्यान, साखर आयुक्तांची परवानगी व यानंतरच्या प्रक्रियेवर परिसरातील सर्वांचे लक्ष लागले आहे. जर हा व्यवहार अंतिम टप्प्यात गेला, तर बाजार समितीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय ठरणार आहे.

# शिरुर तालुक्यात उन्हाचा कडाका

## शिक्रापूरात तापमान ३८ वर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सध्या पुणे जिल्हयासह अनेक ठिकाणी तापमानाचा पारा वाढत असताना शिरुर तालुक्यात काही ठिकाणी कमाल तापमान अडोतीस अंश ओलांडून चाळीशीपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे शिरुरकरांची लाहीलाही झाली आहे. नागरिकांना उष्णतेचा सामना करावा लागला असून, भरदिवसा अनेक रस्ते ओस पडून रस्त्यावर शुकशुकाट झालेला दिसत आहे.

महाराष्ट्रात उन्हाळा चांगलाच जाणवू लागलेला असताना, कित्येक ठिकाणी पाण्याची पातळी देखील खालावली आहे. काही ठिकाणी तीव्र ऊन जाणवत असून, पुणे जिल्ह्याचे कमाल तापमान चाळीस अंश आहे. शिरुर तालुक्यातील ग्रामीण भागात देखील कमाल तापमान चाळीस जवळ येऊ लागल्याने नागरिकांना उन्हाचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी उष्णतेमुळे नागरिकांची लाहीलाही होत असल्यामुळे नागरिक घरात बसणे पसंत करत असल्याचे दिसून येते. नेहमी गजबजलेले रस्ते व बाजारपेठा देखील देखील ओस पडून दिवसा रस्त्यावर शुकशुकाट दिसत आहे. वातावरणात देखील मोठा बदल झाल्याचे दिसून आले आहे.

### नागरिकांनी खबरदारी घ्यावी

उष्णतेचे प्रमाण जास्त झाल्यानंतर त्याचा परिणाम मानवी शरीरावर होऊन शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे नागरिकांनी भरपूर पाणी प्यावे, पाण्यात मीठ, साखरेचा वापर करावा विशेषतः दुपारी बारा ते तीन या वेळात घरात राहून विशेष खबरदारी घ्यावी असे आवाहन डॉ. शरद लांडगे व डॉ. पवन सोनवणे यांनी केले आहे.

## देशी वृक्षांची लागवड ही काळाची गरज



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** सध्या संपूर्ण जग तापमानवाढीच्या दुष्परिणामांना सामोरे जात आहे. यावर उपाय म्हणून मोठ्या प्रमाणात देशी वृक्षांची लागवड करणे काळाची गरज आहे. वृक्षांमुळे जैवविविधता वाढते, जलस्रोतांचे संवर्धन होते आणि नैसर्गिक समतोल टिकून राहतो. केवळ वृक्ष लावणेच नव्हे तर त्यांचे संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन जॉन्सस कंट्रोल इंडिया प्रा.लि. चे उपाध्यक्ष शिवकुमार सेल्वा यांनी केले.

जागतिक वन दिन व जागतिक जल दिनाचे औचित्य साधून जॉन्सस कंट्रोल इंडिया प्रा. लि. आणि उरुळी कांचन येथील भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कोडीत (ता. पुरंदर) येथे १२५० देशी वृक्षांची यशस्वी लागवड करण्यात आली. या उपक्रमामध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत अनेक मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी मनिष जेठवानी, प्रसन्न बारी, वर्तिका जिंदाल, सौम्यला नाझली, संतोष चिखले, नितीन राऊत, मोहन शेलार आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्थेचे प्रकल्प संचालक प्रकाश जगताप, दत्तात्रय लोंढे, अक्षय राऊत, जयेश खन्ना, शेखर मरकड यांच्यासह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

दरम्यान, भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्थेचे प्रकल्प संचालक प्रकाश जगताप यांनी वृक्ष लागवडीच्या शास्त्रीय पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यांनी झाडांमुळे होणाऱ्या फायद्यांवर प्रकाश टाकला. वृक्षलागवडीसारख्या उपक्रमांमुळे पर्यावरण संतुलन साधले जाईल आणि भविष्यासाठी स्वच्छ व निरोगी वातावरण उपलब्ध होईल, असा विश्वास मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला.

## धानारेत वनविभागाकडून बिबट जनजागृती अभियन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गाव भीमा :** धानोरे, ता. शिरुर सह डिंग्रजवाडी तसेच आजूबाजूच्या परिसरात शेतकऱ्यांसह नागरिकांना वारंवार बिबट्याचे दर्शन होत असल्याने शिरुर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या माध्यमातून धानोरे, डिंग्रजवाडी सह परिसरात रात्रगस्त करत नागरिकांना खबरदारीचे आवाहन करुन बिबट जनजागृती करण्यात येत आहे.

धानोरे ता. शिरुर सह डिंग्रजवाडी, पिंपळे जगताप, करंदी या परिसरात नागरिक व शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन होत असताना वनविभागाने परिसरात उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत असल्याने, शिरुर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल गौरी हिंगणे, वनरक्षक प्रमोद पाटील, बबन दहातोंडे, अभिजित सातपुते, शिरुर वनविभाग रेस्क्यू टीमचे शेरखान शेख, अमोल कुसाळकर, शुभम वाघ, श्रीकांत भाडळे यांच्या माध्यमातून परिसरातील गावांमध्ये रात्रगस्त सुरु केलेली आहे.

नागरिकांना बिबटपासून संरक्षण करण्याबाबतच्या उपाययोजनांची माहिती देण्यात येत आहे. दरम्यान नागरिकांना मार्गदर्शन करताना प्राण्यांवर बिबट्याचा हल्ला झाल्यास वनविभागाला माहिती द्यावी, शेतात काम करण्यासाठी एकट्याने जाऊ नये, शेतात घर असल्यास लहान मुलांना एकटे शाळेत पाठवू नये, सायंकाळच्या सुमारास मुलांना एकटे बाहेर सोडू नये, गोठा बंदिस्त ठेवावा, घराबाहेर व गोठ्यात उजेड ठेवावा, उसाच्या शेतालगत गुरे चरायला नेऊ नये, शेतात काम करताना आवाज करावा, गाणी लावावीत यांसह वनविभागाकडून शेतकरी व नागरिकांना करत पत्रक वाटण्यात आले.



शिरुर | डिंग्रजवाडी, ता. शिरुर येथे नागरिकांमध्ये बिबट जनजागृती करताना वनविभागाचे अधिकारी.

## फुले दांपत्यास भारतरत्न देण्याच्या ठरावानंतर

# खानवडी येथे पेढे वाटून आनंदोत्सव



आनंदोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** महाराष्ट्र सरकारच्या वतीने राज्याच्या दोन्ही सभागृहात राष्ट्रपिता क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न किताब देण्यात यावा याबाबत महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहात एकमताने ठराव मंजूर केल्याने राष्ट्रपिता महात्मा फुले यांच्या खानवडी या गावी फटाक्याची आतिषबाजी करून एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला.

महाराष्ट्र शासनाने राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा म्हणून विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहामध्ये एक मताने ठराव मंजूर करून केंद्र शासनाकडे मंजूर करण्यासाठी पाठवला.

महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे फुले दांपत्याला भारतरत्न पुरस्कार मिळावा म्हणून जो ठराव केला त्यासाठी खानवडी येथील महात्मा फुले स्मारक समिती, बहुजन हक्कपरिषद व खानवडी ग्रामस्थांनी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून फटाक्यांच्या आतिशबाजीत एकमेकांना पेढे भरवून आनंद उत्सव साजरा केला. यावेळी महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष सुदाम आप्पा इंगळे, महात्मा फुले स्मारक समितीचे उपाध्यक्ष विजय दादा कोलते व बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार यांनी मनोगत व्यक्त केले. खानवडी ग्रामस्थांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले.

महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे फुले दांपत्याला भारतरत्न पुरस्कार मिळावा म्हणून पाठवलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करून लवकरात लवकर या फुले दांपत्यांना भारतरत्न पुरस्कार मिळवून द्यावा. हेच खऱ्या अर्थाने फुले दांपत्यांना अभिवादन ठरेल, असे मत मनोगत व्यक्त केलेल्या मान्यवरांच्या वक्तव्यातून आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सरपंच रवींद्र फुले यांनी केले. सूत्रसंचालन गुरुकुल अकॅडमी चे संस्थापक संदीप टिळेकर यांनी केले तर आभार माजी सरपंच चंद्रकांत फुले यांनी मानले. यावेळी उपस्थितांमध्ये माजी सरपंच चंद्रकांत फुले, माजी सरपंच रवींद्र फुले, कैलास धिवार, राजेंद्र टिळेकर संदीप टिळेकर ,बाळासाहेब शेवते, अशोक झुरुंगे, दत्ता होले, विलास होले ,रघुनाथ होले, विलास होले यमाजी होले ,गुरुकुल अकॅडमी चे विद्यार्थी, जिल्हा परिषद खानवडी शाळेचे बालचमु यासह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर खानवडी उपस्थित होते.

## जवाहर नवोदय विद्यालयात पाच मुलांना प्रवेश



**आळंदी :** येथील पुणे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे या प्रशालेने आपल्या यापूर्वीचे उच्चांकात आणखी एक नवा उच्चांक शाळेतच्या इतिहासात जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा २०२५ मध्ये पाच विध्यार्थ्यांनी प्रवेश मिळवत नोंदविला आहे. यामुळे पंचक्रोशीत प्रशालेचे अभिनंदन केले जात आहे. केल्याने होत आहे रे...आधी केलेची पाहिजे, या उक्तीप्रमाणे, पुणे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे शाळेचा नवा उच्चांक शाळेच्या इतिहासात घडविला आहे. यात जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पाच मुलांची निवड झाली आहे. यामध्ये विश्वराज गावडे, कैवल्य कोळकर, अर्णव कुटे, यश राठोड, गौरव महाजन या मुलांचा समावेश आहे. या मुलांचे मार्गदर्शक शिक्षिका पूजा नाईक, शर्मिला भगत, सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात आले असल्याचे आदर्श मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे यांनी सांगितले. प्रशालेचे प्रेरणास्थान विस्ताराधिकारी राजेंद्र टिळेकर, गट शिक्षणाधिकारी जीवन कोकणे, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, शिक्षणाधिकारी संजय नाईकडे मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे, शिक्षकवृंद, जि प आदर्श प्राथमिक शाळा धानोरे, अध्यक्ष व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती धानोरे, सरपंच, उपसरपंच, सदस्य ग्रामपंचायत धानोरे यांनी मुलांचे यशाचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या.

## हिंदू मुस्लीम ऐक्यातून संस्कृतीचे दर्शन

**शिक्रापूर :** बारा बलुतेदार संघटनेकडून सामाजिक सलोखा जपत हिंदू मुस्लीम ऐक्यातून भारतीय संस्कृतीचे दर्शन होत असल्याचे प्रतिपादन शिक्रापूरचे सरपंच रमेश गडदे यांनी केले आहे. शिक्रापूर येथील जामा मस्जिदमध्ये बारा बलुतेदार संघटनेच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच रमेश गडदे बोलत होते. याप्रसंगी माजी पोलीस पाटील ज्ञानोबा विरोळे, बारा बलुतेदार संघटनेचे अध्यक्ष कुंदन गोसावी, सचिव पप्पू गुरव, कार्यवाहक अंकुश घारे, तंटामुक्तीचे माजी उपाध्यक्ष मंगेश चव्हाण, युगपुरुष सामाजिक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश सोंडे, हाजी सिराजभाई शेख, हाजी चांदभाई तांबोळी, आयुब तांबोळी, सलीम तांबोळी, फिरोज तांबोळी, सादीक तांबोळी, महंमद तांबोळी, अब्दुलभाई तांबोळी, मन्सूरभाई इनामदार, मौलाना अशरफ, नुरमहंमद मुल्ला यांसह आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. एन. बी. मुल्ला यांनी केले तर हाजी सिराजभाई शेख यांनी सर्वांचे आभार मानले.

## एकोपा कायम राहण्यासाठी इफ्तारचे आयोजन



**जुन्नर :** पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने हिंदू मुस्लिम बांधवांमध्ये सामाजिक एकोपा शांतता , सर्व धर्म समभाव कायम रहावा या उद्देशाने जुन्नर मधील ब्राह्मण बुधवार पेठेमधील ऐतिहासिक गवंडी मशिदीमध्ये रोजा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. कोणतेही राजकारणी भाषणे न होता उपस्थित हिंदू मुस्लिम समाज बांधवांचा सन्मान करण्यात येऊन सर्वांनी सामुहिकपणे उपवासाची सांगता केली. या कार्यक्रमामध्ये या मशीद ट्रस्टचे अध्यक्ष निसार शेख, हाजी फिरोज पठाण, मौलाना गुलाम रसूल, पोलीस उपनिरीक्षक ऋषी टिटमे, महादेव राबाडे, अविनाश देशमुख, पीर महमंद हलवाई, धनंजय वाकचौरे, रफीक तकी, रज्जाक तांबोळी, सुखदेव भुजबळ, नानासाहेब खत्री, धनेश गवळी, बाबा शेख, मूनवर सय्यद, इमतीयाज तिरंदाज, बुजमिल शेख, साजिद खान आदींसह मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झालेले होते.

# जेजुरी गडावर गुढीपाडवा उत्साहात



जेजुरी — जेजुरी येथील खंडोबा गडावर गुढी उभारून रविवारी गुढी पाडवा सण उत्साहात साजरा करण्यात आला. इन्सेट : सुवर्णाक्षरांतील जयमल्हारचे अनावरण करताना

## सुवर्णाक्षरातील 'जयमल्हार'चे जेजुरीत अनावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिरात सुवर्णाक्षरातील जयमल्हार नावाचे अनावरण करण्यात आले. तसेच गडावर गुढी उभारून गुढी पाडवा साजरा करण्यात आला.

गुढी पाडव्याच्या निमित्ताने दिल्ली येथील उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तेजस कारिया व प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त अॅड पांडुरंग थोरवे, डॉ राजेंद्र खेडेकर, मंगेश घोणे यांच्या शुभहस्ते श्री खंडोबा मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यामध्ये भाविक भक्तांनी अर्पण केलेले रक्कम रु. १७ लक्ष ५१ हजार किमतीचे सोन्यामध्ये बनविलेल्या || जय मल्हार|| नावाचे पूजन करून अनावरण करण्यात आले.

यावेळी सर्व विश्वस्त मंडळ, खांदेकरी, मानकरी, ग्रामस्थ, व पुजारी सेवेकरी वर्ग उपस्थित होते. तसेच सालाबादप्रमाणे श्री खंडोबा मंदिरामध्ये हिंदू नववर्षानिमित्त श्री खंडोबा देवाची गुढी प्रमुख विश्वस्त व सर्व विश्वस्त मंडळ यांचे हस्ते विधीवत पूजा करून पुजारी सेवेकरी, अधिकारी कर्मचारी वर्ग यांचे उपस्थितीमध्ये उभारण्यात आली.

# अधिकार व कर्तव्ये संदर्भात प्रशिक्षण देणार

## चार नगरपरिषदांमध्ये पथविक्रेता समिती जाहीर

सासवड, जेजुरी, बारामती, दौंडसह राज्यात ४० ठिकाणी पथ विक्रेता समिती अधिकृत स्थापन करण्यात आलेल्या आहेत. जाणीव संघटना व दिलासा जन विकास संस्थेच्या वतीने विविध ठिकाणी पथ विक्रेता समिती सदस्य यांचे अधिकार व कर्तव्ये यासंदर्भात प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे जाणीव हातगाडी, फेरी, पथारी, स्टॉलधारक संघटनेचे कार्यवाह संजय शंके यांनी सांगितले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** नगरपरिषदांमध्ये शासकीय विभागांचे अध्यक्ष मुख्याधिकारी, सदस्य पोलीस ठाण्याचे अधिकारी, स्थानिक वाहतूक पोलीस अधिकारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सहाय्यक नगर रचनाकार नगरपरिषद, जिल्हा अग्रणी बँकेचा प्रतिनिधी. १ जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक हे पदसिद्ध असणार आहेत.

**सासवड नगरपरिषद इतर मंडळे :** पथ विक्रेत्यांचे प्रतिनिधी : सुनिता पवार, शकील बागवान, हरून बागवान, शरद पाडसे, कालिदास पापळ, गुलाब सोनवणे, शमशाद फकीर, अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटनांचे प्रतिनिधी : श्वेता ओतारी, विनायक दहिभाते. निवासी कल्याण संघाचे प्रतिनिधी : सदानंद जगताप, शंकर ननावरे, व्यापारी संघाचा प्रतिनिधी : विकास विरकर, पणन संघाचा प्रतिनिधी : अनिल माने.

**बारामती नगरपरिषद, इतर मंडळे : पथ विक्रेत्यांचे प्रतिनिधी :** गौरव अहिवळे, राहूल कांबळे, अर्चना लोंढे, अश्विन खरात, लता घालपे, फैयाज शेख, सुधीर घोडके. अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटनांचे प्रतिनिधी : काळुराम चौधरी, आसिफ शेख. निवासी कल्याण संघाचे प्रतिनिधी : सिद्धार्थ लोंढे, शुभम अहिवळे. व्यापारी संघाचा प्रतिनिधी : शैलेश साळुंके. पणन संघाचा प्रतिनिधी : सूर्यकांत मोरे.

**जेजुरी नगरपरिषद इतर मंडळे पथ विक्रेत्यांचे प्रतिनिधी : -** जयश्री रोमण, बाळासाहेब माळवदकर, शांताराम खोमणे, दत्तात्रय हरिश्चंद्रे, सुनंदा घोरपडे, लतिफा मणेर, संगिता चांदेकर, गौरी लांघी. अशासकीय संघटना आणि समुदाय **आधारित संघटनांचे प्रतिनिधी :** स्वाती महादेव माळवदकर, निलेश प्रकाश भुजबळ. निवासी कल्याण संघाचे प्रतिनिधी : सचिन उपाध्ये, विशाल भोसले. व्यापारी संघाचा प्रतिनिधी : हनुमंत खोमणे. पणन संघाचा प्रतिनिधी : हरिदास रत्नपारखी.

**दौंड नगरपरिषद :** राहुल त्रिभुवन, पाकिजा पठाण, रेखा थोरात, सिंधू घिवार, वसिम तांबोळी, साईनाथ शिंदे. अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटनांचे प्रतिनिधी : सचिन कुलकर्णी, पोपट रणदिवे. निवासी कल्याण संघाचे प्रतिनिधी : प्रकाश गाडे, केशव करंडे. व्यापारी संघाचा प्रतिनिधी : रोहित पाटील. पणन संघाचा प्रतिनिधी : मोहन काटे.







## किराणा दुकान चालक महिलेचे गंठण हिसकावले



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर, ता. शिरुर येथील जातेगाव रोड पाटवस्ती येथे अश्विनी भोंडवे यांचे श्रीकृष्ण सुपर मार्केट नावाने किराणा दुकान असून, सकाळच्या सुमारास अश्विनी यांनी दुकान उघडल्यानंतर दुचाकीहून दोन युवक आले. त्यापैकी एक युवक दुकानापुढे दुचाकी घेऊन उभा राहिला, तर एक युवक दुकानात येऊन त्याने अश्विनी यांना पाण्याची बाटली मागितली. त्यावेळी त्याला पाणी बाटली देत असताना, सदर युवकाने अश्विनी यांच्या गळ्यातील गंठण हिसकावून पळत जाऊन दुचाकीवर बसला. दुचाकीवर बसून दोघेजण भरधाव वेगाने निघून गेले. यावेळी अश्विनी यांनी दुचाकीकडे धाव घेतली.

मात्र, ते पळून जाण्यात यशस्वी झाले. याबाबत अश्विनी रामकृष्ण भोंडवे (३६, रा. पाटवस्ती शिक्रापूर ता. शिरूर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी दोन अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल केला आहे

### घटनांमध्ये साम्य


रांजणगाव गणपती येथे दोन दिवसांपूर्वी दुचाकीहून आलेल्या दोघांनी एका महिलेला पन्नास रुपये देत पाण्याची बाटली मागितली आणि गंठण घेऊन पळून गेले, त्याच पद्धतीने शिक्रापूर येथे देखील दुचाकीहून आलेल्या दोघांनी महिलेला पन्नास रुपये देत पाण्याची बाटली मागितली आणि गंठण घेऊन ते पळून गेले. त्यामुळे रांजणगाव व शिक्रापूर येथील घटना हुबेहूब असून दोन्ही घटनेतील आरोपी एकच असल्याची चर्चा रंगली आहे.

## पुरंदरच्या शंभू भक्तांकडून दीड लाखांची मूर्ती अर्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** वढू बुद्रुक, ता. शिरुर येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या ३३६ व्या पुण्यतिथी निमित्ताने पुरंदर तालुक्यातील वाल्हे येथील अतुल रामकृष्ण नाझरे या शंभू भक्ताने छत्रपती संभाजी महाराजांची तब्बल दीड लाख रुपये स्वखर्च करून आकर्षक मूर्ती बनवून सदर मूर्ती शंभू चरणी अर्पण आहे.

वढू बुद्रुक येथे छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळी अतुल नाझरे यांनी अर्पण केलेल्या मुर्तीबद्दल ते म्हणाले, सिंहासनावर शंभू राजे विराजमान झालेले दिसतात, हातात तलवार असून त्यावर चांदीचे रत्नजडित आभूषणाने सजवलेले असून या मूर्ती मध्ये शंभू राजेंचे वय चोवीसच्या आसपास दिसून येत आहे. मूर्तीच्या पाठीमागे भाला, तराजू असून जेव्हा आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंहासन पळवून नेण्यात आले, तेव्हापासून त्या सिंहासनासजा विचार वारंवार डोक्यात येत असल्याने मी तशाच प्रकारचे सिंहासन बनवायचे ठरवले. यासाठी दीड लाख रुपये खर्च झाला असून, मला खूप समाधान वाटत असल्याचे अतुल नाझरे यांनी सांगितले.





वढू बुद्रुक येथे छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळी मूर्ती अर्पण करणारे अतुल नाझरे व राजेंची मूर्ती

# कांद्याच्या आवकेत मोठी घट; पालेभाज्याही गडगडल्या

## एकूण उलाढाल ४ कोटी ३० लाख रुपये



**चाकण बाजारात कांद्याची झालेली आवक.** (छाया : अविनाश दुधवडे, चाकण)

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये कांद्याच्या आवकेत मोठी घट झाली. कांद्याचे दर घसरलेले असल्याने आवक कमी होत आहे. टोमॅटो, लसुण व कारल्याची प्रचंड आवक झाली. पालेभाज्यांची भरपूर आवक झाल्याने भाव गडगडले आहेत. भुईमूग शेंगा व जळगाव भुईमूग शेंगांची काहीच आवक झाली नाही. एकूण उलाढाल ४ कोटी ३० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ४,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक दुपटीने घटली. कांद्याचा कमाल भाव १,६०० रुपयांवर स्थिर राहिला. बटाट्याची एकूण आवक १,१०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ४०० क्विंटलने घटली. बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २ क्विंटलने वाढून लसणाचा कमाल भाव १० हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३२५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ते ५ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

### शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे

- कांदा - एकूण आवक - ४,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,६०० रुपये,भाव क्रमांक २.१,४०० रुपये,भाव क्रमांक ३.१,००० रुपये.
- बटाटा - एकूण आवक - १,१०० क्विंटल.भाव क्रमांक १.२,००० रुपये, भाव क्रमांक २.१,३०० रुपये,भाव क्रमांक ३.१,१०० रुपये.

### फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

- टोमॅटो ३५० क्विंटल (५०० ते १,००० रू.),कोबी - २८० क्विंटल ३०० ते ५०० रू.),फ्लॉवर -२६५ क्विंटल (४०० ते ६०० रु.),वांगी - १०४ क्विंटल (१,००० ते २,००० रु.),भेंडी - ९० क्विंटल (२,००० ते ४,००० रु.),दोडका - ६५ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),कारली - ८६ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.),दुधीभोपळा - ६४ क्विंटल (१,००० ते २,००० रु.),काकडी - ११५ क्विंटल (८०० ते १,५०० रु.),फरशी - ५९ क्विंटल (३,५०० ते ४,५०० रु.),वालवड - ३८ क्विंटल (५,००० ते ६,००० रुपये), ढोबळी मिरची -१८० क्विंटल (२,००० ते ४,००० रु.),चवळी -४८ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.),शेवगा -६५ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.),गाजर - १८० क्विंटल (१,००० ते १,५०० रु.),गवार -५८ क्विंटल (५,००० ते ८,००० ),वाटाणा -२०० क्विंटल (५,००० ते ५,५००),आले -१९५ क्विंटल ( २,००० ते ४,००० ).,
- मेथी - एकूण १८ हजार ५०० जुड्या (१,००० ते १,५०० रुपये ),कोथिंबीर - एकूण २९ हजार २०० जुड्या (६०० ते १,००० रुपये,),शेपू - एकूण ३ हजार १०० जुड्या (८०० ते १,००० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ८५० जुड्या (५०० ते ६०० रुपये),.
- चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या २२ जर्शी गाईपैकी १८ गाईची विक्री झाली.(१०,००० ते ५०,००० रु.),४५ बैलांपैकी ३५ बैलांची विक्री झाली.(१०,००० ते ४०,००० रु.), ९० म्हशीपैकी ७५ म्हशींची विक्री झाली.(२०,००० ते ८०,००० रु.),१० हजार २०० शेळ्या - मेंढ्यापैकी ९,९०० शेळ्यांची विक्री झाली. (२,००० ते १५,००० रु.).

१. प्लासीची लढाई कोणत्या साली झाली? २. पुरू राजा आणि अलेक्झांडर यांच्यातील लढाई कोणत्या नद्यांच्या मध्ये झाली? ३. श्रीरंगपट्टणमचा करार कुणात झाला? ४. तोडरमल कशासाठी प्रसिद्ध होता? ५. कोणत्या मुघल बादशहांनी त्यांची आत्मचरित्रे लिहिली आहेत?

## वाढवा जीके

**उत्तरे : १. १७५७, २. झेलम आणि चिनाब, ३. टीपू सुलतान आणि कॉर्नवॉलीस, ४. जमीन महसूल सुधारणा, ५. बाबर आणि जहांगीर**

## मोलाचे विचार

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते.
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर



## टेक्नोलॉजी

# तरुणाईसाठी काही उपयोगी सोशलसाईटस्

जगभरात काम करणाऱ्या पाच अशा वेबसाईटस आपण पाहूया. ज्या तरुणाई आणि इंटरनेट ची सांगड ही सामाजिक कामासाठी घालू शकतो, हे सिद्ध करतात.

**टेकिंग आयटी ग्लोबल :** ही सोशल वेबसाईट जगभरातल्या तरुणांचे प्रश्न सोडवण्याचे काम करते. ह्या वेबसाईटचे सभासद झाल्यावर विद्यार्थी त्यांच्या कल्पना मांडू शकतात, किंवा वेबसाईटच्या इतर सभासदांकडून सुचना मागवू शकतात. त्यानुसार ते काम करु शकतात.

**रॅन्डमकिड :** ही सोशल वेबसाईट तीन टप्प्यात काम करते. या वेबसाईटवर जाऊन तुम्ही एखादा प्रश्न निवडू शकता. उदा. स्वच्छ पाणी. या प्रश्नावर विविध संस्थांनी सुचविलेले उपाय तुम्ही पाहून निवडू शकता. नंतर या तुमच्या प्रकल्पाच्या पेजवर तुम्ही ते सांगून निधी गोळा करु शकता.




**कूडूझ :** ही संवादी वेबसाईट आहे. ज्या तरुणांना काही सामाजिक बदल घडवून आणायची इच्छा असते, अशांसाठी ही वेबसाईट उपयोगाची आहे. यात वेबसाईटच्या वापरकर्त्यांच्या वयानुसार आव्हानात्मक कामे दिलेली असतात. या वेबसाईटवरून माहिती घेणे, वापरणे याकरिता त्यांचे सभासदत्व घ्यावे लागते.

**डू समथिंग डॉट ऑर्ग :** ही वेबसाईट टीनएजर म्हणजे १३ वर्षांपुढील तरुण–तरुणींसाठी आहे. या वेबसाईटवर त्याच पद्धतीची माहिती देण्यात आली आहे. ही वेबसाईटवर शोध घेताना काही मुलांसाठीचे प्रकल्पही दिसतील. प्रश्नही दिसतील. कोणत्या कारणाने, कुणाबरोबर, कुठे आणि किती काळ या चार स्तरांवर आधारित प्रकल्प तुम्हाला पाहायला मिळतील.

**फ्री राईस :** जगातल्या आहार कार्यक्रमाला या वेबसाईटचा फायदा होतो आहे. ही सोशल वेबसाईट नाही, ती कोणत्याही प्रकारच्या मदतीचे आवाहन करत नाही. या वेबसाईटवर गेल्यावर, तुम्हाला काही प्रश्न विचारले जातात. त्यांच्या बरोबर उत्तरासाठी गरजवंत समाजाला तांदूळ दान करण्यात येतात. विद्यार्थी किंवा शिक्षणासंबंधी लोकांनी आकर्षित करण्याच प्रयत्न ही वेबसाईट करते. प्रत्येक योग्य उत्तरासाठी प्रायोजक तांदूळ दान करतो. अनेक शिक्षक शाळेमध्ये ह्या वेबसाईटचा शिकवण्यासाठी वापर करतात. समूहाने सुद्धा यात सहभागी होता येते.

# एमएस ऑफीसच्या वेळबचाऊ ट्रिक्स

**क्विक स्टाईल वापरा :** वर्डमध्ये असलेली सर्व कागदपत्रे क्विक स्टाईलचा वापर करून फॉरमॅट करू शकता. ही स्टाईल किंवा पद्धत वापरल्याने तुम्हाला फॉंट किंवा हेडिंगची स्टाईल बदलण्याची गरज भासत नाही. क्विक स्टाईल हे आपल्याला जुन्या फॉरमॅटमधील डॉक्यूमेंट सहजपणे मोठ्या फाईलमध्ये उपलब्ध करून देते.

**ऑफिस क्लिपबोर्ड :** ऑफिस क्लिपबोर्ड वापरून आपण अनेक बाबी अनेकदा कॉपी आणि पेस्ट करू शकतो. मायक्रोसॉफ्ट ऑफीस क्लिपबोर्डमुळे आपण चोवीस वेळेस




कॉपी–पेस्ट करू शकतो. त्याचबरोबर ऑफिस डॉक्यूमेंटस किंवा अन्य प्रोग्रॅममधून ग्राफिकल गोष्टी अन्य ऑफीस डॉक्यूमेंटसमध्ये पेस्ट करू शकतो.

**फॉरमॅटिंग मार्क्स :** फॉरमॅटिंग मार्क्स आपण शो किंवा हाइड करू शकतो. आपल्या डॉक्यूमेंटमधील टेक्स्ट लेआऊटसाठी फॉरमॅटिंग मार्क्स साह्यभूत ठरतो. आपल्याला एखाद्या लेखांचे विशेष लेआऊट करायचे असेल तर फॉरमॅटिंग मार्क्स उपयोगी ठरतो.

**किबोर्ड शॉर्टकट :** आपल्या गरजेनुसार किबोर्ड शॉर्टकट तयार करु शकतो. माक्रो, फॉंट, स्टाईल किंवा चिन्ह यासाठी शॉर्टकट उपलब्ध आहेत. त्याचबरोबर आपण तयार केलेले शॉटकर्ट काढून टाकू शकतो.

**क्विक पार्टस :** स्टोअर निर्मितीसाठी क्विक पार्टस गॅलरीचा वापर करू शकतो. आपल्याला हवा असलेला मजकूर तेथून घेऊ शकतो. त्यात अॅटो टेक्स्ट, डॉक्यूमेंट प्रॉपर्टीज यासारख्या डॉक्यूमेंटसह पुस्तकांचा समावेश असतो.

# कामातील एकाग्रता वाढवण्यासाठी...

▶ **नियमितपणा ठेवा :** कामातील एकाग्रता आणि एकसंधपणा राहण्यासाठी ऑफिसमधील आपल्या कार्यमग्नतेत नियमितपणा ठेवायला हवा. ऑफीसची वेळ नियमितपणे पाळून सर्व गोष्टी वेळच्या वेळी करण्याची सवय असावी. आज आपल्याला कोणते काम पूर्ण करायचे आहे, याबाबत सजग राहून ते काम वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. नियमितपणे येणाऱ्या मेलला तात्काळ प्रतिसाद देणे, त्याचबरोबर लंच टाइममध्ये आपण काय केले आणि काय करायला पाहिजे, याचा उजाळा घ्या, जेणेकरून राहिलेल्या गोष्टी पुन्हा करून आपल्या कामात सुधारणा करता येऊ शकेल.



▶ **एकावेळी एकच गोष्ट करा :** अनेकांना कामं अंगावर ओढून घ्यायची सवय असते. त्यातून एकही काम धड आणि चांगल्या पद्धतीने पार पाडले जात नाही. उलट वरिष्ठाची बोलणी खावी लागतात. एकावेळी एकच काम निवडून ते नियोजनबद्धरितीने कसे पूर्ण करता येईल, याचा विचार करावा. ते काम तडीस नेण्यासाठी पूरक गोष्टींचा विचार करावा आणि गरजेनुसार त्याची उपलब्धता करून ते काम पूर्ण होऊ शकते. कधी कधी एकावेळी अनेक आघाड्यावर काम करावे लागते. अशा वेळी तुमच्या कार्यक्षमतेचे कौशल्य पणाला लागते. एकाचवेळी मेल, फोन, समोरचा व्यक्ती, बॉसशी संवाद अशा अनेक गोष्टींना सांभाळावे लागते. परंतु आपण विचारपूर्वक या गोष्टी हाताळू शकतो, असा आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. या आत्मविश्वासाच्या बळावरच सर्व कामे आपण व्यवस्थित पार पाडू शकतो.

▶ **कामाचे नियोजन करा :** काम कोणतेही असो घरचे किंवा कार्यालयाचे ते करण्यापूर्वी त्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. कामाचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार ते काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. तातडीचे, अतिमहत्त्वाचे, महत्त्वाचे, कमी महत्त्वाचे, साधारण अशी वर्गवारी करून त्यात कामाची यादी केली पाहिजे. कामाचा प्राधान्यक्रम निश्चित केल्याने कोणतेही काम रेंगाळत नाहीत आणि आपण प्रत्येक कामाला पुरेसा वेळ देऊन ते काम योग्यपद्धतीने हाताळू शकतो. कामाच्या नियोजनामुळे अवघड कामही सोपे होऊ शकते आणि येणारे संभाव्य दडपणही कमी होऊन कामावर एकाग्रता ठेवू शकतो.

▶ **अवघड काम अगोदर :** अवघड काम आहे, म्हणून ते लांबणीवर टाकून आपणच अडचणी निर्माण करतो. अशा वेळी जे अवघड काम आहे, ते अगोदर घेऊन ते पूर्ण करण्यासाठी अधिक प्रयत्न करायला हवेत. अवघड काम अगोदर पार पाडल्यामुळे पुढील कामावरची एकाग्रता कायम राहते. अवघड कामाचा विचार मनात येत नाही आणि आपण आपले लक्ष्य सहज गाठू शकतो. एकदा आपण अवघड कामगिरी पार पाडली की पुढची कामे आपोआप होत जातात.

▶ **कामाची वाटणी करा :** एका टप्प्यात एखादे काम पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची वाटणी दोन–तीन टप्प्यात करा. कारण काही कामांना किंवा उपक्रमांना वेळ अधिक द्यावा लागतो. आपल्या अपेक्षेपेक्षा त्या कामाला अधिक वेळ लागला तर त्यावरची एकाग्रता ढळू न देता ते काम पूर्ण करण्यासाठी त्याची विभागणी करून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. तसेच कामामुळे आपल्या शिथिलता येण्याची शक्यता असते. आपल्या फ्रेश वाटावे म्हणून कामात ब्रेक घेण्याची सवय ठेवली पाहिजे. फावल्या वेळेत हलक्याफुलक्या विषयावर चर्चा करून काही वेळ विरंगुळा करावा. तसेच सुटीच्या दिवशी कुटुंबासमवेत, मित्रांसमवेत थोडा वेळ दिला की मनावरचे दडपण कमी होऊन दुसऱ्या दिवशी फ्रेश मुडमध्ये कामावर जाण्यास तयार राहतो. जेणेकरून आपल्या कामावरची एकाग्रता कमी होत नाही.

# चांगला रुममेट शोधताना...


*शिक्षणानिमित्त किंवा नोकरीनिमित्त आपल्याला गाव सोडावे लागते. शिक्षणाच्या ठिकाणी आपल्याला हॉस्टेल मिळेलच याची खात्री देता येत नाही. अशा वेळी आपण राहण्यासाठी एखादी रुम किंवा फ्लॅट पाहतो. त्या रुमचे किंवा फ्लॅटचे भाडे एकट्यानेच भरण्याऐवजी एखादा पार्टनर किंवा रुममेट पाहतो. बरेच जण आपल्याच क्लासमधील मुलाला रुममेट करतात, जेणेकरून अभ्यासासाठी उपयोगी ठरेल तर अनेक जण वैचारिक साम्य असलेल्या मित्राला प्राधान्य देतात. कधी कधी अनोळखी व्यक्तीला रुममेट म्हणून स्वीकारावे लागते. त्याच्या जर सवयी चांगल्या असतील तर ठिक, नाही तर वाद किंवा गैरसमज होण्यास वेळ लागत नाही. तो जर व्यसनी, भांडकुदळ असेल तर आपल्या अभ्यासावर, कारकिर्दीवर परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणूनच चांगला रुममेट किंवा पार्टनर मिळणे खूप आवश्यक आहे. आपल्या करियरची पायाभरणी होत असताना उत्तम मित्र किंवा पार्टनर हा महत्त्वाची भूमिका बजावत असतो. रुममेट पाहताना आपण काही पथ्ये पाळली पाहिजेत, ती अशी.*

**काळजीपूर्वक निवड :** रुममेट किंवा सहकारी पाहताना तो



कसा आहे, राहणीमान, नीटनेटका, वेळ पाळणारा आहे की नाही याची पडताळणी करून घेणे गरजेचे आहे.अभ्यासाबाबत किंवा नोकरीबाबत त्याची संकल्पना काय आहे, हेही जाणून घेतले पाहिजे. नियमित साफसफाई करणे, कपड्यांचा पसारा न वाढविणे याकडे कटाक्ष ठेवणारा रुममेट चांगला सहकारी बनू शकतो. बेशिस्त, आळशी, उगाच गप्पाडा, टाईमपास करणारा किंवा वेळखावू रुममेट आपल्यासाठी नुकसानकारक ठरू शकतो. रुममधील कामाचे वाटप करून दोघांनी त्याची जबाबदारी पेलावी लागते. ही जबाबदारी पेलण्यास तयार आहे का, हेही तपासण्याची गरज आहे. ओळखीचा किंवा मित्र असेल किंवा एकाच वर्गात असेल तर त्यात फारशा अडचणी येत नाहीत. मात्र अनोळखी व्यक्तीला जागा देताना या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.

**खर्चाचे नियोजन :** रुम किंवा फ्लॅटमध्ये राहताना खर्चाचे नियोजन करणे गरजेचे आहे. रुमचा किराया, मेसचा खर्च, मेटेनन्स, लाइटबिल, फोनबिल आदींबाबत गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत. वेळेवर किराया देऊन मालकाला आपल्याबद्दलचा विश्वास वाढविण्याची गरज असते. तो विश्वास टिकवण्यासाठी येणारा



रुममेट योग्य आहे का नाही, हेही तपासून पाहयला हवे.

**सवयी पाहणे :** दोघे एकत्र राहण्यापूर्वी नव्या रुममेटच्या सवयी पाहणे महत्त्वाचे ठरते. जर दोघांच्या सवयी मिळत्या जुळत्या असतील तर चांगला पार्टनर होऊ शकतो. एक पार्टनर शाकाहरी असेल आणि दुसरा जर मासांहारी असेल तर एकत्र राहणे अवघड जाते. पार्टनरला पार्ट्या करण्याची, उगाचच मित्र गोळा करण्याची सवय असेल तर रुममधील मित्रांना अवघडल्यासारखे होते. तसेच वारंवार होणाऱ्या पार्ट्यांमुळे सोसायटीत नावही खराब होण्याचा धोका असतो. अशा वेळी संभाव्य पार्टनरची माहिती अन्य मित्रांकडून किंवा कॉलेजमधून गोळा करणे.

**मित्राचीच निवड करा :** रुममेट निवडताना शक्यतो मित्र असलेला अधिक चांगले. कारण मित्र असल्याने त्याचे आचार–विचारांची माहिती असते. त्यामुळे एकत्र राहताना संभाव्य अडचणी येत नाही. मित्र असल्याने आर्थिक अडचणीच्या काळात तो कोणताही विचार न करताना मदत करू शकतो. अनोळखी व्यक्तीकडून अशी अपेक्षा बाळगताना संकोचपणा येण्याची शक्यता अधिक असते.

**कुटुंबाची पार्श्वभूमी तपासा :** रुममेट म्हणून स्वीकारताना संबंधित मुलाची किंवा मुलीची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहणे गरजेचे आहे. उच्च शिक्षित कुटुंबातील रुममेट हा आपले जीवन सुसह्य करू शकतो. याउलट गुन्हेगारी पार्श्वभूमीचा किंवा दादागिरी करणाऱ्या लोकात राहणारा रुममेट आपल्यासाठी डोकेदुखी ठरू शकतो. रुममेटचे चारित्र्य, वैचारिक पातळी पाहूनच त्याला आपल्या खोलीत प्रवेश द्यायला हवा. वाचन करणारा, चांगले विचार मांडणारा, भविष्याबाबतचा दृष्टीकोन सांगणारा प्रगल्भ विचाराचा मित्र किंवा रुममेट आपल्याला अडचणीच्या काळात मदतीला येऊ शकतो.

**खासगी आयुष्य जपणारा :** रुममध्ये राहत असताना दोघांनीही आपापले खासगी आयुष्य जपण्याची खबरदारी घेतली पाहिजे. उगाचच एकमेकाच्या आयुष्यात ढवळाढवळ किंवा दखल देण्याचा प्रयत्न करू नये. अशा विचाराचा रुममेट असणे योग्य ठरेल. एखादेवेळी फोनवरून कुटुंबातील अडचणीबाबत चर्चा होत असेल तर समोरील पार्टनरनने त्याबाबत उगाचच चौकशी करून त्यात हस्तक्षेप करू नये. गरज भासल्यास संबंधित मित्राला सल्ला मागितल्यास आपले मत मांडणे योग्य ठरू शकते. परंतु इच्छा नसताना लुडबूड करणे योग्य नसते. रुमवर येणारे पाहुणे, मित्रमंडळी यांचा आदर कसा राखला जाईल, याची काळजी घेणारे रुममेट असावेत.

**फॅशनच्या अत्यंत वैविध्यपूर्ण अशा ट्रेन्ड्समध्ये सध्या आरामदायक आणि हटके लूक देणारा ट्रेन्ड म्हणजे पायजमा ट्रेन्ड होय. अर्थात हा ट्रेन्ड अगदीच नवा नाही. पण सध्या तो नवे रुप घेऊन आलेला आहे, एवढे मात्र नक्की. काही वर्षांपूर्वी फक्त झोपताना पायजमा घालण्याचा ट्रेन्ड होता. परंतु आता मात्र तरुणींमध्ये 'पायजमा लुक' हा एक महत्वाचा फॅशन ट्रेन्ड बनलेला आहे. कुठल्याही फॅशन स्ट्रीटवर गेल्यानंतर नव्या रुपातल्या पायजम्याची असंख्य रुपे पहायला मिळतात. स्टायलिश आणि पॉलिश्ड् लूक येण्यासाठी आपण हा पायजमा वेगवेगळ्या प्रकारे कॅरी करु शकतो.**

# पायजमा नव्या रूपात

▶ **ॲक्सेसरीसोबत पायजमा :** पायजम्यासोबत कॉटन शर्ट्स वेगळ्या स्टाईलिश पद्धतीने घालता येऊ शकतात. स्टाईलिश पायजम्यासोबत कुल सनग्लासेस, क्लासिक शुज, स्ट्रक्चर्ड बॅग, शिफॉन स्कार्फ, हॅट इत्यादी प्रकारच्या कोणत्याही ॲक्सेसरीजचा वापर करता येऊ शकतो. यामुळे झोपण्यासाठी वापरण्यात येणारे हे आउटफिट नाही असा लूक मिळू शकतो. गबाळेपण दिसू नये यासाठी पायजम्यासोबत नेहमीच स्टाईलिश आणि पॉलिश्ड् ॲक्सेसरीज वापरावीत हे कायम लक्षात ठेवावे. पायजम्यासोबत स्निकर्स किंवा स्टिलीटोज या टाईपचे फुटवेअर निवडावेत. स्लिपर्ससारखे फुटवेअर निवडू नयेत. सोपा मार्ग म्हणजे हिल्सच्या कुठल्याही फुटवेअर अधिक स्टाईलिश दिसू शकते.



▶ **फिटिंग आणि प्रिन्ट :** पायजम्याचे फिटींग हे ओव्हरसाईज्ड नसावे. प्रिन्टमध्ये फ्लोरल, स्ट्राईप्स, ज्योमॅट्रीक आणि सिल्क किंवा इतर ड्रेसी फॅब्रीकवर असतात अशा प्रिन्टची निवड करावी. पायजम्यावर घालण्यात येणारे टॉप हे नेहमी मोठ्या बाह्यांचे असतात, पण थोडेश वेगळेपण आणण्यासाठी स्लिव्हलेस, हॅल्टर किंवा कटआउट स्टाईलचे टॉप घालता येऊ शकतात.

▶ पायजमा हा ट्रेन्ड सध्या नवा असला तरी त्यावर आपल्या वॉर्डरोबमध्ये असणारे वेगवेगळ्या प्रकारचे टॉप्स् घालता येऊ शकतात. पायजमा प्रिन्टेड असेल तर त्यावर स्टाईलिश ब्लाऊज, बटन डाऊन शर्ट किंवा बोल्ड टॅन्क टॉप यापैकी काहीही घालता येते. फुटवेअर म्हणून हिल्स घातला असेल तर हातावर मोठे घड्याळ, सनग्लासेस असा पेहराव करावा. म्हणजे स्लीपवेअर लूक येणार नाही.

▶ **स्टाईलिश कोट किंवा जॉकेट :** पायजमा घातल्यानंतर वेगळा लूक येण्यासाठी त्यावर जॅकेट किंवा कोट सुद्धा घालता येतो. त्यामुळे अधिक पॉलिश्ड् लूक मिळतो. न्यूट्रल शेड मधले ब्लेझर तसेच लेदर जॅकेट यामुळे केवळ स्टाईलिशच नाही तर इंटरनॅशनल फॅशन लूक मिळतो. प्रिन्टेड पायजमा घातल्यानंतर त्यावर सॉलिड कलरचे आउटवेअर घालावे. यामुळे बॅलेन्स्ड् आणि पॉलिश्ड लूक राहतो.

पायजमा विकत घेताना त्याचा लूजनेस, पॉकेट्सवरची पायपींग, सॉफ्ट आणि आरामदायक वाटणारे फॅब्रीक या गोष्टी आवश्य तपासून घ्याव्यात. टिपीकल पायजमा पॅन्टला कलोट्स, पलाझो पॅन्ट्स किंवा वाईड–लेग पॅन्ट्स या चांगला पर्याय ठरु शकतो. स्ट्रक्चर्ड स्टाईल किंवा स्लिक टॉपचा सुद्धा वापर वेगळ्या लूकसाठी सुद्धा करता येऊ शकतो. पायजम्यावर बेल्ट किंवा ब्लेझर घालून आणखी वेगळा लूक मिळवता येऊ शकतो. तसेच अधिक कॅज्युअल लूक साठी जीन जॅकेट, सिम्पल स्ट्राईप्स् शर्ट असा पर्याय देखील वापरता येतो.

## दोस्ती इंग्रजीशी


ladder : **अर्थ : शिडी**
The dog in the circus climbed up the ladder.
**सर्कशीतील कुत्रा शिडीवर चढला.**

half : **अर्थ : अर्धा भाग, निम्मा भाग.**
I'll take half a cup of tea.
**मी अर्धा कप चहा घेईन.**

gardener : **अर्थ : माळी, बागवान**
The gardener does not let us pluck those flowers.
**माळीबाबा आम्हांला ती फुले तोडू देत नाहीत.**

accident : **अर्थ : अपघात**
There was an accident on the main road.
**मुख्य रस्त्यावर एक अपघात झाला.**

## हसरा कोपरा



**बंटीचा निकाल लागला. गणितात शून्य मार्क मिळालेले आईला कसे सांगायचे याचा विचार करत तो घरी आला आणि आईला म्हणाला, आई, गणितात मला शंभराला १ आकडा कमी पडला.**
**आई : सरळ ९९ मिळाले म्हणून सांग ना.**
**बंटी : नाही, शंभरातली पुढची दोन शून्य मिळाली.**




# दिल्लीने विजयाची गुढी उभारली!

## हैद्राबाद सलग दुसऱ्यांदा पराभूत : स्टार्कचे ५ विकेट्स ठरले गेमचेंजर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**विशाखापटनम :** दिल्ली कॅपिटल्सने रोमहर्षक सामन्यात वादळी फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादवर ७ विकेट्सने मोठा शानदार विजय मिळवला आहे. सनरायझर्स हैदराबाद संघाला सर्वबाद करत दिल्लीने २५ चेंडू बाकी ठेवत विजय मिळवला. दिल्लीने सुरूवातीपासूनच सामन्यात आपला दबदबा कायम ठेवला आणि अखेरीस विजय मिळवून गतवर्षीच्या सामन्यातील पराभवाचा व्याजासकट बदला घेतला. मिचेल स्टार्कचे पाच विकेट्स आणि नंतर प्रत्येक फलंदाजाने फलंदाजीत




दिलेले योगदान यामुळे दिल्लीचा संघ हा सलग दुसरा विजय मिळवण्यात यशस्वी ठरली.

अभिषेक पोरेलने १६व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी षटकार लगावत दिल्लीचा विजय निश्चित केला. यासह दिल्ली कॅपिटल्सने यंदाच्या आयपीएलमधील सलग दुसरा विजय नोंदवला आणि गुणतालिकेत आरसीबीनंतर दुसरे स्थान गाठले आहे.

सनरायझर्स हैदराबाद संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण हैदराबादचा हा निर्णय त्यांच्यावरच उलटला. हैदराबादची विस्फोटक सलामी खेळी या सामन्यात फेल ठरली. अभिषेक शर्मा पहिल्याच षटकात विचित्र पद्धतीने झेलबाद झाला. तर पॉवरप्लेमध्येच स्टार्कने दोन षटकात हैदराबादला ३ झटके दिले. स्टार्कने ट्रॅव्हिस हेड, इशान किशन आणि नितीश रेड्डीच्या विकेट घेत हैदराबादला धक्का दिला. यानंतर अनिकेत वर्माने एकट्याने हैदराबादला १५० च्या वर पोहोचवले.

अनिकेते ४१ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह ७४ धावांची शानदार खेळी केली. तर क्लासेन ३२ धावा करत बाद झाला. याशिवाय कोणताच फलंदाज १० धावांचा आकडाही गाठू शकला नाही. दिल्लीकडून स्टार्कने ३.४ षटकांत ३५ धावा देत ५ विकेट्स घेतले. तर कुलदीपने ४ षटकांत २२ धावा देत ३ विकेट्स घेतले. याशिवाय मोहित शर्माच्या खात्यात महत्त्वाची क्लासेनची विकेट मिळाली. यासह हैदराबादचा संघ १६३ धावा करत सर्वबाद झाला.




## क्षमतेनुसार खेळपट्टी तयार करणारा चेन्नईचा संघ!



**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्स ही आयपीएलमधील एकमेव फ्रँचाइझी आहे, ती स्वतःच्या क्षमतेनुसार घरच्या मैदानाची खेळपट्टी तयार करते, असे स्पष्ट मत कसोटी क्रिकेटमधील दिग्गज फलंदाज चेतेश्वर पुजाराने व्यक्त केले आहे. आम्हाला होम ॲडव्हांटेज मिळत नाही, असा दावा चेन्नई संघाचे प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी केला तो दावा पुजाराने खोडून काढला आहे. विशेष म्हणजे, पुजारा २०२१च्या मोसमात चेन्नई संघाचा सदस्य होता. फ्लेमिंग यांनी केलेल्या दाव्यामुळे मी आश्चर्यचकित झालो, चेन्नईत खेळताना तुम्हाला होम ॲडव्हांटेज मिळाला नाही, असे कोणीच म्हणू शकत नाही, असे थेट मतप्रदर्शन पुजाराने केले आहे. चेन्नईनंतर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाइट रायडर्स यांना त्यांना हव्या तशा सुविधा घरच्या मैदानावर दिल्या जातात, असे पुजारा म्हणाला. परंतु कोलकातामध्ये ईडन गार्डनवर वेगळेच घडले आहे. वरुण चक्रवर्ती हा आपला हुकमी एक्का आहे, त्याला साथ मिळेल अशी खेळपट्टी तयार करण्याची मागणी कोलकाता संघाने ईडन गार्डनचे क्युरेटर सुजन मुखर्जी यांच्याकडे केली होती; परंतु त्यांनी ती नाकारली. परिणामी, कोलकाता संघाकडून थेट नाराजी व्यक्त करण्यात आली. बंगळूरविरुद्धच्या त्या सामन्यात चक्रवर्तीने चार षटकांत ४३ धावा दिल्या.

## साईने एकटक पाहिलं, हार्दिकनेही चांगलंच सुनावलं

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शनिवारी गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना झाला. या सामन्यात गुजरातने मुंबईचा ३६ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने १९६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईला केवळ १६० धावांपर्यंतच मजल मारता आली. महत्त्वाचे म्हणजे, या सामन्यादरम्यान एका घटनेने सर्वांचे लक्ष वेधले. या सामन्यात साई किशोर आणि हार्दिक पांड्या अचानक आमनेसामने आले. यावेळी दोघांमध्ये शाब्दिक चकमकही झाली, ज्यामुळे काही वेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली. मात्र, सामना संपल्यानंतर दोघेही गळाभेट घेताना दिसले. त्यामुळे सोशल मीडियावर याची चांगलीच चर्चा रंगली.

मुंबई इंडियन्सची फलंदाजी सुरू असताना १५व्या षटकात साई किशोर गोलंदाजीसाठी आला. त्यावेळी हार्दिक पांड्या स्ट्राइकवर होता. या षटकात साई किशोरने चारपैकी तीन चेंडूंवर हार्दिकला चकवले आणि त्याच्याकडे एकटक पाहिले. यामुळे चिडलेल्या हार्दिकने साई किशोरला सुनावले. हार्दिक नेमके काय म्हणाला हे स्टंप मायक्रोफोनवर रेकॉर्ड झाले नाही, परंतु दोघांमधील शाब्दिक बाचाबाची कॅमेऱ्यात कैद झाली.

महत्त्वाचे म्हणजे, सामना संपल्यानंतर हार्दिकने हसत साई किशोरला मिठी मारली आणि त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. या प्रसंगाचीही सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली. सामना संपल्यानंतर साई किशोरला या घटनेबाबत विचारण्यात आले. यासंदर्भात बोलताना तो म्हणाला, "मैदानावर अशा घटना घडत असतात. पण हार्दिक हा माझा चांगला मित्र आहे.

## पार्थसारथी, राघव, वरद, प्रिशा, लक्ष्य, मानस, ऋतुजा यांना एमएसएलटीए शिष्यवृत्ती पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुंबई येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) च्या वार्षिक दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील राष्ट्रीय ज्युनियर व सब-ज्युनियर विजेत्या पार्थसारथी मुंढे, राघव सरोदे, वरद उंद्रे, प्रिशा शिंदे, लक्ष्य त्रिपाठी यांसह आंतरराष्ट्रीय खेळाडू मानस धामणे, ऋतुजा भोसले यांना शिष्यवृत्ती प्रदान करून गौरव करण्यात आला.

मुंबई येथे आयोजित एमएसएलटीए च्या वार्षिक शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात 30 हुन अधिक खेळाडू, सात प्रशिक्षक यांना 15 लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या शिष्यवृत्ती आणि बक्षिसे देऊन सन्मानित केले.

महाराष्ट्रातील अव्वल खेळाडूंमध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेतील मिश्र दुहेरीतील विजेती खेळाडू ऋतुजा भोसले, अर्णव पापरकर, आराध्य म्हसदे, मानस धामणे, पार्थसारथी मुंढे,




आरव छल्लाणी, वरद उंद्रे, ऐश्वर्या जाधव, शिबानी गुप्ते, मायरा शेख, आळंद श्लोक, गार्गी ओक या विविध गटातील खेळाडूंना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

धाराशिव(उस्मानाबाद)च्या पार्थसारथी मुंढे हिला 2024मधील राज्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून पुरस्कार देण्यात आला. तर, 2024मध्ये टेनिसमध्ये दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल सर्वोत्कृष्ट जिल्हा टेनिस संघटनेचा पुरस्कार नागपूर जिल्हा हार्डकोर्ट टेनिस संघटनेला प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारांचे वितरण एमएसएलटीएचे अध्यक्ष प्रशांत सुतार, एमएसएलटीएचे चेअरमन भरत ओझा, एमएसएलटीएचे मानद सचिव सुंदर अय्यर, एमएसएलटीएचे खजिनदार सुधीर भिवापूरकर आणि सह सचिव राजीव देसाई व शितल भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एमएसएलटीए समिती सदस्य अली पंजवानी, माणिक मंडलिक, माजी आंतराराष्ट्रीय खेळाडू गौरव नाटेकर व आरती पोनप्पा नाटेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

2024-25मध्ये राष्ट्रीय खेळाडू निर्माण करणाऱ्या हेमंत बेंद्रे, संदीप किर्तने, केदार शहा, रवींद्र पांडे, पार्थ चिवटे, यश देशमुख व यश पंडित या राज्यातील प्रशिक्षकांना रोख रकमेची पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, आयटीएफ व्हाईट बॅच रेफ्री आणि मलेशिया व चीन येथे अम्पायर स्कुल यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या टेनिस ऑफिशियल्स तेजल कुलकर्णी व दक्षता पटेल यांना देखील गौरविण्यात आले.

याशिवाय उत्तराखंड येथे पार पडलेल्या 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या महाराष्ट्र महिला संघ व कांस्य पदक पटकावणाऱ्या पुरुष संघाला विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये महिला संघात आकांक्षा नित्तूरे, वैष्णवी आडकर, पूजा इंगळे, सोनल पाटील, शितल भोसले(व्यवस्थापक), ऋतुजा कुलकर्णी(प्रशिक्षक/फिजिओ) यांचा तर, पुरुष संघात प्रसाद इंगळे, अर्णव पापरकर, अनुप बंगार्गी, संदेश कुरळे, निशित रहाणे, राजीव देसाई (व्यवस्थापक), केतन धुमाळ(प्रशिक्षक) यांचा समावेश होता.

## राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू बरोबरच त्यांच्या पालकांचाही सत्कार



**पुणे :** खेळाडूंच्या विकासामध्ये त्यांच्या प्रशिक्षकांबरोबरच त्यांना अनेक गोष्टींचा त्याग करीत संपूर्ण सहकार्य करणाऱ्या पालकांचा मोठा वाटा असतो हे लक्षात घेऊनच बाऊन्स टेनिस अकादमीतर्फे या अकादमीत तयार झालेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू बरोबरच त्यांच्या पालकांचाही नुकताच एका शानदार सोहळ्यात सत्कार करण्यात आला. आयएलएस विधी महाविद्यालयाच्या मैदानावर बाऊन्स टेनिस अकादमीतर्फे नियमितरित्या टेनिस प्रशिक्षण अकादमी सुरू असून त्यामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार झाले आहेत. या खेळाडूंचा नुकताच महाराष्ट्र रणजी संघाचे माजी कर्णधार व ज्येष्ठ तंदुरुस्ती तज्ञ महेंद्र गोखले यांच्या हस्ते खेळाडू व पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आयएलएस विधी महाविद्यालयातील प्राध्यापक व माजी टेनिसपटू संतोष जयभाय अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमात शालेय राष्ट्रीय स्पर्धेत तीन वेळा सुवर्णपदक जिंकणारी ईश्वरी मातेरे, आयटीआय एकेरीचे नुकतेच विजेतेपद जिंकणारी व ब्रिक्स गेम्स मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारी वैष्णवी आडकर, दोन वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवणारी तिची बहीण अस्मी आडकर, आशियाई क्रीडा स्पर्धेतील मिश्र दुहेरीत रोहन बोपन्ना याच्या साथीतसुवर्णपदक जिंकणारी शिवछत्रपती पुरस्कार विजेती ऋतुजा भोसले, वेगवेगळ्या गटात राष्ट्रीय विजेतेपद मिळवणारा व नुकतेच एटीपी स्पर्धेत दुहेरीचे अजिंक्यपद मिळवणारा सिद्धांत बांठिया या खेळाडूंचा आणि त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. बाऊन्स टेनिस अकादमीचे संचालक व ज्येष्ठ प्रशिक्षक केदार शहा यांनी सांगितले की आपला पाल्य आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यासाठी त्याचे पालक अनेक गोष्टींचा त्याग करतात मात्र हे पालक कायमच प्रसिद्धी परान्मुख राहतात हे लक्षात घेऊनच मी या कार्यक्रमात या सर्व पालकांबरोबर संवाद साधला.

## रेसिंगच्या राष्ट्रीय संघटनेकडून संजयचा गौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याचा आंतरराष्ट्रीय रॅली ड्रायव्हर संजय टकले याला डकार रॅलीची मोहिम फत्ते केल्याबद्दल रेसिंगच्या राष्ट्रीय संघटनेने सन्मानित केले. एफएमएससीआय (फेडरेशन ऑफ मोटरस्पोर्ट्स क्लब्ज ऑफ इंडिया) या संघटनेने चेन्नईत झालेल्या वार्षिक पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान केला.

संजय सध्या स्वीडनमध्ये बर्फाळ मार्गावर रेसिंगचा सराव करीत आहे. त्यामुळे त्याच्या वतीने




मुलगी संजना हिने सन्मानचिन्ह स्विकारले. शनिवारी हा कार्यक्रम झाला. संजय हा डकार रॅली पूर्ण केलेला भारताचा पहिला रॅली ड्रायव्हर ठरला. जानेवारीच्या प्रारंभी ही जगातील सर्वाधिक खडतर आणि आव्हानात्मक रॅली पूर्ण झाली.

या सन्मानबद्दल संजयने सांगितले की, बाईक रेसिंगने सुरुवात कारकिर्दीची सुरुवात केल्यानंतर मी दिर्घ काळ ब्रेक घेतला. त्यानंतर कार रॅलीमध्ये सहभागी होऊ लागलो. त्यावेळी डकारचे लक्ष्य ठेवले होते. ते पूर्ण करू शकलो याचा आनंद आहे. राष्ट्रीय संघटनेकडून झालेल्या या सन्मानामुळे हा आनंद द्विगुणित झाला आहे. गेल्या वर्षी संजयने लक्षवेधी कामगिरी केली. त्याने थायलंडमध्ये पार पडलेली आशियाई क्रॉस कंट्री रॅली पूर्ण कली. याशिवाय मलेशियातील स्पर्धेत त्याने पहिला क्रमांक मिळविला.

या कार्यक्रमात एफएमएससीआय तर्फे १७ प्रकारांमधील १७० स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय वार्षिक सोहळ्यात प्रथमच स्वयंसेवक आणि पदाधिकाऱ्यांनाही गौरविण्यात आले. विविध स्पर्धा-शर्यती सुरळीत आयोजित केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. एफएमएससीआयचे अध्यक्ष अरिंदम घोष यांनी सांगितले की, स्वयंसेवक, पदाधिकाऱ्यांसह उद्योग समूह आणि प्रसार माध्यमे असे रेसिंगचे पाच आधारस्तंभ आहेत. हे सगळे कौतुकास पात्र आहेत. हे एकमेकांस पुरक पद्धतीने कार्यरत झाले तर रेसिंग या क्रीडाप्रकाराची चौफेर प्रगती होईल. विविध स्पर्धांच्या यजमानपदासाठी होत असलेले वाढते प्रयत्न हे रेसिंगच्या वाढत्या लोकप्रियतेचे द्योतक आहे.

## ऑल स्टार्स, क्रीक9 क्रिकेट अकादमी संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी करंडक 15 वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत ऑल स्टार्स क्रिकेट अकादमी,क्रीक9 क्रिकेट अकादमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत आदिराज(3-20), ध्रुव शिंदे(2-5), पूर्व पटेल(2-6)यांनी केलेल्या शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर ऑल स्टार्स क्रिकेट अकादमी संघाने बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी क संघावर 9 गडी राखून विजय मिळवला.

दुसऱ्या लढतीत विहान परब(41धावा व 2-14) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर क्रीक9 क्रिकेट अकादमी संघाने बीअ





स्पोर्ट क्रिकेट अकादमी ब संघाचा 28 धावांनी पराभव करून दुसऱ्या विजयाची नोंद केली.

सामनावीर हा पुरस्कार विजेता टीम च्या पूर्व पटेल व विहान परब यांना देण्यात आला.

